१८९९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
ग्र. क्र. ३५

नं १७३ सन १८९९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
ाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.

पुस्तक — दुष्काळ निदर्शन
लेखक - बाळकृष्ण रा. पालवणकर
विषय - निबंध (नं १७३)

१७३
दुष्काळ निदर्शन.
निबंध

दुष्काळ निदर्शन

अथवा

हिंदुस्थानांतील दुष्काळाचीं कारणें

व

तीं टाळण्याविषयीं राजा व प्रजा

ह्यांचीं कर्तव्यें

हें पुस्तक

बाळकृष्ण रावजी पालवणकर

रा० तळें ता० माणगांव जि० कुलाबा

यांनीं लिहिलें

तें

पुणें येथें

" चित्रशाळा " छापखान्यांत छापिलें.

शके १८२१ सन १८९९

किंमत दोन आणे

(ह्या ग्रंथासंबंधीं सर्व हक्क कर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.)

दुष्काळ निदर्शन

अथवा

हिंदुस्थानांतील दुष्काळाचीं कारणें

व

तीं टाळण्याविषयीं राजा व प्रजा

ह्यांचीं कर्तव्यें

हें पुस्तक

बाळकृष्ण रावजी पालवणकर

रा० तळें ता० माणगांव जि० कुलाबा

यांनीं लिहिलें

—○:x-*-x:○—

तें

पुणें येथें

" चित्रशाळा " छापखान्यांत छापिलें.

शके १८२१ सन १८९९

किंमत दोन आणे

(ह्या ग्रंथासंबंधीं सर्व हक्क कर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.)

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. ३८८

प्रस्तावना.

परवशतेची दुर्भेद्य शृंखला आमच्या पायांत पडल्यापासून आम्हांस सुख म्हणजे काय वस्तु आहे, ती कशी असते व तिचा लाभ आम्हांस कधीं मिळेल ह्याची कोणास कल्पनाही नाहीं. कारण आम्हांस सौख्य कसें तें माहीतच नाहीं! दुःख मात्र कसें असतें तें आम्हीं जाणतों व त्याचा उपयोग आम्हांस जाणून बुजून करावयास लागतोच असें नाहीं. अशी स्थिती क्षणमात्रें कां व्हावी? असा एखाद्यानें प्रश्न केल्यास त्याचें उत्तर देणें मोठें कठीण आहे. श्रीमंतापासून तों गरीबापर्यंत, शेतकऱ्यापासून तों व्यापाऱ्यापर्यंत यच्चयावत् जागीं अन्न आणि वस्त्र यांची सुद्धां पंचाईत पडावयास लागली आहे! हिंदुस्थान सारख्या सुपिक देशांत अन्न आणि मोठें धोटें वस्त्र याला महर्गत भासावी ही मोठ्या सखेदाश्चर्याची गोष्ट आहे! परन्तु आमच्या सरकारच्या अतिरेक द्रव्यतृष्णेंमुळें व अल्प जनदोषामुळें आमचेवर हे परिणाम घडावयास लागले आहेत म्हणजे दुष्काळ पडावयास लागले आहेत. हे दुष्काळ नेहमीं कां पडतात व तत्प्रतिबंधनार्थ काय केलें पाहिजे एवढेंच जनदृष्टीनें व राजदृष्टीनें दाखविण्याचा ह्या लहानशा पुस्तकाचा हेतु आहे. ही आमची

प्रथम लेखणीच असल्यामुळें ह्यांत दोष असण्याचा संभव आहे तरी सूज्ञांनीं ते कळविल्यास त्यांचा उपयोग द्वितीयावृत्ती वेळेस अवश्य करण्यांत येईल.

तळें ता० माणगांव जि० कुलाबा ता० ९।१२।९९. } बाळकृष्ण रावजी पालवणकर.

हिंदुस्थानांतील दुष्काळाचीं कारणें व तीं टाळण्याविषयीं लोकांचीं राजाचीं व कर्तव्यें.

उपोद्घातः—सांप्रतकाळीं खेडेगांवीं जाऊन खेड्यांतील कुणब्यांचीं शरीरें कोणीही समंजस मनुष्य पहावयास लागला तर त्याला पुराणांतरीच्या सुदाम देवाची स्मृती झाल्याविना रहाणार नाहीं. पांच वर्षांपूर्वी जो कुणबी चांगला धट्टाकट्टा असून भरज्वानींत होता, दगड फोडण्याचें ज्याला सामर्थ्य होतें तोच आज कंगाल असून साधारण हातपाय हालविण्याच्या स्थितींत आहे असें त्याच्या दृष्टीस पडेल. एका कुणब्याची जी स्थिती तीच सर्व कुणब्यांविषयीं त्याच्या बायकापोरांविषयीं व साधारण शेतकऱ्यांविषयीं होय. ही खेडेगांवची स्थिती झाली. लहान मोठ्या शहरांतल्या आणि गांवांतल्याही गरीब कुटुंबांची हीच स्थिती झालेली निदर्शनास येते. अशी स्थिती कां झाली आहे, ही कल्पना पोरांबाळांस किंवा बादशाहींतील प्रसिद्ध तत्वांप्रमाणें ज्यांच्यावर लक्ष्मीची पूर्ण कृपादृष्टी आहे अशा लोकांस माहीत असण्याचा मुळींच संभव नाहीं. कपाळ कसें दुखतें तें सांगतां येणें जसें कठीण आहे तद्वतच **"घरांत वाजे नकार घंटा"** अशांच्या घरांतील स्थिती सांगतां येणें

कठीण आहे. प्रस्तुत सर्व हिंदुस्थानांतील कोणत्याही ठिकाणीं गेलें असतां अशीच स्थिती दृष्टीस पडेल. कांहीं कांहीं खेडीं तर ओसाड पडलेलीं दिसतील, कित्येक मोठमोठीं कुटुंबें देशोधडीस लागलीं असतील, इत्यादि कोणता नाहीं कोणता तरी दुःखदायक परिणाम मनावर उमटल्याशिवाय रहाणार नाहीं. असे दुःखदायक परिणाम दाखविण्याची शक्ति ज्या काळाच्या अंगांत आहे त्या काळाच्या स्वरूपाविषयीं ह्मणजे दुष्काळाविषयीं लिहिण्याचा आमचा विचार आहे.

मनुष्याच्या जीवनाला हवा, अन्न आणि पाणी हे तीन पदार्थ अत्यंत आवश्यक आहेत. या तिहींपैकीं दुसरे दोन ह्मणजे पाणी आणि अन्न हे मिळविण्याला थोडा तरी श्रम लागतो. पुष्कळ श्रमानेंही ज्या वेळीं हे पदार्थ मिळेनासे होतात त्या काळाला दुष्काळ असें ह्मणण्याची प्रवृत्ती आहे. हा या शब्दाचा रुढार्थ झाला. अवयवार्थच पाहिला असतां दुःसहः—वाईट व काळः—प्रसंग मिळून वाईट काळ असा अर्थ झाला. वाईट काळ अनेक प्रकारचे असूं शकतील. ज्याला आपण दुःख असें ह्मणतों तें प्राप्त झालें ह्मणजे त्यालाच दुष्काळ असें अवयव अर्थानें नांव देतां येईल. कारण मनाला जी प्रतिकूल वेदना तिला दुःख असें ह्मणतात अर्थात् दुःखाचे वेळीं मनाला कोणत्या तरी प्रकारें

दुष्काळच असतो. आतां सुख आणि दुःख हीं मानीव आहेत ही गोष्ट जरी खरी आहे तरी ज्याच्या त्याच्या मनाच्या स्थितीनें या अर्थाला प्रतिबंध येणार नाहीं. एवढा विस्तृत अर्थ जरी दुष्काळ या शब्दांत आहे तरी प्रस्तुत प्रसंगीं इतक्या व्यापक अर्थानें या शब्दाचा उपयोग करितां येत नाहीं या करितां " ज्या काळांत मोठें धोटें अन्नवस्त्र मिळविण्याला बऱ्याच लोकांना अडचण पडते अशा कालाला दुष्काळ असें ह्मणावयाचें." आणि या दुष्काळाचा सार्वत्रिक विचार न करितां फक्त नांव **'सोनूबाई आणि हाती कथलाचा वाळा'** या म्हणीला यथार्थ पात्र झालेल्या सुवर्ण भूमिनामक हिंदुस्थानाविषयींच दिग्दर्शन करावयाचें आहे. अलिकडे सरासरी मानानें वीस वर्षांतीं फार मोठा असा आपल्या देशांत दुष्काळ पडतो; असा अनुभव आला आहे. वास्तविक पाहतां हल्लीं हिंदुस्थानांत दररोज दुष्काळच आहे असें म्हणण्याला कांहीं हरकत नाहीं. परंतु नित्यक्रमापेक्षां विशेष महत्वाचा असा जो प्रतिवीस वार्षिक दुष्काळ, अशा सारखे जे दुर्धर प्रसंग; आपल्या देशावर ओढवतात. ते ओढवण्याचीं कारणें कोणतीं? हा या विषयांतला पहिला भाग आहे. तसेंच असे प्रसंग न येण्या करितां लोकांनीं काय केलें पाहिजे ? हा या विषयांतील दुसरा भाग आहे. व दुष्काळाला राजकारणें कोणतीं व तत्प्रतिबंधनार्थ राजानें काय केलें पाहिजे? हा या विषयांतील तिसरा भाग आहे.

पहिल्या भागांत सामान्यतः दुष्काळ पडण्याचीं कारणें काय काय संभवतात, त्या कारणांचा आपल्या देशाशीं कसा संबंध पोंचतो ह्याचें विवेचन येईल. तसेंच दुष्काळ निवारण्याची सामान्य कार्यें कोणतीं व आपल्या देशाला त्यांचा कितपत उपयोग होईल, ह्या गोष्टी दुसऱ्या भागाच्या पोटीं येतील. व दुष्काळ पडण्याला सरकारी कारणें कोणतीं व तन्निवारणार्थ सरकारला काय केलें पाहिजे, ह्याचें विवेचन तिसऱ्या भागांत येईल. ह्या भागांचें आतां क्रमानुवार वर्णन करावयाचें आहे.

बा. नं. १३६

भाग १ ला.

हिंदुस्थानांतील दुष्काळाचीं कारणें.

अतिवृष्टि रनावृष्टि मूषकाः शलभाः शुकाः ॥
स्वचक्रं परचक्रंच सप्तैता ईतय स्मृताः ॥ १ ॥

आपल्या या निष्कांचन हिंदुस्थानामध्यें अलीकडे जो प्रतिवर्ष वार्षिक दुष्काळ पडावयास लागला आहे तो कां पडतो याचीं कारणें आपल्या पौराणामध्येंच सांगितलेलीं आहेत. तीं नव्यानेंच शोधून काढावयाची कांहीं जरूरी नाहीं. फक्त त्या कारणांची व्याख्या व तीं आपल्या देशाला कां हानीभूत होतात याचा विचार कर्तव्य आहे. अतिवृष्टि, अनावृष्टि, उंदीर, पोपट, आणि टोळ यांचा उपद्रव, राज्यांतील बंडें व शत्रूची स्वारी हीं सात कारणें दुष्काळ पडण्याला कारणीभूत आहेत असें आमच्या पुराणांत सांगितलेलें आहे. या सात कारणांशिवाय जंगलाची तोड, किंवा मूळचीच जंगलाची कमतरता व्यापारवृद्धीच्या साधनांचा अभाव, देशांतील फार मोठा समुदाय शेतकामांत गुंतलेला अशीं आणखींही कारणें संभवतात. असो. दुष्काळाचें पहिलें कारण—

अतिवृष्टी—हें होय. ज्या देशांत जितके दिवस पाऊस पडावयाचा तितके दिवस पडला पर पडावयाचा

त्यापेक्षां फार पडला तर हिला वस्तुतः अतिवृष्टी असें नांव देतां येणार नाहीं, कारण पाऊस जास्त पडल्यामुळें जरी पाणवळ शेतजमिनी बुडाल्या तरी त्यापासून एकंदर उत्पन्नाला थोडा बहुत धोका येईल परंतु गेल्या दुष्काळासारखा भयंकर प्रसंग येण्याचा संभव नाहीं. पर जेव्हां असें होतें कीं, एकंदर वर्षांत जितका आणि जितके दिवस पाऊस लागावयाचा तितके दिवस न लागतां एकंदरींत पुष्कळ पाऊस पडला तर त्यापासून सर्वच प्रकारच्या शेतीला धक्का पोंचण्याचा संभव फार आहे. याला गेल्या दुष्काळाचें प्रत्यंतर पुरे आहे. आपल्या या प्रांतांत एका वर्षांत सुमारे १२५।१५० ईंच पर्यंत पर्जन्य पडतो. परंतु इ. स. १८९७ सालीं दीड महिन्यांतच सुमारे १७५ ईंच पाऊस पडल्यामुळें गेल्या दुष्काळाचा भयंकर पराक्रम सर्व हिंदुस्थानीयांस दृगोचर झाला. इतका पाऊस पडून शेती सफाई बुडाली ती बुडालीच परंतु शेवटीं कांठण पिकण्यालाही जमिनीला ओल राहिलें नाहीं आणि पाण्याचाही अत्यंत हाहा:कार उडाला. यावरून वर्षांत जितका पर्जन्य पडावयाचा तितका थोड्या मुदतींत पडून गेला म्हणजे अतिवृष्टी झाली तर दुष्काळ पडतो हें सिद्ध झालें. दुष्काळाचें दुसरें कारण—

अनावृष्टी:—हें होय. अनावृष्टी म्हणजे वर्षांत जितके दिवसांत जितका पाऊस पडावयाचा तितका न पडतां

ज्या क्रमानें पडावयास पाहिजे त्या क्रमानेंही पडला नाहीं तर त्याच्या योगानें शेतकीला धक्का पोचेल हें निराळें सांगावयास नको. जितका पाऊस पडतो तितका सर्व शेतकीला उपयोगी पडतोच असा नियम नाहीं. पण वेळच्या वेळीं पर्जन्य पडून तो पडावा त्यापेक्षां कमी पडला तरी चिंता नाहीं. कल्पना करा कीं, प्रत्येक मनुष्याला दररोज खाण्याचें धान्य -|||- शेर लागतें हेंच धान्य त्याला -|||- शेर न देतां -||- शेर प्रमाणें दिलें तर त्या मनुष्याची शक्ति विशेष क्षीण न होतां त्याचा नित्यक्रम यथास्थित चालेल. पण एक दिवस २ शेर व आठ दिवस कांहीं नाहीं असा क्रम चालणार नाहीं. तीच स्थिती पावसाची आहे. हंगामी जितका पाऊस पाहिजे त्यापेक्षां थोडासा जरी कमी पडला तरी चिंता नाहीं. पण एक दिवस पुष्कळ आणि आठ दिवस कांहीं नाहीं असें मात्र चालावयाचें नाहीं. तात्पर्य--पावसाळ्याचे दिवसांत एकंदरींत जितका पाऊस पाहिजे त्यापेक्षां थोडासा कमी पण वेळच्या वेळीं पडलेला, अशा पावसाला अनावृष्टी म्हणावयाचें नाहीं आणि अशा पावसापासून विशेष नुकसानही होत नाहीं पण वर्षांत जितका पर्जन्य पडावयाचा व जितके दिवस पडावयाचा तितका व तितके दिवस न पडतां गैर हंगामी आणि कमी पडतो अशा पर्जन्याला अनावृष्टी असें म्हणावयाचें. या पासून दुष्काळ पडतो हें सर्वत्र प्रसिद्धच आहे.

अतिवृष्टी व अनावृष्टी या उभयतांचा बहुतांशीं संयोग आहे असें म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. कारण दोहोंपैकीं एकाचा अनुभव प्रथमतः आला म्हणजे दुसऱ्याचा तावडतोब पाठीमागून येतो. प्रथमतः अतिवृष्टी झाली म्हणजे नंतर अनावृष्टी होणें हें अगदीं साहजिक आहे. त्याचप्रमाणें प्रथमतः अनावृष्टीचा अनुभव आल्यास मागाहून अतिवृष्टीचा योग असणें सयुक्तिकच आहे. मिळून ह्या परस्पराभिन्न अशा बहिणी बहिणींचें एकीकरण एकाच वेळीं होतें यामुळें दुष्काळ साहजिकच यावा व तो आह्मांस चांगलाच अनुभवास यावा यांत नवल तें काय? दुष्काळाचें तिसरें कारण—

उंदीर, पोपट, आणि टोळ, यांचा उपद्रवः—हें होय. टोळधाड आली असतां ती शेतांचा फन्ना कशी पाडते याविषयीं सर्वत्र प्रसिद्धीच आहे. आणि सुमारें १९ वर्षां पूर्वी याचा अल्पसा अनुभव सर्वांस आलेलाही आहे. ही टोळधाड आली तेव्हां शेतें वगैरे तयार झालेलीं नव्हतीं हें आमचें प्रालब्धच समजावयाचें. परन्तु * कुलाबा जिल्ह्यांत माड, पोफळी, आंबे यांचें जें नुकसान झालें तें अद्यापिही भरून आलें नाहीं. टोळांचें सर्वच विलक्षण

* या टोळधाडींत या ग्रंथकर्त्यांचेंही अतिशय नुकसान झालेलें आहे. आम्ही स्वानुभवावरून सुद्धां असें सांगतों कीं, या टोळधाडीनें दुष्काळच काय पर या पेक्षांही जास्त अशी संकट परंपरा ओढवेल.

आहे. यांचा समुदाय एका ठिकाणाहून अन्य ठिकाणीं जाऊं लागला म्हणजे ५।४ कोस लांबी रुंदीचा ढगच आकाशांत आला आहे असा भास होतो. ज्या शेतावर जाऊन बसतील त्याची मातीच करून टाकतील. एकीकडे खाण्याचें काम सपाट्यानें सुरू असतें व एकीकडे मलविसर्जनाचें काम चाललेलें असतें. यांची संततीही विलक्षण आहे. यांच्या अंड्यांची जी पेशी असते तींत ७९ पासून २०० पावेतों अंडीं असतात. अशा ह्या भयंकर सांथी पासून देश धुळीस मिळाल्याचीं शतशः उदाहरणें प्रसिद्ध आहेत. याप्रमाणेंच उंदीर आणि पोपट यांच्या योगानें नाश होतो असें प्राचीन वर्णन आहे. सांप्रतही ह्याचा अनुभव आहे परंतु दुष्काळ पडण्याइतका अनिर्वाच्य प्रसंग येत नाहीं व आला नाहीं व परमेश्वर कृपेनें तो पुढें न येवो अशी जगत्प्रभुजवळ विज्ञप्ति आहे. दुष्काळाला कारणीभूत असें सहावें कारण—**स्वचक्र म्हणजे राज्यांतील बंडें हें होयः**—बंड उत्पन्न झालें म्हणजे कोणताही धंदा नीट चालत नाहीं; मग सदोदीत श्रमाचा असा शेतकीचा धंदा तरी कसा चालावा ? तशांत शत्रूचा नाश करण्याची किंवा त्याला ताब्यांत आणण्याची युक्ति व तिचा उपयोग हीं ताबडतोब अमलांत येत असतात. राज्यांत कितीही धंदे असले आणि कितीही कारखाने असले तरी ते सर्व शेतकरी वर्गावर अवलंबून असणार ! आधीं "पोटोबा" किंवा

"सर्वारंभा स्तण्डुला प्रस्त मूलाः" हें तत्व नेहमीं अबाधित चालावयाचेंच. बंडासारखी धामधूम उत्पन्न झाली म्हणजे शेतांची नासाडी फार होते. इतकेंच नव्हे तर शिल्लक असलेल्या धान्याचीही लूट पुष्कळ होते. यामुळें दुष्काळ पडण्याचा संभव फार असतो. अशाच रीतीनें—

परचक्रः—म्हणजे शत्रुची स्वारी ही दुष्काळाला कारणी भूत होते. फ्रान्स देशाचा प्रसिद्ध बादशाह नेपोलियन बोनापार्ट ह्यानें रशियाची राजधानी जें मास्को शहर त्याजवर हल्ला करण्याचा निश्चय केला. ही बातमी रशियाचे झारास कळतांच त्यानें सर्व शहरांत अशी ताकीद दिली होती कीं, शत्रु जवळ येऊन पोंचतांच सर्व शहराला एकदम आग लावून देऊन तुम्हीं पळून जावें. ही रशियाचे झाराची ताकीद नेपोलियनला समजली. परंतु मास्को सारखें राजधानीचें शहर, धनधान्य संपत्तीनें युक्त, त्यांत मोठमोठ्या इमारती असलें नवयौवन प्रफुल्लित शहर जाळून टाकतील हें त्याला खरें वाटेना !! परंतु शहराजवळ जातो तों ऐकिल्याप्रमाणेंच अनुभव आला. दुसरें प्रसिद्ध उदाहरण तैमूरलंगाची हिंदुस्थानावरील स्वारी हें होय. हिंदुस्थानांत प्रवेश केल्यावरोबर कत्तल, लूट, घरादाराची व शेताभाताची राखरांगोळी याला प्रारंभ इत्यादि अनेक घोर कृत्यें करीत करीत स्वारी मोठ्या थाटानें दिल्लीपर्यंत येऊन थडकली. पुष्कळ लोक ह्या

नुकसानीमुळें पुढें पडणाऱ्या दुष्काळांत माणसाचे ते कत्तलींत मेले तरीही पुष्कळ भागांत दुष्काळ पडलाच होता सारांश—परचक्रापासून किंवा वचक्रापासून पाऊस पडूनही दुष्काळ पडतो. याप्रमाणें प्राचीन काळींच दुष्काळाचीं कारणें जीं लोकांच्या अनुभवास आलीं व येताहेत त्यांचा येथपावेतों विचार केला. आतां दुष्काळ पडण्याला अनावृष्टी ह्मणून जें कारण आहे त्याचा संबंध पुष्कळांशीं झाडांशीं अवलंबून आहे करितां त्याचा पहिल्यानें विचार करून नंतर सर्व कारणांच्या आदी कारणांचा विचार करण्यास प्रारंभ करूं.

जंगलाची तोड:—अग्नीचा उपयोग समजावयास लागला तेव्हांच मनुष्याच्या सुधारणेला प्रारंभ झाला असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. या मनुष्यरुपी सुधारणाकाळाच्या प्रारंभालाच प्राणीवर्गांतला जेष्ट वर्ग म्हणजे वनस्पती यांच्या नाशाला सुरवात झाली. जीवनसाधनसंपन्न म्हणजे प्राणी आणि जीवनसाधनासंपन्न म्हणजे वनस्पती असे प्राण्याचे दोन वर्ग कल्पितात. या पैकीं वनस्पती वर्गाची उत्पत्ती प्राणी वर्गाच्या फार अगोदर पासून आहे असें भूगर्भशास्त्रवेत्त्यांचें मत आहे. कारण त्या वेळीं उष्णता, पाणी आणि कारबानिक आसिडवायू यांची अत्यंत समृद्धि होती. कोळशांच्या खाणीवरून असें दिसून येतें कीं, जे प्रदेश हल्लीं शीतकटिबंधांत आहेत तेथें आद्यकालचीं अरण्यें, सांप्रत ऊष्णकटिबंधांत जीं दृष्टीस पडतात

त्यांहून फार मोठीं होतीं. अशा ह्या अवाढव्य अरण्यांचा नाश मनुष्याला अग्नीचा उपयोग समजल्यापासून व्हावयास लागला आहे. मनुष्याला ही उद्भिज्य संपत्ती किती मिळाली आहे आणि होती यांची गणनाच व्हावयाची नाहीं. परन्तु मनुष्य या संपत्तीचा सांचवून ठेवलेल्या द्रव्याप्रमाणें उपयोग करीत असल्यामुळें आज त्याच्यावर पर्यायानें दुष्काळासारखे भयंकर प्रसंग ओढावूं लागले आहेत. ही गोष्ट कांहीं देशांत दोनहजार वर्षां पूर्वीच लोकांनां कळून आली व त्यांनीं ताबडतोब त्याची सुव्यवस्था लाविली; व त्या व्यवस्थेनें ते सुखीही बनले. असें प्राचीन काळच्या इतिहासांवरून स्पष्ट दिसून येतें. आमच्या देशाची स्थिती ' वारा लागेल तशी पाठ द्यावी ' याप्रमाणें वारंवार बदलणारी नसून " बाबा वाक्यं प्रमाणं " या प्रमाणें असल्यामुळें आम्ही आपल्या परिस्थितीचा मुळींच विचार करीत नाहीं. यामुळें आमच्यावर संकट परंपरा जशी काय ओथंबलेलीच आहे तरी देखील आम्ही आनंदीच ! आनंदी ह्मणण्यापेक्षां आ रहित आनंदी आहों असें ह्मटलें तर तेंही शोभण्यासारखें आहे. आतां हें विशेषण अतिशय हास्यास्पद कांहींकांच्या मनाला अतिशय दुःखास्पद होईल ! पण ज्यानां असें दुःख होईल ते या विशेषणाला पात्र नाहींत ज्यानां दुःख होणार नाहीं ते पात्र आहेत इतकें लिहिलें ह्मणजे पुरे होईल. आमच्यांतील कित्येक सुशिक्षित चार चार

दहा दहा देशांच्या इतिहासांत पारंगत असतील पण आपल्याला काय केलें पाहिजे ? इतकाही प्रश्न कोणी आपल्या मनाला केला नसेल. कोणी केला असेल तर त्यांणी प्रश्नोत्तराचा आरंभ स्विकारला नसेल. आरंभ केला असेल तर त्याचा आरंभ आणि शेवट हीं अगदीं-च जवळ जवळ असतील. मिळून उपयोगाच्या दृष्टीनें कांहीं नाहीं. असेंच सिद्ध होईल. पर्यायानें जास्त लिहिण्याचें कारण इतकेंच आहे कीं, आमच्या देशांत जंगल होतें किती ? त्याची तोड कोणत्या प्रमाणांत आहे? त्याच्या वृद्धीचे उपाय काय सुरू आहेत ? या तोडीमुळें आमचें कसें कसें नुकसान होतें ? याचा कोणी विचार केला असेल आणि त्याच्या निवारणाचे उपाय योजिले असतील; असे मनुष्य आमच्या या २९।३० कोटी वस्तीच्या देशांत हाताच्या बोटांवर मोजतां येतील इतके असतील कीं नाहीं याची शंकाच आहे. कांहीं लोकां-च्या मनांत हे विचार घोळत असतील परन्तु " उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथः " या उक्तीप्रमाणें त्यांचे विचार मनांतल्या मनांतच जिरून गेले असतील ! मि-ळून सारांश इतकाच कीं, जंगलाच्या तोडी पासून आ. मचें नुकसान किती होत चाललें आहे आणि त्या नुक-सानींचा प्रतिबंध कसा करावा ? या विषयीं कोणीही कांहींच उद्योग केलेला दिसत नाहीं. अलिकडे शेंप-न्नास वर्षांत पावसाचें मान कमी कमी होत येऊन तें

हल्लीं इतकें कमी झालें आहे कीं, सुमारें एक दोन वर्षांत तें ४० इंचावर येऊन बसेल अशी भीती वाटत आहे. खेडींपाडीं व गांवें ह्यांच्या जवळपास जेथें दिवसास वाघ डुरकावयाचे इतकें जंगल होतें तेथला बहुतेक प्रदेश उजाड झालेला आहे. फार कशाला ? वाघ पाहण्याच्या ऐवजीं आह्मास आतां वाघाचें चित्र पाहण्याची पाळी आली आहे. ज्या दऱ्याखोऱ्यांतून, खिंडींतून व घाटांतून भर दिवसास शेंपन्नास लोकांनां जाण्याची पंचाईत पडत असे. त्याच वाटेंतून एकटा दुकटा मनुष्य पाहिजे तेव्हां जाऊं येऊं शकतो. इतकें आपल्या इकडील जंगल तुटलेलें आहे. जंगल तुटलें तें तुटलें परन्तु नवीन जंगलही वाढत नाहीं. इतकेंच नव्हे तर पाण्याचे झरेही बंद होंत आहेत. या मुळें दिवसें दिवस जंगल वाढविणेंची इच्छाही निष्फळ होऊं लागते. जंगलांत पाऊस पुष्कळ पडतो हें पुष्कळ लोकांनां अप्रत्यक्ष अनुभवावरून माहीत आहेच! सगळ्यांनां पाहतां येईल असें एक उदाहण व्यक्त करितों म्हणजे या मुद्याचें विवरण चांगलें लक्ष्यांत येईल. चर्नीरोड स्टेशनावरील गार्डन् मध्यें फिरावयास गेलों असतां वाळू आणि त्याच्याजवळ गवत असे देखावे आपल्या पुष्कळ दृग्गोचर होतील. थंडीच्या दिवसांत सकाळीं उठून वरील देखाव्याकडे नजर फेंकली असतां गवतावर दहींवर व वाळू कोरडी असें दृष्टीस पडेल. हाच मासला पावसाचा आहे असें दृष्टांतानें

(११)

समजावें. तात्पर्य—आमच्या देशांतील जंगल उत्तरोत्तर कमी कमी होत चालले आहे त्या मानानें पाऊसही कमी कमी पडत आहे. आणि त्याचा परिणाम सुमारें प्रतिवीस वर्षी मेठा दुष्काळ आणि प्रतिवर्षी थोडथोड्या भागांत दुष्काळ असा झाला आहे. असाच क्रम आणखी कांहीं वर्षें चालला तर केवढा भयंकर प्रसंग ओढवेल याची कल्पनाही करितां येत नाहीं. यावरून पाहतां जंगलाची तोड हें हल्लींच्या दुष्काळास मुख्य कारण आहे.

शेतकऱ्यांची निकृष्टावस्था:—गेला दुष्काळ सर्वच हिंदुस्थानांत पडला होता यामुळें व्यापारोपयोगी साधनें जीं सडकांचे रस्ते, आगगाडीचे रस्ते व जलमार्गांतून जाणारीं जहाजें तीं गेल्या दुष्काळांत मुळींच उपयोगीं पडलीं नाहींत. हीं साधनें फक्त देशाच्या लहानशा भागांत दुष्काळ पडला असतां धान्याचा पुरवठा धान्य उत्पन्न झालेल्या प्रांतांतून लवकर आणि कमी खर्चानें नेण्याचीं हीं साधनें आहेत. या साधनांचा फैलाव जितका होणें आवश्यक आहे तितका झालेला नाहीं. हिंदुस्थानांत रेल्वे कायती सुमारें १८०० मैल लांबीची आहे. सडकांचे रस्ते सर्व देशभर तयार झालेले आहेत. या देशाचा दक्षिणेकडील द्विपकल्पांचा भाग गलबतें जाण्या येण्याला सोयस्कर असा आहे. बंगाला आणि सिंध या प्रांतात भागीरथी आणि सिंधु यांतून गलबतें येण्याजाण्याचे मार्ग बरेच दूरवर चालू आहेत. तेव्हां

दुष्काळाच्या वेळीं उपयोगी पडणाऱ्या या तीन साधनांपैकीं सडका आणि गलबतांचे मार्ग हे बरेच मुबलक तयार आहेत. देशाच्या विस्ताराच्या मानानें पाहिलें असतां आगगाडीचे रस्त्यांचा प्रसार जितका व्हावयास पाहिजे तितका झालेला नाहीं. तरीही तिन्हीं साधनें देशांतील एखाद्या भागाचा दुष्काळ निवारण्याला पुरेशीं आहेत असें म्हटलें असतां चिंता नाहीं परन्तु मोठी अडचण काय ती धान्याची विपुलता ही होय ! आमचा देश पृथ्वीवरील अत्युत्तम सुपिक देशांत पहिल्या प्रतीचा सुपिक आहे असें म्हटलें असतां अप्रासंगिक होणार नाहीं. परन्तु शेतकरी वर्गाची स्थिती अत्यंत वाईट आहे. अशी स्थिती कां असावी बरें ? असा प्रश्न केल्यास त्यास हेंच उत्तर आहे कीं, आमचे बहुतेक शेतकरी अशिक्षित आहेत व शास्त्रीयरित्या शेतकीची * सुधारणा कशी करावी याची कल्पनाही त्यांना नाहीं. कालव्यांचा आणि खतांचा उपयोग कांहीं ठिकाणीं ज्यांनीं केले त्या ठिकाणीं मात्र —अगदींच थोड्या भागांत—शेतकीच्या धंद्याला थोडेसें रूप आलेलें आहे. खत आणि पाणी ह्यांची योग्य पुरवणुक केली असतां पूर्वीच्या अडीचशेंपट जमिनीचें उ-

---

* हल्लीं शेतकी विषयावर ' कृषिकर्मविद्या ' नांवाचें पुस्तक व ' शेतकरी ' मासिक पुस्तक उत्तम रीतीनें लेख प्रसिद्ध करिताहेत व केले. करितां सर्व शेतकऱ्यांनीं याचा अवश्य संग्रह करावा. शेतसुधारणेच्छुनीं तर ही आपल्या सुधारणेंत भरच घालावी.

त्पन्न वाढल्याचें शेतकरी मासिक पुस्तकांत एकदां प्रसिद्ध झालेलें आहे. पण अशा जमिनींत आणि असे उद्योग "खंडीमध्यें ही एक पावरती" या प्रमाणेंच आहेत. हिंदुस्थानची जमिन खरी सुपिक आहे एवढ्याच तत्वावर सरासरी देशांतील लोकांचा दोन वेळेपुरता उदरनिर्वाह लागण्याइतकें धान्य उत्पन्न होऊं शकेल. परंतु शेतकरीवर्ग अत्यंत दरिद्रावस्थेप्रत पोंचल्यामुळें शेत लावल्या बरोबर धान्याचीं साठीं ठरून उत्तम उत्तम धान्य तेवढें बाहेर देशीं जातें. यामुळें बारामहिने काबाडकष्ट करून शेतकऱ्याच्या घरांत दोन महिन्याचेंही निर्वाहाचें साधन रहात नाहीं. कर्जवाम उचापत थोडीशी कमी करून महिन्यादोन महिन्या पुरतें जें धान्य शिल्लक राहील त्याच्यावर थोडे दिवस घालवून पुनः उचापतीला सुरवात होणारच ! सारांश दलदलींतून वर निघण्याकरितां प्रयत्न करणारा मनुष्य जसा उत्तरोतर खालीं जातो; तद्वत्च आमचा शेतकरी वर्ग दिवसें दिवस अगदीं निकृष्टअवस्थेंत गढत चालला आहे. जमिनीची खत मसाला घालून मशागत करावी किंवा विहीर वगैरे खणून थोडेसें जास्त उत्पन्न काढण्याचा प्रयत्न करावा. या करितां शेतकऱ्याजवळ बिलकूल पैसा रहात नाहीं. कांहीं कांहीं जमिनी फार चांगल्या असून याच कारणामुळें वर्षाऋतूंतलें पिक काढून घेतल्यावर त्या आठ महिने ओस राहतात. अशाच कारणांनीं जमिनी चांगल्या असूनही कांहींएक उपयोग होत-

नाहीं म्हणून दुष्काळाला आदी कारण जसें जंगलाची तोड आहे तद्वतच शेतकऱ्यांची निकृष्टावस्था हें एक महत्वाचें कारण आहे.

उघळेपणा:—अलिकडे शेतजमीन वाढत्या प्रमाणावर आहे. लोक संख्येचें मान त्या प्रमाणानें वाढलेलें नाहीं असें असून हिंदुस्थानांत दुष्काळ कां पडावा? हा फार महत्वाचा प्रश्न आहे. आणि त्याचा निकाल करणेंही बरेंच कठिण आहे. शंभर वर्षांपूर्वी शेतकीकडे जितकी जमीन गुंतलेली होती त्याचे दुपटीजवळ जवळ शेतजमिन झाली असून घन्याचा तोटा शेंकडों पटीनें पडावा हें एक मोठें चमत्कारीक कोडें आहे. सन १८७७ । ७८ सालच्या दुष्काळांत फक्त दोन तीन जिल्ह्यांमध्यें साडेबावनलाख मनुष्यें मेलीं हें लक्षांत आलें म्हणजे अंगावर रोमांच उभे रहातात ! मग सन १८९७।९८ च्या म्हणजे गेल्या दुष्काळांत—पुनः तो सार्वत्रिक पडला असतां—किती बळी पडले असतील बरें ? परन्तु समाधानाची गोष्ट इतकीच कीं, इतकी भयंकर प्राणहानी झाल्याचें सरकारनें कोठेंही प्रसिद्ध होऊं दिलें नाहीं; इतकेंच नव्हे तर एखाद्या वृत्तपत्रानें मनुष्य मेल्याचें प्रसिद्ध केलें असतां तो अमक्या रोगानें मेला असें प्रतिपादन करण्यांत येई सरकारच्या मतानें तर दुष्काळच पडला नव्हता परन्तु " मारून मुटकून मुसलमान " करणें आमच्या सरकारास भाग पाडलें. सरते शेवटीं ' तुमनाच दारू तुमनाच भात

देखो हमना नाच ' या म्हणी प्रमाणेच कृपण सरकारनें आमचें रक्षण केलें. असतु. पूर्वीच्या पेक्षां मनुष्य संख्या फार वाढली नाहीं, म्हणण्यासारखा जमिनीच्या उत्पन्नांत फरक पडला नाहीं, शेतकीकडे लागणारी जमीन दुप्पट झाली. एवढ्या गोष्टी आनुकूल्य असतां आमची स्थिती निकृष्टच ?? तेव्हां आमच्यांतच कांहीं तरी व्यंग असलें पाहिजे. तें व्यंग कोणतें ? याचा विचार केला तर असें सिद्ध होतें कीं, आमच्यांत उधळेपणा फार वाढला आहे, आमच्या घरांत जांगीळ मामाचा बाजार पुष्कळ पसरला आहे. साधारण सुखवस्तु मनुष्याचे हल्लींचे कपडे आणि अशाच स्थितीच्या शंभर वर्षां पूर्वीच्या मनुष्याचे कपडे ह्यांत पुष्कळच मिजाशीचा व उधळेपणाचा प्रकार दिसून येईल ! वस्त्रांप्रमाणेंच इतर गोष्टींचा विचार केला तर ज्याचा उपयोग थोडा पण ऐषआराम व मिजास मात्र फार असे पदार्थ आपल्या घरांत पुष्कळच सांपडतील ?? साक्रेतिस एकदां बाजारांतून चालला होता तेव्हां सभोवतालच्या दुकानांतील पदार्थांकडे पाहून म्हणाला कीं, हे इतके पदार्थ येथें पसरले आहेत यांची मला बिलकूल जरूर नाहीं ह्या एवढ्या लहानशा उद्गारांत किती तरी व्यापक अर्थ आहे बरें ? अहो ! बाजारांत दिडकीला हत्ती मिळतो; घ्यावा कीं नाहीं ? या प्रश्नाचें उत्तर ठेंच लागल्याशिवाय बिनचूक देणारे थोडकेच सांपडतील ! हत्तीला किंमत अतिशय

कमी पडली खरी पण तो घरीं आणल्यावर त्याला रहाण्याला साधारणशी जागा आणि अर्धे पोटच खाणें याचा विचार आम्ही कोठें केला आहे ! नाल सांपडल्या बरोबर घोडा घेण्याची तयारी आम्ही करणार !! सारांश आमची मितव्ययीपणाची वर्तणूक नाहींशी झाली, बाह्य झळफळीचा पगडा आमचेवर बसला, आवश्य अनावश्य याचा विचार समूळ गेला, मिळून आमच्या इच्छांनां तारुण्यावस्था आली ! मागचा पुढचा विचार न करितां आमच्या हातांत पैसा असला कीं खर्च झालाच !! त्यांत प्रस्तुतचा काळ तर पूर्ण स्वातंत्र्याचा ! यामुळें प्रत्येक व्यक्तिला स्वातंत्र्य आलें. अशा रीतीनें ज्यानें या तीन गोष्टी गृहीत धरल्या त्यांच्या टिकाणीं अविचार सहजच आहे. मग—

यौवनंधनसंपत्तीः प्रभुत्व म विवेकता ॥
एकैक मप्यनर्थाय किमुयच चतुष्टयम् ॥

या चतुष्टयांत सांपडल्यावर दुष्काळच काय पण या पेक्षांही भयंकर संकट परंपरा आमच्यावर ओढवेल ! असो. ' रात्र थोडी आणि सोंगें फार ' अशांतली स्थिती झाली मुख्य मुख्य कारणें शोधित असतां त्यांची संख्या बरीच वाढली. आणखी शतशः कारणें दुष्काळाला आहेत असें शहाजोग रितीनें दाखवितां येईल. परन्तु कितीही व कोणचींही कारणें दुष्काळाला आहेत

असें दाखविलें तरी तीं वरील सत्पकांतीलच असावयाचीं! आतां या दुष्काळाचा प्रतिकार लोकांनीं कसा करावा ह्याचें यथानुक्रमें विवेचन करावयाचें आहे.

भाग २ रा.

हिंदुस्थानांतील दुष्काळांचीं कारणें टाळण्या-विषयीं लोकांची आद्य व मुख्य कर्तव्यें.

नयत्रस्थेमानं दधुरति भयभ्रांत नयना ॥
गलद्दानोद्रेक भ्रमदलि कदंबाः करटिनः ॥
लुटन्मुक्ता भारे भवतिपर लोकंगतवतो ॥
हरेरद्यद्वारे शिवशिव शिवानां कलकलः ॥'भामिनी'

दुष्काळ पडण्याचीं मुख्य व गौण कारणें कोणतीं याचें विवेचन पहिल्या भागांत अल्प व यथामतीनें केलें. या भागांत दुष्काळाचीं कारणें टाळण्यास लोकांनीं काय केलें पाहिजे याचा विचार कर्तव्य आहे. दुष्काळ पडण्याला जीं कारणें दाखविलीं तीं नाहींशीं झालीं म्हणजे दुष्काळ न पडण्याला साधारणतः उपयोग होईल. इतकें सांगितलें म्हणजे या भागाची परिसमाप्ती झाली असें कोणी म्हणतील. परंतु तीं टाळावीं कशीं याचा निर्णय कोणी करावा? असो आम्ही वर जो साधारणः उपयोग असा शब्द वापरिला आहे तो काय म्हणून? असा एखाद्यानें प्रश्न केल्यास त्याचें उत्तर हेंच कीं, इ. स. १३९६

मध्यें हिंदुस्थानांत प्रसिद्ध बारा वर्षें जो दुष्काळ पडला होता तो कां पडला ? त्या वेळीं हिंदुस्थानांत जंगल विपुल होतें निदान महाराष्ट्र देशांत तरी तें होतें असें असतां दुष्काळ कां पडावा म्हणजे पाऊस कां न पडावा? सारांश—अपायास उपाय किंवा कार्य वा कारण असतां कारण वा कार्य यांचा परस्पर भावसंबंध पाहाणें हें आपलें आद्य कर्तव्य होय. हैद्रोजन आणि आक्सिजन या दोन वायूंपासून पाणी होतें असें पुष्कळांनां माहीत आहे पण हे दोन वायू एखाद्यापाशीं आणून दिले आणि पाणी तयार करण्यास सांगितलें तर तें त्याच्यानें होईल काय ? तद्वत्च साखर ही कारबान आणि आक्सिजन व हैद्रोजन या तीन मूलतत्वरूप द्रव्यांपासून उत्पन्न होते. पण हीं तीन मूलतत्वरूप द्रव्यें निरनिराळ्या प्रमाणांत घेऊन पाहिजे तितकी खटपट केली तरी त्यांपासून साखर उत्पन्न होत नाहीं. निरनिराळे शेंकडों पदार्थ उत्पन्न होतात. तात्पर्य—कारणांची सामुग्री यथास्थित करणें हें आपलें कर्तव्य आहे. कार्य घडणें हें केवळ ईश्वरावर अवलंबून आहे. एवढें मात्र खरें आहे कीं, कारण असतां कार्य घडण्याचा संभव आहे. कारण नसलें तर नव्याण्णव हिश्शानें कार्य घडणार नाहीं. सृष्टी व्यापाराचें यथास्थित ज्ञान आपणांस कितीही झालें तरी तीं कार्यें घडून आणण्याचें ज्ञान किंवा शक्ति आपल्या ठिकाणीं नाहीं म्हणून कार्यें

साधून त्यांच्या कारणांची तयारी करणें हें आपलें कर्तव्य आहे एवढ्याच दृष्टीनें आतां ह्या भागांत विवेचन करावयाचें आहे. दुष्काळ पडण्याला पहिल्या भागांत आम्हीं जीं कारणें निर्दिष्ट केलीं त्यांतील अनावृष्टी—झाडांची तोड—व्यापारवृद्धी—च्या साधनांची कमतरता, अदूरदर्शित्व—कर्मीपोंचपणा—आणि शेतकऱ्याची निकृष्टावस्था, यां खेरीज बाकीच्या कारणांचा प्रतिकार आपल्या हातचा नाहीं म्हणून निर्दिष्ट केलेल्या चार मुद्यांचाच आपले कर्तव्यकर्मांत विचार करावयाचा आहे. अनावृष्टी न होण्याकरितां जंगलाची समृद्धी असली पाहिजे असें मागें दाखविलेंच आहे ह्मणून अनावृष्टीचा विचार करतेवेळीं जंगलाची वाढ कशी व्हावी याच मुद्याचा विचार केला पाहिजे.

आमच्या देशांत हल्लीं सुमारें २८ कोट लोक आहेत. इतक्या लोकांचे खाण्याचे पदार्थ शिजविण्याकरितां अगदीं कमींत कमी प्रमाणानें तरी लहान मोठीं दहाहजार झाडें प्रतिदिवशीं तुटत असतील यामानानें रोज सर्पणायोग्य अशा दहाहजार झाडांची लागवड होत असेल किंवा नाहीं याची मोठीच शंका आहे ? मनुष्य प्रयत्नानें तर ही होत नाहींच असें खात्रीनें म्हणतां येईल. झाडांचीं फळें जमिनीवर पडून त्या पासून जळाऊ लांकडें बनण्याची स्वाभावीक क्रिया काय चालत असेल तेवढी ! जळाऊ लांकडें तयार झालीं पाहिजेत या दृष्टीनें कां न

होईना परन्तु फलवृक्ष म्हणून किंवा उपयुक्त वृक्ष म्हणून अशा कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी दर रोज १०००० झाडांची लागवड खचित होत नसेल ! जितक्या झाडांची तोड होते त्याचा दशांशही जर लागवड होत नाहीं. तर पूर्वीचीं झाडें आम्हाला किती दिवस पुरणार ? हा आमचा अविचारीपणा किती दिवस चालेल तें कळत नाहीं. एक झाड तोडावयाचें म्हणजे दहा झाडें लावावयाचीं असा जर सक्तीचा नियम केला तर कदाचित शें-पन्नास वर्षांनीं जंगलाची थोडिशी वाढ होईल. नुसतें झाड लावून त्याची इतिकर्तव्यता होत नाहीं. तर तें दोन तीन वर्षे तरी पाणी घालून वाढाविलें पाहिजे. जेथें जंगल दाट असतें तेथें झाडांचीं फळें पडून नवीन झाडांची वाढ पाण्यावांचून स्वाभाविक होते. कारण सावलीमुळें नविन रोप्यांचा उन्हाचे तापापासून बचाव होतो. व मोठ्या झाडांचे मुळांपाशीं पाणी आपोआप सांचून रहात असल्यामुळें पाण्याचाही पुरवठा होतो. परन्तु आतां अशीं जंगलें कोठेंही राहिलीं नाहींत. हिमालया सारख्या पर्वतावरही आतां नवीन झाडें उत्पन्न होत नाहींत; म्हणून प्रत्येक मनुष्यानें झाड तोडते वेळीं किंवा जळवण विकत घेते वेळीं नेहमीं मनांत बाळगिलें पाहिजे कीं, दरसाल माझे पोटाकरितां एक झाड तरी वर्षास लागतें. तेव्हां मी आपल्या मुलांबाळां करितां निर्वाहाचा जसा कांहीं संचय

करितों तद्वत किंबहुना बिनखर्चाचें म्हणून जास्त प्रमाणानें दरसाल १० झाडांची तरी लागवड करीन आणि हें करणें मला अत्यंत आवश्यक आहे. अशीं झाडें लावण्याकरितां जमिनीच्या मालकीचा वगैरे आकुंचित विचार मनांत आणितां कामा नये. या झाडांना पाणी घालण्याची तजवीज करण्यासाठीं एक दिडकीचाही खर्च नको. मनुष्याच्या दिनचर्येला लागणारें पाणी जर एका वेळचें एका झाडाला याप्रमाणें वांटून दिलें तर चार रोप्यांचा निर्वाह एका मनुष्याचे हातून सहज होऊं शकेल; अशा रीतीची प्रत्येक मनुष्यानें जर व्यवस्था केली तर थोड्या दिवसांचे आंतच हिंदुस्थानदेश म्हणजे एक उत्तम प्रकारचा बगीचाच बनून जाईल. 'मनपर धरेंगा तो बारा बाध मारेंगा' अशा पैकींच कांहीं अंशीं ही कल्पना आहे. परन्तु हा उत्तम उपाय आहे; याकरितां या विषयांत याला पहिल्यावर्गांत घालणें भाग पडलें. जंगल वृद्धिच्या योगानें, ज्या ठिकाणीं पाऊस पडत नसे त्या ठिकाणीं पाऊस पडावयास लागल्याचीं प्राचीन काळचीं उदाहरणें इतिहासज्ञांस माहीत आहेतच आणि या संबंधानें अल्प वर्णन पहिल्या भागांत केलेंच आहे.

दुसरें कर्तव्य—व्यापारोपयोगी साधनांची कमतरता हें होय. हीं साधनें म्हणजे आगगाडीचे व सडकांचे रस्ते हीं मुख्य आहेत. ह्या साधनांपासून आमचे फायदे

कोणते आहेत? या प्रश्नाचा जबाब देणारा मनुष्य आमच्या देशाचा वरवर विचार करणारा, तसाच 'वसुधैव कुटुंबकम्' अशांतला साधू किंवा तत्ववेत्ता उपयोगाचा नाहीं; तर आपल्या देशाचा सूक्ष्मपणें विचार करणारा, आपल्या देशाची पूर्ण स्थिती जाणणारा व हुशार असा पाहिजे. अशा मनुष्यांस वरील प्रश्न विचारल्यास तो असें म्हणेल कीं, आमच्या देशांत आगगाड्या आणि सडका झाल्यापासून खरोखर कांहींच फायदा नसून तोटाच आहे, कारण आमची कितीक तरी सुपिक जमीन ह्या द्वयींनीं अडवून टाकिली आहे! या रस्त्यांमुळें ९ कोट प्रजेचा निर्वाह चालेल इतकी जमीन तरी खास अडली गेली असेल! तेव्हां या रस्त्यांपासून आमचा काय फायदा झाला आहे? रेल्वे मास्तरांस पगार मिळून त्यांचा कोठें चरितार्थ चालावयाचा तो त्यांस कंपनीनें—संपकरून आपले योग्य हक्क मागितले म्हणून—अव्हेरून टाकिलें. यावरून इकडील बाजुसही तोटाच! आगगाड्या, सडका, तारायंत्रें हीं देशांत पाहिजे आहेत किंबहुना शरिरांत जशा शिरा तसेच सर्व देशांत आगगाडीचे रस्ते असले तर शरिराच्या प्रत्येक भागाला शिरांनीं जशी पुष्टी येते तशी देशाला व्यापाराच्या योगानें पुष्टी येईल. होय; हें मत अगदीं खरें आहे. शरीर मेलें आहे, रक्तवाहिन्या सर्व शरीरभर पसरल्या आहेत काय पंचाईत ती रक्ताचीच! अशा देहाला जशा रक्तवाहि-

न्या निरुपयोगी त्याप्रमाणेंच आमच्या देशांत खरा व्यापार मुळींच नसल्यामुळें आम्हाला आगगाड्यांचे व सडकांचे रस्ते उपजीविकेची जमिन अडविणारे असेच वाटतील. दुष्काळाच्या प्रसंगीं एकाद्या भागांत दुष्काळ पडला असतां दुसऱ्या भागांतून धान्य लवकर आणण्याला आगगाडीची मदत चांगली होते हें खरें ! इतक्याच दृष्टीनें आज आमच्या देशाला आगगाडीचा काय उपयोग होईल तो होवो ? खरें पाहिलें तर ज्या देशांत व्यापार धंदा मोठा चालतो, यंत्रानें माल तयार होतो, त्या देशाला आगगाडीचा उपयोग आहे. आमच्या देशांत व्यापार मुळींच नाहीं, यांत्रिक जिन्नस मुळींच तयार होत नाहींत, आमच्या देशाला व्यापाराचें गिऱ्हाईक नाहींच म्हटलें तरी चालेल. तेव्हां अशा देशांत आगगाड्या, तारायंत्रें, शिवण्याचीं यंत्रें, गिरण्या यांचा खरोखर कांहीं उपयोग नाहीं. कांहींकांनां ही गोष्ट नापसंत होईल पर प्रथमतःच आम्ही असें लिहिलें आहे कीं, आमच्या देशाची परिस्थिती काय आहे ? ह्याचा सूक्ष्म विचार ज्यांनीं केला आहे त्याला ही गोष्ट पटल्या शिवाय रहाणार नाहीं. आगगाडी सारखें साधन असल्याच्या योगानें जितके फायदे आहेत त्यापेक्षां दुष्काळ या दृष्टीनें विचार करीत असतां आमचे तोटेच फार आहेत. पुण्याजवळच्या किंवा नागपुरच्या बागेंतील फुलें संध्याकाळीं आगगाडींत भरून सकाळीं पांच वाजले नाहींत तोंच मुंब-

ईस येऊन माळ्याच्या घरीं पडतात व तेथें त्या फुलांच्या पुड्या तयार होऊन ६ वाजले नाहींत तोंच रामभटजींच्या घरीं या फुलांची पुडी येऊन पडते. आणि मग रामभटजी—

'मयाहंतानि पुजार्थं पुष्पाणी प्रति ग्रिह्यताम'

असें म्हणून मोठ्या आनंदानें आगगाडीचा महिमा वर्णं करीत करीत खुशाल फुलें वाहतात ! पण भटजी बोवा ! जेव्हां तेव्हां रेल्वेच्या संबंधानें जो पैशाचा चुराडा होतो आणि व्यायाम न घडल्यामुळें शरीराचा जो नाश होतो त्याचा तुम्ही आगगाडीचा महिमा वर्णितांना विचार केलात काय ! तारांवर तारा खेळल्या पाहिजेत, दिवसांत २०० कोस पल्ला खेटला पाहिजे अशी कोणची नफ्याची बाब आज अडली आहे ? साधनच असलें म्हणजे लहानसहान प्रसंगीं सुद्धां त्याचा उपयोग करावा असें मनुष्याला वाटतें; हीं साधनें नसलीं तरी विशेष अडचण पडते असें नाहीं. मनुष्याला सौख्य साधनेंहि पाहिजेच आहेत. तात्पर्य— दुष्काळ निवारण्याला दुसरें साधन जें व्यापारोपयोगी साधनें तीं जितकीं आहेत त्या पेक्षां जास्त वाढविणें करितां लोकांनीं खटपट करावयास नको.

तिसरे कर्तव्य—अदूरदर्शीत्व हें आहे. पहिल्या भागांत या गोष्टीं विषयीं बरेंच विवेचन केलें असल्यामुळें पुनः पुनः पुनरावृत्ती करणें हास्यास्पद होईल. यास्तव येथें इतकेंच दर्शीत्व केलें म्हणजे पुरे आहे कीं,

" ज्या वस्तूचा आपल्यास कांहींएक उपयोग होत नाहीं त्या वस्तुसाठीं व्यर्थ पेसे खर्च न करितां नेहमी मितव्ययीं पणा ठेवावा. "

चवथें कर्तव्य—शेतकऱ्यांची निकृष्टावस्था हें आहे. हिंदुस्थानांत शेंकडां नव्वद लोक शेतकीकडे गुंतलेले आहेत. हे शेतकीचा धंदा किफायतीचा आहे म्हणून किंवा शास्त्रीय रीतीनें शेतकीची सुधारणा करण्याकरितां म्हणून शेती करीत नाहींत. असा आम्हांस अनुभव आहे. दुसरा धंदा नसल्यामुळें भूमातेची कशी तरी चाकरी करून चार महिने पोटाची भर करण्याकरितां हे शेती करितात. इतके लोक जरी या धंद्यांत गुंतलेले आहेत तरी पूर्वीपेक्षां देशांत जास्त धान्य उत्पन्न होत नाहीं. आमच्या देशांतून कोट्यावधि खंडी धान्य परदेशांत जातें; हा एक प्रकारें व्यापाराच्या दृष्टीनें वर वर फायदा दिसतो. कारण दुष्काळासारख्या भयंकर प्रसंगीं जास्त किंमत पडून कां होईना पण धान्य मिळत नाहीं. कारण कोणीही धान्याचा सांठा करीतच नाहीं. पूर्वी जमिनीचा सारा शेतांत उत्पन्न होणाऱ्या जिनसाच्या रूपानेंच घेतला जात असल्यामुळें देशांतल्या देशांतच धान्य वगैरे जिन्नस रहात असत. शिवाय कांहीं सुख वस्तु सावकार व शेतकरी यांची रीत अशी असे कीं, कसाही दुर्धर प्रसंग येवो ! पेस्तर सालचें धान्य दृष्टीस पडल्याशिवाय पूर्वीचें धान्य विकावयाचेंच नाहीं. परंतु

तो काळ आतां गेला ! चार खंडी धान्य शिल्लक राहिलें कीं गिऱ्हाइकाची वाट पहाण्यास सुरवात झालीच. एकदां पैसे हातांत पडले कीं झालें काम! पण पुढील सोईकडे विचाऱ्याचें बिलकुल लक्ष नाहीं. पेंवें म्हणजे त्यास मोठी अडचण !! काय सांगावें ? जों शेतांतील धान्य उभें आहे तोंच धान्याची सांठी ठरून निकाल ! शेत पिकतें केव्हां आणि तें आणून मळून खातों केव्हां अशीही शेतकऱ्यांची स्थिती आहे. मग संग्रहाची गोष्ट कशाला ?

शेतकरी वर्गाची एकंदरीनें पाहतां दिवसें दिवस अत्यंत निकृष्टावस्था होत चालली आहे. वर्षभर सर्व कुटुंबानें मेहनत करावी, सरासरी चार महिनेपर्यंत ओढाताण करून पोटाला खावें. पुनः कर्जाला सुरुवात आहेच ! वर्षाकाठीं एखादी घोंगडी, धोतर, दोन तीन रुमाल आणि बायकोला एखादें लुगडें याला सुद्धां कर्ज काढावें लागतें. तात्पर्य—वर्षभर खपून अर्धिमुर्धी सावकाराची फेड करावी तों महिन्या दोन महिन्यांतच पुनः कर्जाला सुरवात होणार ! तशांत एकादा लग्नकार्याचा किंवा दुर्दैवानें अजारीपणाचा प्रसंग आला असतां असलें घराणें बहुतेक रसातळास पोंचतें, आज हिंदुस्थानांत शेंकडा ९० शेतकरी तरी अशा स्थितींत आहेत. यांचे सावकार अशाच मासल्याचे असतात. एका हातानें द्यावयाचें आणि दुसऱ्या हातानें पोंचतें करावयाचें ? मिळून शेत-

करी आणि सावकार यांची बहुतेक अंशीं स्थिती सारखींच आहे. जिवाचाड मेहनत करून कर्ज मुक्त तर कोणी होत नाहींच. आम्ही म्हणतों अशाच स्थितींत एक वर्ष जास्त संकट सोसून प्रत्येकानें जर असा विचार ठरविला कीं, कांहीं होवो! वर्षाची पूर्तता ठेवावयाचीच!! —हा विचार बहुतेक मनांत मांडे खाण्यासारखाच आहे! —तर एखादें वर्ष दुष्काळ पडला असतां लाखों माणसें मरण पावतात, कोट्यावधी जनावरें मृत्युमुखीं पडतात. तसा प्रसंग सर्वांशीं प्राप्त होणार नाहीं. इ० स० १८७७।७८ चे दुष्काळांत ५२॥ लाख मनुष्यें अन्नान करून मरण पावलीं तशी स्थिती या उपायानें येण्याचा संभव कमी आहे. गेला दुष्काळ तर सर्व हिंदुस्थानांतच होता मग तेव्हांची मृत्युसंख्या किती बरें असावी? परन्तु आज पावेतों कोठेंही दुष्काळानें मनुष्य मेल्याचें बाहेर आलें नाहीं. येईल कशाला? दुष्काळ ठरेल तेव्हां मनुष्य मरेलना! असो. एकंदर शेतकऱ्यांची निकृष्टावस्था दूर करण्यास सावकार व कुळें ह्या उभयतांनींही तोटा सोसून प्रत्येकांनीं आपल्या जवळ दोन वर्षाचे बेगमी पुरता तरी धान्य संचय करावा म्हणजे असा भयंकर प्रसंग येण्याचा संभव कमी आहे.

भाग ३ रा.

हिंदुस्थानांतल्या दुष्काळास सरकारी कारणें कोणतीं ? व तत्प्रतिबंधनार्थ काय केलें पाहिजे ?

केव्हां सत्यवदे वदे अनृतही केव्हां वदे गोडही ॥
केव्हां अप्रियही दयालुही असे केव्हां करी घातही ॥
जोडी अर्थाहि जें यथेष्टसमयीं कीं रेचहि आदरी ॥
ऐशी हे नृपनीति भासत असे वारांगनेचे परी ॥१॥

वामन—नीतिशतक.

गेल्या दोन भागांत दुष्काळ पडण्याचीं कारणें व तत्प्रतिबंधनार्थ लोकांनीं काय केलें पाहिजे याचें संक्षिप्त विवेचन केलें आहे. या भागांत दुष्काळ पडण्याला सरकारी कारणें कोणतीं व तत्प्रतिबंधनार्थ सरकारानें काय केलें पाहिजे याचा विचार कर्तव्य आहे.

पहिल्या भागांत दुष्काळाला शेतकऱ्यांची निकृष्टावस्था व लोकांचा उधळेपणा म्हणून जीं दोन कारणें सांगितलीं व तत्प्रतिबंधनार्थ दुसऱ्या भागांत जे उपाय सांगितले ते उपाय व योजना ह्यांचा आमच्या सद्यःस्थितिशीं विचार करावयास लागलें म्हणजे सखेदाश्चर्य वाटतें ! कारण ज्या वेळीं आम्हांस स्वतंत्रता होती किंवा आमच्या वर जेव्हां हिंदनिवासी राजे राज्य करीत होते त्या वेळीं

शेतकऱ्यांची निकृष्टावस्था कोठें होती ? तसेंच त्या वेळचे लोक मिजाशी करित नव्हते काय ? असे दोन प्रश्न उद्भवतात; व त्यांच्या पोटीं दुसरे दोन प्रश्न उद्भवतात कीं, इंग्लंड, जर्मनी इत्यादिकांप्रमाणें हिंदुस्थानची लोक संख्या वाढली नसतां व जमिनीचें उत्पन्न अडीचपट वाढलें असतां शेतकऱ्यांची निकृष्टावस्था कां व्हावी ? व आमच्या मिजाशीवरच दुष्काळ अवलंबून कां रहावा ? पहिल्यापेक्षां आम्ही म्हणजे आज जास्त मिजाशी करीत आहों अशी कांहीं स्थिती नाहीं. असें असतां दुष्काळाला आमच्या मिजाशीचें कारण कां लावावें ? या सर्व प्रश्नांचीं उत्तरें देणें मोठें कठीण आहे असें नाहीं. सर्व प्रश्नांचीं उत्तरें 'परकीय राजसत्ता' या अष्टाक्षरी मंत्रातच आहेत. स्वराज्य व परकीय राज्य यांतील भेद पाहूं लागलें म्हणजे वरील प्रश्नांचीं उत्तरें तेव्हांच लक्ष्यांत येतील. स्थायिक राजाला आपल्या प्रजेविषयीं प्रेम, त्यांचें हित, इत्यादिकांविषयीं किती काळजी असते व आपल्या प्रजेस संतुष्ट राखण्याकरितां त्यांचें चित्त किती व्यग्र असतें याची कल्पना सन १८९६।९७ सालच्या दुष्काळांत लार्ड एल्जिन साहेबांनीं आपल्या प्रजेच्या अन्नपाण्याबद्दल केलेली व्यवस्था कशी होती व होळकर, कोल्हापूरचे छत्रपती, शिंदे, गायकवाड इत्यादि संस्थानिकांच्या दुष्काळा वेळच्या केलेल्या व्यवस्था कशा होत्या हें पाहिलें असतां तेव्हांच

ध्यानांत येईल. परकीय राजा असला म्हणजे त्याचें चित्त आपल्या देशाचें कोणत्या प्रकारें हित होईल व हिंदुस्थानाप्रमाणें आमच्या देशास सुवर्णभूमी म्हणवून घेण्याचा प्रसंग कधीं येईल ह्यांत असावयाचें ? ह्याच भेदामुळें हिंदुस्थानांत वारंवार दुष्काळ पडावयास लागले आहेत. हिंदुस्थानांतील दुष्काळाचें सरकारी व प्रमुख कारण—

अनियमित साऱ्याची पद्धती—हें आहे. ब्य पाऱ्याच्या मिषानें आमच्या सरकारनें ज्या वेळीं हिंदुस्थानांत पाय ठेविला त्याच वेळीं हिंदुस्थानांतील लोकांचे निकृष्ट स्थितीस प्रारंभ झाला. कोणत्याही दृष्टीनें विचार करा त्यांत म्हणजे सरकारी पैशाचा संबंध नाहीं अशी गोष्ट विरळा ! किंबहुना प्रत्येक गोष्टीला सर करणारें सरकार उभें आहेच ! कौरव पांडवांच्या वेळीं दुर्योधन पक्षाकडील लोक जांगीळ मामाच्या मायिक मालानें जसे व्यापून गेले होते तद्वत किंबहुना त्यापेक्षां कांकणभर जास्त अशा आंग्ल सुधारणा देवीच्या कपटी पुतळ्यानें आम्हांस घेरलें आहे. तुमच्या संरक्षणार्थ पोलीस किंवा लष्कर ठेविलें पाहिजे, तुमचे तंटे तोडण्याकरितां कोर्टे स्थापिलीं पाहिजेत, दुष्टांस वेळीं सज्जनांसही शासन करण्याकरितां मॅजिस्त्रेट नेमिले पाहिजेत, प्लेग सारख्या भयंकर रोगाची सांथ नाहींशी करण्याकरितां हजारों डाक्टर व नर्सिसी विलायतेहून आणिले पाहिजेत, दुष्काळ निवारणार्थ इनकम टॅक्स ठेविला पाहिजे व दु-

ष्काळ आहे किंवा नाहीं हें ठरविण्याकरितां लाखोंरें रुपयांचा फन्ना उडविला पाहिजे. एवंच सर्व कांहीं पाहिजे आहे. नको असा कोणताच पदार्थ नाहीं. ही बाह्य स्थिती झाली पण अंतस्थ स्थिती ह्यापेक्षांही चमत्कारीक आहे. हिंदुस्थानचे तिजोरींतील शिल्लक विलायतेस पाठविण्याकरितां जो पैसा खर्च होतो, मिठावरील कर व जमिनीवरील धाऱ्याची पद्धती हीं आमच्या निकृष्ट स्थितीस कशीं कारण होतात हें म्हणजे नव्यानेंच सांगावयास पाहिजे असें नाहीं. हरएक बाबतींत आमच्या निकृष्ट दशेला कारण होणारे पैशाचा सरकारी संबंध आहेच. दाद लागण्याकरितां करावयाच्या अर्जापासून तों तहत पिण्याच्या पाण्यापर्यंतही द्रव्यतृष्णा आहेच. अशा प्रकारची सरकारची द्रव्यतृष्णा असल्यामुळें आम्हांवर आज दुष्काळासारखे भयंकर प्रसंग यावयास लागले आहेत. शेतकऱ्याची निकृष्टावस्था होण्यास ही तृष्णाच कारण होय. शेतकऱ्यांवर जमिनीच्या साऱ्याचें ओझें फाजील पडल्यामुळें व दिवसेंदिवस त्याची सारखी वाढ होत असल्यामुळें त्याचे निकृष्ट स्थितीस पारावारच नाहींसा झाला आहे. सर्व * हिंदुस्थानांतील जमिनीचा सारा घेण्याची अनियमित पद्धती व तीपासून शेतकऱ्यांवर घडणारे परिणाम ह्याविषयीं पंधराव्या राष्ट्रीय सभेचे

---

* बंगाल शिवाय करून.

अध्यक्ष मि० रोमेशचंद्र दत्त ह्यांनीं **कांग्रेस**पुढें जें भाषण केलें तें अतिशय महत्वाचे असल्यामुळें येथें दिलें असतां दुष्काळाला खरें कारण जमिनीवरील अनियमित धाराच आहे असें सिद्ध झाल्यावांचून रहाणार नाहीं.

मिस्तर दत्त ह्मणालेः—दुष्काळासारखा अत्यंत महत्वाचा विषय दुसरा कोणताच नाहीं. लोकांनां व संस्थानांना मदत करण्याविषयीं लॉर्ड कर्झन ह्यांनीं नुकतेंच अभिवचन दिलें आहे. १८७४, १८७६ व १८९६ या तीनही सालीं डिस्ट्रिक्ट ऑफिसर किंवा कमिशनर या नात्यानें मी रिलीफ कामें चालविलीं आहेत; आणि माझा पूर्ण भरंवसा आहे कीं, रयतेस मदत करण्यास सरकाराकडून केव्हांही हयगय होणार नाहीं व अशा वेळीं उपयुक्त सूचना करून सरकारास योग्य मदत करणें हेंच राष्ट्रीय सभेचें मुख्य कर्तव्य आहे.

दुष्काळाचीं कारणें.

—○:-*-:○—

हिंदुस्थानांतील रयत गरीब कां असावी, कर्जबाजारी कां रहावी, हा मुख्य प्रश्न आहे. कर्जबाजारीपणामुळें दुष्काळ पडतो असें नाहीं तर त्यामुळें दुष्काळ अत्यंत भासतो अशी स्थिती आहे. कर्जबाजारीपणा किंवा कंगालपणा, रयतेच्या कांहीं दोषांमुळें उत्पन्न होतो काय? असें सांगण्यांत येतें कीं, हिंदुस्थानची लोकसंख्या वाढत चालल्यामुळें रयत दरिद्री राहून दुष्काळ पडतो. खानेसुमारीचे कमिशनर मि० बेनस् यांनीं आपलें असें स्पष्ट मत दिलें आहे कीं, जर्मनी इंग्लंड वगैरे युरोपियन राष्ट्रांतून ज्या प्रमाणानें लोकसंख्या वाढत आहे. त्याहून हिंदुस्थानांतील वाढीचें प्रमाण कमी आहे. मग इंग्लंड व जर्मनी येथील रयत दरिद्री होत नाहीं, तर हिंदुस्थानांत एवढा कंगालपणा कोठून

याबा? शिवाय लागवडीच्या वाढीच्या प्रमाणाहूनही लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण कमी आहे. तेव्हां रयतेच्या कंगाल स्थितीचें कारण सांप्रतच्या लोकसंख्येचें वाढतें प्रमाण नसून दुसरें कोणतें तरी असलें पाहिजे. रयतेची उधळपट्टी, मूर्खपणा व अविचार हींही कारणें पुढें आणण्यांत येतात, पण त्यांतही कांहीं हांशील नाहीं. मी माझ्या अनुभवावरून असें स्पष्ट सांगतों कीं मितव्ययी, दुरदर्शी व आपल्या पुढील स्थिती संबंधानें विचार करणारे हिंदुस्थानांतल्यासारखे शेतकरी पृथ्वीवर दुसऱ्या कोठेंही सांपडणार नाहींत. सावकाराकडे जावें लागतें, ह्याचें कारण त्यांना कर्ज काढण्याची आवड नव्हे; तर तसें केल्याशिवाय त्यांना खावयासच मिळत नाहीं. दरसाल दर शेंकडा २२ किंवा ३७ टक्के व्याज भरण्याचें कारण असें की, याहून कमी व्याजानें पैसे मिळण्या इतकी त्यांची पतच नसते.

पंजाबांतील शेतकऱ्याची स्थिती सुधारण्या संबंधानें सरकार प्रयत्न करीत आहे हें आपणास माहितच आहे. तेथील शेतकऱ्यांची पक्की स्थिती मला माहीत नसल्यामुळें सरकारच्या सांप्रतच्या प्रयत्नाविषयीं मी कांहीं बोलूं इच्छित नाहीं; पण जमिन गहाण टाकण्यासंबंधानें किंवा विकण्यासंबंधानें जे अडथळे उत्पन्न करण्यांत येत आहेत त्या विरुद्ध मी आहे. बंगाल टेनन्सी बिलाच्या वेळीं असेच प्रयत्न करण्यांत आले होते. शेतकऱ्यांच्या ताब्यातून जमीन सावकाराकडे जात आहे. ही अधिकाऱ्यांची मुख्य तकरार आहे; व रयतेचे दारिद्र्य दूर करण्याचे खरे उपाय योजितां, रयतेनें मालमत्ता विकूं नये अशा प्रकारची मर्यादा तेवढी घालण्यांत येते. रयतेची स्थिती सुधारण्यास एकंदरीनें सरकारची रयतेशी वर्तणूक अशा प्रकारची असली पाहिजे कीं, त्या योगे रयतेस सुकाळाचे वेळेस काहीं तरी शिल्लक टाकितां येईल व दुष्काळाचे वेळीं इतरांची मदत मागण्याचा प्रसंग येणार नाहीं.

दुष्काळाचें खरें कारण.

वर वर पहाणाराचे लक्षांतही दुष्काळाचें खरें कारण आल्यावांचून रहाणार नाहीं बंगाल व इतर कांहीं प्रदेश शिवायकरून बाकी सर्व ठिकाणी दुष्काळाचें खरें कारण झटलें झणजे जमिन धान्याचे फाजिल ओझें होय. सारा फाजील असल्यामुळें सुकाळाचे वेळींही रयतेपाशीं कांहीं शिल्लक रहात नाहीं व त्यामुळें दुष्काळातून पार पडण्यास रयतेपाशीं त्राण नसतो. अप्रतिबंध व्यापार तत्वामुळें इंग्रजी कारागिरापुढें व व्यापाऱ्यापुढें आमच्या कारागिरांचा व व्यापाऱ्यांच्या पुरा मोड झाला आहे; यामुळें खेडेगावांतील साळी, कोष्टी आदीकरून सर्व उद्योग धंदेवाल्यानां उदर निर्वाहार्थ शेतकीवरच अवलंबून रहावे लागते. कंजूष पणानें जमिनधारा ठरवून त्याचा वसूल जर करण्यांत आला नाहीं, व शेतकऱ्यांपाशीं कांहीं शिल्लक राहील अशाच तऱ्हेची जर सारा वसूल करण्याची पद्धत ठेविली तर पर्जन्याचे अभावामुळें पीकपाण्याची हवालदील झाली असतांही दुष्काळास तें बळी पडणार नाहींत.

बंगालची जमिनदारी पद्धत.

हजारों वर्षांच्या प्रत्यक्ष अनुभवावरून हिंदु शास्त्रकारांनीं असें ठरविलें आहे कीं, राजानें करादाखल जमिनीपासून एकंदर उत्पन्नाचा एक-षष्ठांश भाग घ्यावा. हल्लिच्या अनुभवानें पाहिलें असतां, वरील नियमच शहाणपणाचा ठरयो. १८५९, १८६८ व १८८५ सालचे बंगाल्यांतील जमिनीसंबंधाच्या कायद्यामुळें शेतकऱ्यांना सारा वाढण्याची तेथें भीती नाहीं. रयत जमिनदारांना एकंदर उत्पनाच्या एक-षष्ठांस भागापेक्षां अधिक उत्पन्न देत नाहीं; पूर्वेकडील प्रांतांत तर हा भाग एक-षष्टमांशाहून कमी आहे; व ह्यामुळें बंगाल्यांत गेल्या शतकांत दुष्काळाचे उग्रस्वरूप केव्हाही दृष्टीस पडलें नाहीं. बंगालची पद्धत चहूंकडे सुरू करा; म्हणजे हिंदुस्थानांतील दुष्काळ कमी करण्याच्या प्रश्नाचा उलगडा झाला म्हणून समजा.

वायव्य प्रांतांतील जमिनधाऱ्याची पद्धत.

वायव्यप्रांत व अयोध्या ह्या ठिकाणी जमीन घारा कायमचा केलेला नाहीं. प्रत्येक नवीन तपासणीचे वेळीं सरकारी वसुलाची वाढ होते. सर ॲंटनी मॅकडोलन ह्यांनीं करन्सी कमिटीपुढे साक्ष देतांना नंबर ५७३७ ते ५७४० ह्या प्रश्नांना उत्तर देतांना ह्या पद्धतीचे वर्णन केलें आहे. जमिनदारांना सरकार प्रथम रयतेशी आपापलें ठराव करण्यांस सांगते; व नंतर जमिनदाराच्या प्राप्तीपैकीं अर्धाभाग आपण घेते. जमिनीतील एकंदर उत्पन्नाचा एक पंचमांश भाग जमिनदार रयते पासून घेतात. अर्थात सरकारास शेकडा दहा टक्के पडतात ही पद्धत इतर ठिकाणाहून चांगली आहे खरी; पण दर तीस वर्षांनीं सरकार देणें वाढवून रयतेचाही कर वाढणार नाही अशी कांहीं तरी त्यांत व्यवस्था पाहिजे ह्मणजे जमिनदाराला वीस टक्के व सरकारला त्यांतील दहा टक्के, निदान या सीमेचे केव्हांही उल्लंघन होऊ देतां कामा नये.

मद्रासची साऱ्याची पद्धत

मद्रासची स्थिती याहून फार वाईट आहे. सरकार व रयत यांमध्यें तेथें जमिनदाराचा वर्ग मुळींच नाहीं; व सरकार जमीन लागवडीचा खर्च वजा टाकून बाकी राहिलेल्या उत्पन्नांतील निम्मा भाग साऱ्या दाखल घेतें. अलीकडे या प्रश्नासंबंधानें बोविर्लाचे राजेसाहेब ना० सुबाव आणि मि० व्यंकटरत्नम् या त्रिवर्गीचीं केलेलीं भाषणें आपणांस माहीतच आहेत. रयत जमिनीचा मालक असून सारा वाढविण्याचा अधिकार सरकारास नाहीं ही गोष्ट १८५७ सालीं सरकारनें कबूल केली. १८८२ सालीं लॉर्ड रिपन यांचे कारकीर्दीत तेंच वचन पुनः देण्यांत आलें. फरक इतकाच कीं, जमीन महसुलाची बाजारांतील किंमत ज्या प्रमाणानें वाढेल, त्या प्रमाणांतच सारा वाढविण्यास हरकत नाहीं. पण हल्लीं हीं वचनें एका बाजूस ठेवण्यांत येत आहेत बाजारांतील किमती वाढल्या ह्या एवढ्याच सबबीवर नव्हे;

तर जमिनीच्या मगदुराचीही फेरतपासणी झाली पाहिजे ह्मणून सारा वाढविण्यांत येत आहे. असें ठरविण्यांत आलें आहे कीं, खर्च वेच वजा जातां राहिलेल्या उत्पनाचा अर्धा भाग ह्मणून जो सरकाराकडून घेण्यांत येतो, तो एकंदर उत्पन्नाचा शेंकडा चाळीस टक्क्यांहून कालव्याच्या पाण्यानें भिजत असलेल्या जमिनींत अधिक असतां कामा नये; व इतर जमिनींत एकंदर उत्पन्नाच्या एक तृतीयांशाहून अधिक असतां कामा नये, ह्मणजे शेंकडा जवळ जवळ तीस किंवा चाळीस टकें सरकार रयतेपासून घेते असे म्हणण्यास हरकत नाहीं. एक षष्टांश भागाचा म्हणजे शेंकडा सोळा टक्क्यांचा आमचा पुरातन नियम कोठें राहिला? बंगाल टेनन्सी बिलाचा वादविवाद चालला असतां जमिनदारांनीं शेंकडा वीस टक्के घेण्यास हरकत नाहीं, असा नियम करण्याविषयीं मी सूचना केली होती. पण कांहीं भागांत वीस टक्क्याहूनही जमिनदार लोक कमी घेत असल्यामुळें व वरील नियम केल्यामुळें जमिनदार लोकांना वीस टक्केपर्यंत रयतेपासून घेण्याची इच्छा होईल या भीतीनें सदर सूचना नापसंत केली; व ती नापसंत झाली याबद्दल मला आनंद वाटत आहे. बंगाल्यांत रयत जमिनदारांना सारा देते, मद्रास इलाख्यांत सरकारच स्वतः जमिनदार आहे. मग सरकारानें जमिनदार या नात्यानें रयतेपासून कांहीं ठिकाणी तेहतीस व कांही ठिकाणीं चाळीस टकें सारा वसूल केला असतां, रयत निःसत्व होऊन दुष्काळास बळी पडावी यांत नवल ते काय ? मद्रासच्या सनदीनोकरांपैकीं मि० राजर्स यांनीं असें मत दिलें आहे कीं, जमिनधाऱ्याचें ओझें फार जड असल्यामुळें कित्येक जमिनी पडपडल्या आहेत. वायव्यप्रांतांत जमिनदारांना जें मिळते त्याचा निम्मा भाग सरकार घेतें, ह्मणजे दहा टकें सरकारास मिळतात. व मद्रासेस सरकारास शेंकडा तेहतीस किंवा चाळीस टके मिळतात. व बंगाल्यांत रयतेला जमिनदारांना एक षष्टमांश भागाहून अधिक भाग बहुतेक द्यावा लागत नाहीं.

मुंबई व पंजाब इलाख्यांतील शेतसारा.

मुंबई इलाख्यांत मद्रासे प्रमाणें रयतवारी पद्धतच चालू आहे; ह्मणजे रयत व सरकार यांमध्यें जमिनदार नसून प्रत्यक्ष रयते पासूनच सारा वसूल करण्यांत येतो. परंतु मुंबईस एवढाच भेद आहे कीं; निरख ठरविणारे कामगार पूर्वीच्या वर्षांच्या साऱ्याची सरासरी लक्षांत घेतात. मद्रासेस केवळ अंदाजावर काम चालते. पंजाबची पद्धत वायव्यप्रांताचे पद्धतीसारखी आहे. परंतु पंजाबांत काय किंवा वायव्यप्रांतांत काय, कायम धाऱ्याची पद्धत अमलांत नसल्यामुळें सरकार देणें केव्हां वाढेल याची रयतेस भीती असते; व त्यामुळें जमिनीची सुधारणा होत नाहीं. बंगालची जमिनदारी पद्धत, वायव्यप्रांताची महालवारी पद्धत, मध्यप्रांतांची मालगुजारी पद्धत व दक्षिणहिंदुस्थानची रयतवारी पद्धत, या निरनिराळ्या पद्धतींचे गुणावगुण गाण्याची माझी इच्छा नाहीं. माझें इतकेंच म्हणणें आहे कीं, रयत कोणत्याही पद्धतीखालची असो, जमिनीच्या उत्पन्नापैकीं, आमच्या शास्त्रकारांच्या म्हणण्याप्रमाणें एक षष्टमांश भाग किंवा जवळ जवळ तितका आपल्या पदरांत पडणार अशी त्यांची खात्री करा व यात फेरबदल होणार नाहीं. असें त्यांस समजूं द्या, ह्मणजे दुष्काळासारख्या संकटांतून पार पडण्यांस रयतेस त्राण येईल.

मध्यप्रांत.

१८९७ सालच्या दुष्काळांत मध्यप्रांताची फार खराबी झाली व हल्लीही तेथे दुष्काळाचें उग्रस्वरूप आहे. मध्यप्रांताची अशी भयंकर स्थिती कां ? असा सहजच प्रश्न उद्भवतो. तीसवर्षांनी एकदां जमिनीची मोजणी करण्याचा नियम वायव्यप्रांतांत आहे; पण मध्यप्रांतांत वीसवर्षांनीच मोजणी दारांची फेरी येते. वायव्यप्रांतांत रयतेपासून जानेदारांस जो भाग मिळतो त्याचा निम्मा भाग सरकाराकडे जातो. मध्यप्रांतांत पूर्वीच्या मोजणीचे वेळीं मालगुजारांच्या पासून त्यांनीं रयतेपासून घेतलेल्या भागापैकीं

शेंकडा पंचावन ते पंचाहत्तर टक्के सरकार घेत असे, व नवीन मोजणींत हें प्रमाण शेंकडा पन्नास ते साठ ठरलें आहे. या शिवाय शेंकडा बाराटक्के स्थानिक कराबद्दल मालगुजरांना भरावे लागतात म्हणजे एकंदरींत हल्लींही शेंकडा बहात्तर टके सरकार घेतें. सरकार वसुलाचे प्रमाण जसजसे वाढते व मोजणीची फेरी जशी जशी लवकर येते त्या प्रमाणें रयतेचा कंगालपणाही वाढतो. पूर्वी एका काळीं वायव्यप्रांतांतही जमिनदारांच्या भागापैकीं ६६ टक्क्यांची सरकारानें मागणी केली होती. पण ह्या नियमामुळें रयत पिळून निघाल्या सारखी होऊन या शतकांतील पहिल्या पन्नास वर्षांतील लढायांच्या खासाहून अधिकत्रस्त झाली. तेव्हां १८५५ सालीं तो नियम रद्द करण्यांत आला. अशी स्थिती असतां हल्लीं मध्यप्रांतांत वरील नियमांहून अधिक वाईट नियम कां अमलांत असावा हें मला समजत नाहीं. तीस वर्षांच्या सरकारी नोकरीच्या अनुभवानें माझें असें ठाम मत झालें आहे कीं, 'साऱ्याच्या हल्लींच्या पद्धतीमुळें दुष्काळ जरी उत्पन्न झालें नाहीत तरी दुष्काळातून पार पडण्यास रयत समर्थ नसते शांतता व शिक्षण ही इंग्रजी राज्यानें आम्हांस मिळाली आहेत खरीं; पण आमच्या जमिनीवर जबर कर वसल्यामुळें व लोकांचे उद्योगधंदे बुडाल्यामुळें दुष्काळाच्या यातना वारंवार भोगाव्या लागतात.'*

वर निर्दीष्ट केलेल्या मिस्तर रोमेशचंद्रदत्त यांचे भाषणानें हिंदुस्थानांतील दुष्काळास आमचें सरकारच विशेष कारणीभूत आहे हें दिसून येईल. आमच्या सरकारनें प्राचीन साऱ्याची पद्धत जर चालू केली तर हिंदुस्थानांतील दुष्काळ पुष्कळअंशीं कमी होईल यांत संशय नाहीं. हिंदुस्थानांत जर दुष्काळ पडावयास नको असेल तर प्रथमतः जमिनीचा सारा कमी करण्याकरितां आमच्या लोकांनीं खटपट करावयास पाहिजे आहे.

---

* निशाणी केसरी.

शेतकऱ्यांच्या निकृष्टस्थिती बद्दल सरकारचीही खात्री होत चालली आहे. शेतकऱ्याची दुःस्थिती होण्यास सरकारनें जें कारण काढिलें आहे तें आपल्या डोळ्यांतील कुसळ दिसते पण दुसऱ्याच्या मुसळ दिसत नाहीं. ' या म्हणीशी अगदीं यथार्थ जुळते . सावकार लोक शेतकऱ्यास बच डून त्याचे सर्वस्व घेतात व त्यामुळें शेतकरी दरिद्रावस्थेप्रत पोचतो असें सरकारचे मत आहे. आणि म्हणूनच कांहीं ठिकाणीं ' शेतकऱ्याची जमिन शेतकऱ्यानें विकत घ्यावी ' अशा अर्थाचा कायदा केलेला आहे. परंतु अशानें एखादा शेतकरी गबर होऊन बसेल, सर्वच शेतकऱ्यांची स्थिती या कायद्याने बदलणारी नाहीं. तेव्हां सरकारला जर शेतकऱ्यांची सुस्थिती व्हावी असें वाटत असेल तर प्रथमतः जमिनीचा सारा कायमचा व बंगालचे पद्धती प्रमाणें ठरविला पाहिजे. कायमचा धारा नसल्यानें आस्थापूर्वक कोणताही शेतकरी जमिनीची सुधारणा योग्य प्रकारें करीत नाहीं या करितां ' जोपर्यंत अनियमित साऱ्याची पद्धत बदलली नाहीं तोंपर्यंत शेतकऱ्यांची कोणत्याही उपायानें सुस्थिती होण्याची आशाच बाळगावयास नको. '

उपसंहार.

वाचकहो ! एकंदरींत हा विषय अतिशय महत्वाचा आहे. निबंध रूपानें ह्याचें विवेचन करणें ह्मणजे मोठ्या विद्वत्तेचें काम आहे. परंतु माझ्या अल्प बुद्धीनें मला जें लिहावेसें वाटलें तें आपणांपुढें सादर केलें आहे. दुष्काळ पडण्याची जीं मुख्य कारणें आहेत त्यांत अनावृष्टी हें मुख्य आहे. या कारणाला जंगलाची तोड किंवा मुळींच जंगल नसणें हें आदीकारण आहे. तेव्हां जंगल वृद्धीकडे लोकांनीं अवश्य लक्ष्य दिलें पाहिजे. दुष्काळ निवारण्याच्या मार्गांत व्यापारोपयोगी साधनांची कमतरता हा दुसरा मुद्दा आहे. याचा आमच्या देशस्थितीशीं विचार केला असतां हल्लीं उपयोगांत आहेत तितकीं साधनें पुरेशीं आहेत. हत्ती उपयोगी पदार्थ खरा, त्याच्या योगानें शोभा आहे, आणि तो दिडकीला मिळत आहे पर दिडकीला हत्ती मिळतो ह्मणून तो घेण्याला किती बरें तयार होतील ? कोणींच होणार नाहीं. कारण तो घेण्याला सोपा आहे तरी परिणामीं फार महाग पडतो. याची अटकळ सर्वांनां होण्यासारखी आहे. याप्रमाणेंच व्यापारोपयोगी साधनांविषयीं समजलें पाहिजे. आमच्या देशांत जर व्यापारच नाहीं तर त्यांचीं साधनें तरी कशाला पाहिजेत ? मिळून व्यापारोपयोगी साध-

नांचा एक देशी विचार केला आहे. तिसरा मुद्दा अदूरदर्शित्वासंबंधी आहे. लोकांचे बाह्य डौल वाढल्यामुळें मितव्ययीपणा नाहींसा झाला आहे. तरी सर्वांनीं मितव्ययीपणा राखण्याकडे लक्ष्य पुरविलें पाहिजे. ह्मणजे दुष्काळाचे प्रसंगीं बाह्य डौलाकडे न गेलेली रक्कम थोड्या दुष्काळास मागें सारील. चवथा मुद्दा— शेतकऱ्यांचे निकृष्टावस्थे संबंधीं होय. कोणत्याही देशापेक्षां आमच्या देशांतील शेतकऱ्यांची स्थिती अतिशय वाईट आहे. तेव्हां ' ऋणं कृत्वा घृतं पिय ' असें करून शेतकरी वर्गानें निदान एक वर्षाची तरी सामुग्री संग्रही ठेविल्य शिवाय रहावयाचेंच नाहीं हा बहुतेकांविषयीं आवश्यक असा नियम पाळावा. येणें करून दुष्काळाचें भयंकर स्वरूप कमी होऊन पुष्कळ जीव वाचतील. अस्तु याच विषयासंबंधानें आणखी एक दोन मुद्याचे विवेचन केलें पाहिजे होते. परन्तु कांहीं विशेष अडचणीमुळें तसें करितां आले नाहीं याबद्दल वाईट वाटते. सवडी प्रमाणें ही अडचण दूर करण्याचे तूर्त वाचकांना आश्वासन देऊन ठेवितो.

नि. ३३८

'शाळापत्रकां'त प्रसिद्ध झालेला

वेळ आणि त्याचा सदुपयोग.

हा निबंध

आप्पाजी विष्णु कुलकर्णी

एडिटर "शिक्षक"

यांनीं लिहिला

तो

कृष्णाजी खंडो कुलकर्णी

यांनीं

चिकोडी येथें

'ज्ञानप्रसारक' छा० छा० प्रसिद्ध केला.

किंमत ०।०६ ट. हं. ०।०६

(सर्व हक्क प्रकाशकानें राखिले आहेत)

प्रकाशकाची वाचकांस विनंति.

'वेळ आणि त्याचा सदुपयोग' हा निबंध येथील 'शिक्षक' पत्राचे एडिटर रा. रा. आप्पाजी विष्णु कुलकर्णी यांनीं एक दोन महिन्यांखालीं पुणें येथील 'मराठी शाळापत्रक' नांवाच्या सुप्रसिद्ध मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध केला होता. तो मला सुरस व चटकदार वाटल्यामुळें, जरी माझा धंदा प्रकाशकाचा नाहीं तरी केवळ ग्रंथकर्त्याला उत्तेजन मिळावें या हेतूनें मीं हा निबंध हक्कासहित विकत घेऊन प्रसिद्ध केला आहे. मला जर कांहीं कायमचे वर्गणीदार मिळतील तर याच ग्रंथकर्त्यानें लिहिलेले दुसरे लहान लहान व सुरस निबंध मी प्रसिद्ध करीन. किंमत २।३ आण्यांपेक्षां अधिक होणार नाहीं. या कामीं वाचकांकडून चांगला आश्रय मिळेल अशी पूर्ण उमेद आहे.

चिकोडी.
ता० २९।९।९५.

क० खं० कुलकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. २०१७
ठाणे

वेळ आणि त्याचा सदुपयोग.

वायां जावों नेदी क्षण । हेंच भाग्याचें लक्षण ।

तुकाराम.

मनुष्याजवळ सर्वांत थोडा आणि मौल्यवान् असा पदार्थ झटला झणजे वेळ हा होय. असें असून त्यासारखा सर्वांत जास्त आणि पाहिजे तसा असा दुसरा कोणताच पदार्थ तो खर्च करीत नाहीं. आपल्या स्वाधीन किती थोडा वेळ असतो आणि आपण तो किती निष्काळजीपणानें खर्च करितों याचा जर आपण विचार केला, तर आपलें आपल्यासच फार आश्चर्य वाटेल! दुसऱ्याला जर एखादा पदार्थ द्यावयाचा झाला तर तो आपण हात आंखडूनच देतों; दुसऱ्यावर जर प्रीति करावयाची झाली तर ती आपण बेताबातानेंच करितों; दुसऱ्याचे जर उपकार स्मरावयाचे असतील तर तेही आपण यथायथाच स्मरतों; पण जर का वेळ खर्च करावयाचा झाला तर मग मागें पुढें न पाहतां एखाद्या उधळ्यापेक्षांही तो आपण जास्त उधळतों! आपला वेळ आपण कसा घालवितों, झणजे झोपेंत किती घालवितों, खाण्यापिण्यांत किती घालवितों, आळसांत किती घालवितों, काम करण्यांत किती घालवितों, अथवा धार्मिक कृत्यें जर करीत असूं तर त्यांत किती घालवितों याचा विचार करणारे लोक फारच थोडे सांपडतील. आणि जो कोणी याचा विचार करील त्याला आपला बहुतेक वेळ

व्यर्थ जातो हें पाहून फार दुःख होईल यांत तिळमात्र संशय नाहीं. सत्पुरुष आणि कवि यांनीं व्यवहारांतील ज्या कित्येक सामान्य गोष्टींसंबंधानें लोकांना उपदेश केला आहे, त्यांपैकींच 'मनुष्याचें आयुष्य फार अल्प आहे' ही एक गोष्ट होय. आयुष्य हें पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें क्षणिक आहे! वामनपंडितांनीं एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, 'आयुष्य वायुविहता-भ्रजलापरी रे.' आयुष्य इतकें अल्प असून तें खर्च करितांना मनुष्य त्याचा विचार तरी करितो काय! चोहोंकडे वेळाचा जो व्यर्थ व्यय चालला असतो तो पाहिला ह्मणजे अशी खात्री होते कीं, साधुसंतांनीं आजपर्यंत लोकांना उपदेश करून जो कंठशोष केला, किंवा शेंकडों लोकांनीं जो शेंकडों वर्षांचा अनुभव जगापुढें मांडिला, त्याचा कांहीं एक उपयोग ह्माला नाहीं. एवढेंच केवळ नव्हे, तर वेळाची किंमत काय आहे आणि तो खर्च करणें हें केवढ्या जोखमीचें काम आहे, याचा विचार तरी कोणीं केला आहे किंवा नाहीं याची शंकाच! आतां हा जो वेळ फुकट जातो ह्मा मनुष्य त्याचा विचार करीत नाहीं ह्मणून जातो, कीं मनुष्याला आपलें कर्तव्य कोणतें हें समजत नाहीं ह्मणन जातो? या प्रश्नाचें उत्तर हेंच कीं, ह्या दोन्ही गोष्टींचा परस्पर निकट संबंध असल्यामुळें याला दोन्ही गोष्टी एकदम कारण होतात. मनुष्यानें जर एखादें चांगलें कृत्य करण्याचें मनांत योजिलें नाहीं, किंवा एखादा स्तुत्य हेतु तडीस नेण्याची खटपट केली नाहीं,

तर त्याचा वेळ खास फुकट जाणार यांत नवल तें कोणतें ?

खरोखर वेळासारखी दुसरी संपत्ति नाहीं. असें असून या संपत्तीचा उपयोग कसा करावा याचें ज्ञान आह्मांस असूं नये ही मोठी लाजिरवाणी गोष्ट होय ! आह्मी आपल्या मुलांना हरएक प्रकारचें शिक्षण देण्याची काळजी घेतों,—संस्कृत, इंग्रजी, पारशी, मराठी, गुजराथी, इत्यादि निरनिराळ्या भाषा शिकवितों; गायन, वादन, घड्याळें नीट करणें, यंत्रें तयार करणें, इत्यादि निरनिराळ्या कला शिकवितों; न्याय, व्याकरण, पदार्थविज्ञान, खगोल, भूगोल, इत्यादि निरनिराळ्या शास्त्रांचें अध्ययन करवितों; पण वेळाची काटकसर कशी करावी किंवा त्याचा उपयोग कसा करावा, हें शिकविण्याची मुळींच काळजी घेत नाहीं. एक मिनिट ह्मणजे किती महत्वाचें असतें हें आह्मी त्यांना कधींच समजावून सांगत नाहीं, त्यामुळें नेहमीं त्यांचा वेळ फुकट जातो; व नेहमीं तसाच तो फुकट घालविण्याची त्यांना संवय लागते. दररोज सकाळीं, संध्याकाळीं, जेवणापूर्वी, जेवणानंतर, माडीवर, खालीं, आंथरुणावर त्यांचा किती वेळ फुकट जातो ! पण ज्यावेळीं तो जातो त्यावेळीं त्यांच्या लक्ष्यांत तो मुळींच येत नाहीं. दिवस गेला ह्मणजे त्यांना असें वाटूं लागतें कीं, अरेरे ! हें करावयाचें होतें, पण विसरलों ! अरेरे ! तें लक्ष्यांत ठेवायला पाहिजे होतें, पण विसरलों ! असो, कांहीं चिंता नाहीं. आजचा वचपा उद्यां काढूं. उद्यां ?

खरोखर 'उद्यां' सारखा चांडाळ, आशा लावून फसविणारा आणि घातकी असा दुसरा शब्द आमच्या भाषेंत नाहीं! अमुक काम उद्यां करितां येईल किंवा अमक्याला दिलेलें वचन उद्यां पूर्ण करूं असें पुष्कळ लोक वारंवार ह्मणतात. पण लक्षांत ठेवा कीं, उद्यांनें कैक लोक वचनभ्रष्ट केले आहेत, कैक लोकांच्या कर्तव्याला व्यत्यय आणिला आहे व कैक लोकांकडून अन्यायाचरण करविलें आहे! ह्मणून आज जर तुमच्या मनांत एखादी चांगली गोष्ट करावयाची असेल तर ती उद्यांवर टाकूं नका. कारण उद्यांचा कोणी भरंवसा सांगावा? काल जें केलें आणि आज जेवढें कराल तेवढेंच काय तें तुमच्या पदरांत पडलें आणि पडणार आहे. पुष्कळ लोक असे आहेत कीं, काल आपल्या हातून कांहीं ह्मणजे कांहीं झालें नाहीं असें ह्मणून त्याबद्दल दुःख करण्यांतच आजचा वेळ घालवितात! पण कालचा वेळ कधीं तरी पुन्हां येईल काय? एकदां जो गेला तो गेलाच. तो फिरून कधींही यावयाचा नाहीं. मग त्याबद्दल शोक करून काय उपयोग? अमृतरायांनीं ह्मटलेंच आहे कीं, 'गेलि आजची घडी नये उद्यां;' ह्मणून काल जरी आपल्या हातून कांहीं झालें नाहीं, तरी त्याबद्दल शोक करण्यांत आजचा वेळ फुकट न घालवितां आज जेवढें आपल्या हातून होण्यासारखें असेल तेवढें तरी करा; त्याबद्दल बिलकुल हयगय करूं नका.

वेळाचा उपयोग कसा करावा हें ज्या मनुष्याला कळतें, तो खचित योग्यतेला चढतो. एखादा मनुष्य

कैवढा कां बुद्धिवान् आणि विद्वान् असेना, तो जर संधि साधून आपलें कार्य करून घेणार नाहीं, तर त्याच्या बुद्धीचा आणि विद्वत्तेचा त्याला कांहींएक उपयोग होणार नाहीं. अमुकच वेळाला अमुक एक गोष्ट करावयाची असते, आणि तो वेळ जर मनुष्यानें दवडला, तर त्याचें केवढें नुकसान होतें! महाभारतांत झटलें आहे कीं,

योहि कालो व्यतिक्रामेत्पुरुषं कालकांक्षिणं ।
दुर्लभः स पुनस्तेन कालः कर्मचिकीर्षुणा ॥

भावार्थः—जो मनुष्य एखादें कार्य करण्याची उत्तम संधि इच्छित असून ती आली असतां दवडतो, त्याला पुनः तें कार्य करणें झाल्यास तशी संधि मिळत नाहीं. झणून आपण बुद्धिवान् किंवा विद्वान् असतों तर काय पाहिजे तें केलें असतें, असें जे लोक झणत असतील, त्यांच्या झणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. दासांनीं झटलेंच आहे कीं,

विद्या उदंडचि शिकला । प्रसंग मान चुकतचि गेला ।
मग तये विद्येला । कोण पुसे? ॥

करितां सर्वांनीं हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, वेळाचा योग्य उपयोग करणें हेंच या जगांत यशाचें मुख्य साधन आहे.

'सकाळीं आपण काय केलें?' असा प्रश्न केला असतां पुष्कळ लोक त्याचें असें उत्तर देतात कीं, 'कांहीं नाहीं हो, सकाळचे दोन तास तर अगदीं फुकट गेले.' दोन तास? आणि सकाळचे? खरोखर

सकाळचे दोन तास फुकट घालविणें ह्मणजे लाखों रुपये पाण्यांत टाकणें होय. लाखों रुपये नव्हे असंख्य रुपये! कारण वेळाची किंमतच करितां येत नाहीं. सकाळचा असला अमूल्य वेळ जो व्यर्थखर्च करितो तो केवढा दुर्दैवी समजावा! कारण सकाळच्या प्रहरीं मनुष्याच्या अंगीं जितकी तरतरी असते तितकी दुसऱ्या कोणत्याच वेळीं असत नाहीं. शिवाय त्यावेळीं काम करण्याचा कंटाळा येत नाहीं, व कामाकडेच सारखें लक्ष्य लागतें. सकाळचे दोन तीन तास फुकट घालविल्यानें जें नुकसान होतें तें बाकीचा सगळा दिवस काम केल्यानें भरून येत नाहीं. आणि सकाळचा वेळ एकदां फुकट गेला ह्मणजे बाकीच्या वेळांत नीट काम होत नाहीं. ह्मणून सकाळचा वेळ मनुष्यानें सहसा दवडूं नये. सकाळचा वेळ दवडला कीं सर्व अव्यवस्था होते. मग 'अमुक काम तुह्मीं केलें का?' असें कोणीं विचारल्यास तो उत्तर देतो 'काय करूं? वेळच सांपडला नाहीं. नाहीं तर तें तेव्हांच करून टाकिलें असतें.' याप्रमाणें आळसांत किंवा निरर्थक कामांत व्यर्थ वेळ घालावयाचा आणि वेळ सांपडला नाहीं ह्मणून कुरकुर करावयाची हें चमत्कारिक नाहीं का दिसत? कित्येक लोक असें ह्मणतांना आपण ऐकतों कीं, 'पुष्कळ लोकांना आह्मीं हालांतून सोडविलें असतें व पुष्कळ लोकांवर आह्मीं उपकार केले असते, पण वेळच नाहीं.' दुसरे कित्येक असें ह्मणतात कीं, 'रसायन, ज्योतिष, पदार्थविज्ञान इत्यादि शास्त्रांतील

पुष्कळ नवीन नवीन शोध लावून अथवा निरनिराळ्या कलेंत पुष्कळ सुधारणा करून जगाचा मोठा फायदा करून दिला असता, पण वेळच नाहीं.' वेळ नाहीं ही आपली त्यांची कुरकुर!! वास्तविकपणें वेळ नसतो अशी कांहीं गोष्ट नाहीं. वेळ असतो; पण वेळाचा दुरुपयोग केल्यामुळें योग्य कामें करावयाचीं तीं तशींच पडतात, आणि भलत्यासलत्या कामांत किंवा आळसानें स्वस्थ बसण्यांत उगीच वेळ जातो.

नियमितपणानें वागलें ह्मणजे आपणाला पुष्कळ वेळ सांपडतो. एका वेळचें काम दुसऱ्या वेळावर टाकलें ह्मणजे सगळी घांदल उडते व धड एक असें कांहींच हात नाहीं. करितां वेळाची वांटणी करणें हेंच त्याचा योग्य उपयोग करून घेण्याचें पहिलें साधन आहे. अमुक तास अमक्या कामाकडे, तमुक तास तमक्या कामाकडे असा नियमच करून टाकावा. नेमलेल्या वेळाच्या आंतच जर एखादें काम आटपलें तर बाकी राहिलेला वेळ फुकट न घालवितां दुसऱ्या कामांत घालवावा. याप्रमाणें नियमितपणें काम करण्याची संवय ठेविली ह्मणजे वेळ व्यर्थ जात नहीं व कामही शिल्लक राहत नाहीं. एकादा मनुष्य आठ दिवसांत जितकें काम करितो तितकें दुसरा मनुष्य एका दिवसांत करितो. इतकी तफावत कशानें पडते याची चौकशी केली ह्मणजे आपणांला असें आढळून येतें कीं, तफावत पडण्याला स्मरणशक्ति, बुद्धि अथवा ग्राहकशक्ति यापेक्षां एकानें वेळाचा योग्य उपयोग न

करणें व दुसऱ्यानें तो करणें हेंच मोठें कारण आहे.

उद्योगांत वेळ घालवून विजयी झालेला मनुष्य विश्रांतीची गोष्ट कधींच काढीत नाहीं. कारण त्याला विश्रांति कधींच ठाऊक नसते. त्याचा सगळा वेळ काम करण्यांत जात असतो व प्रत्येक तास त्याला महत्वाचा वाटतो. जो आळशी असतो त्यालाच विश्रांति पाहिजे असते. गप्पा माराय़ाला वेळ, खेळ खेळायाला वेळ, करमणुकीला वेळ, याप्रमाणें त्याचा सगळा वेळ विश्रांतिकडेच! तो विश्रांति इतकी कांहीं घेतो कीं, काम करायाला त्याला मुळींच वेळ सांपडत नाहीं! विश्रांति घेण्याची संवय वाढली ह्मणजे ती इतकी वाढते कीं, जर ती लवकर मोडली नाहीं तर ती सगळें आयुष्य खाऊन टाकते! उद्योगी मनुष्याला या जगांत विश्रांति आहे काय? जो एक दोन तास फुकट घालवीत असेल तो केवढा हतभागी समजावा! खरोखर त्याला वेळाची किंमत मुळींच कळत नाहीं अशें समजलें पाहिजे.

ज्यांनीं एक क्षणसुद्धां फुकट घालविला नाहीं, तेच या जगाचे हितकर्ते होत. आजपर्यंत जे पोक्त आणि प्रगल्भ विचार बाहेर पडले, नानातऱ्हेचे जे नवीन शोध लागले, उत्तम काव्यें व कविता ज्या लोकांपुढे आल्या, त्यांना कारण केवळ तेच लोक होत. साधारण मनुष्यें फावल्यासवरला वेळ जो फुकट घालवितात तो वेळ देखील ते कामाकडे लावितात. प्रत्येक मिनिटाकडून करभार घेतल्याशिवाय त्याला ते सोडीतच

नाहींत. फ्रान्स देशांत कुव्हिअर ह्मणून एक शारीरशास्त्रवेत्ता होऊन गेला. तो गाडींतून प्रवास करीत असतांना पुस्तक वाची आणि विचार करी. तेवढ्या वाचनानें आणि विचारानें शारीरशास्त्रांतील शोधांना केवढी भर पडली! एका जर्मन वैद्यानें नेहमीं रोगी तपासावयाला जात असतांना दररोज थोडें थोडें याप्रमाणें होमरचें सारें 'इलियड' तोंडपाठ केलें. याप्रमाणें जेवणापूर्वी, निजण्यापूर्वी, किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रसंगीं जो वेळ फुकट जातो त्या वेळांत कित्येकांनीं पुष्कळ भाषांचें ज्ञान संपादन केलें आहे; कित्येकांनीं उत्तम कविता लिहिल्या आहेत; व कित्येकांनीं वक्तृत्वाचा उत्तम अभ्यास केला आहे. एका महात्म्याचें असें ह्मणणें आहे कीं, 'लहान गोष्ट असली तरी ती क्षुल्लक मानूं नको. बारीक बारीक कण मिळूनच मोठा पर्वत होतो; लहान लहान थेंबांनींच मोठें तळें सांचतें; आणि एक एक क्षण मिळूनच वर्ष होतें.' ह्मणून शहाणे लोक एक मिनिटसुद्धां फुकट न दवडतां त्याचा होईल तितका उपयोग करून घेतात.

'आतांच कामाला हात कशाला लावा? अजून पुष्कळ वेळ आहे. मग करूं' हे शब्द पुष्कळांच्या तोंडांतून निघतांना आपण ऐकतों. त्यांना वाटतें कीं, घाम काम तें काय? एकदां कामाला लागलों कीं तें हां हां ह्मणतां करून टाकूं. एकदां लागलों आणि हां हां ह्मणतां करूं हें ह्मणणें मात्र अगदीं सोपें आहे. पण कामाला लागावयाचें केव्हां आणि तें क-

राववायाचें केव्हां? मग करूं, मग करूं असें ह्मणत ह्मणत किती मिनिटें आणि किती तास जातात नकळे! आणि कामाला सुरुवात करायालाच जर वेळ लागला, तर तें व्यवस्थेनें आणि चांगलें होईल कीं नाहीं याचा संशयच आहे. करितां 'शुभंच शीघ्रं' या न्यायानें उगीच वेळ न घालवितां कामाला सुरुवात करावी; ह्मणजे घाई न होतां बेतावातानें सर्व काम यथास्थित करतां येतें. लांबणीवर काम टाकून मग धांवपळ करण्यापेक्षां थोडें थोडें आणि नियमितपणानें तें करावें हें उत्तम. ह्मणजे आपल्याला विनाकारण श्रम आणि त्रास न पडतां वेळेवर काम आटपतें.

मनुष्यानें आळसांत किंवा रिकामेपणांत कधींही वेळ घालवूं नये. एकसारखें काम करून जरी आपणाला शीण आला असेल, तरी पायावर पाय टाकून केवळ स्वस्थ बसून विश्रांति घेण्यापेक्षां असा उद्योग करावा कीं, त्यापासून आपणाला करमणूकच्या करमणूक व्हावी, आणि वेळच्या वेळही व्यर्थ जाऊं नये. उदाहरणार्थ, सुतार, लोहार, इत्यादि शारीरश्रम करणाऱ्या सर्व लोकांनीं मनोरंजक आणि उपदेशपर पुस्तकें वाचावींत; व पुस्तकें वाचून ज्यांना मानसिक श्रम फार होतात, त्यांनीं क्रिकेट, आट्यापाट्या, खो खो, इत्यादि खेळ खेळावेत. आतां खेळांत वेळ घालविणें ह्मणजे वेळाचा अपव्यय करणें असें पुष्कळांना वाटत असेल. पण शरीर आणि मन यांचा परस्पर किती निकट संबंध आहे, हें लक्ष्यांत आणिलें ह्मणजे वर सांगितले-

ल्या खेळांसारखे मनाला आनंद देणारे आणि शक्तिवर्धक खेळ खेळण्यास—आणि तेही आपल्या मुख्य कामाचा कंटाळा आल्यावर खेळण्यास—मुळींच हरकत नाहीं असें ते खात्रीनें ह्मणतील. याप्रमाणें एकच काम करून जो थकवा आला असेल, तो मनाला आल्हाद देणाऱ्या दुसऱ्या कामानें घालवून टाकावा. ह्मणजे काट कसरीनें वेळ खर्च करून सगळा वेळ पदरांत पाडिला असें होतें.

काटकसरीनें वेळ खर्च करून जी विश्रांति घ्यावयाची, तीपासून मानसिक उत्साह वाढला पाहिजे; व पुन्हा काम करण्याची उमेद आली पाहिजे. एकच काम पुष्कळ वेळ केलें ह्मणजे त्याचा कंटाळा येऊन मनुष्य अगदीं थकून जातो. ह्मणून तासा तासाला निराळें काम करण्याचा परिपाठ ठेवावा; ह्मणजे मनाला फार त्रास होत नाहीं व काम करण्यालाही हुरुप येतें. ज्याचप्रमाणें काम करीत असतांना ज्या गोष्टी लक्ष्यांत ठेवण्यासारख्या असतील त्या लक्ष्यांत ठेवण्याचा प्रयत्न करावा; ह्मणजे आपल्या ज्ञानाला अधिक भर पडेल. नाहीं तर भरधांव घोडा फेंकीत जाणाऱ्या मनुष्याला रस्त्यावर काय काय असतें हें जसें नीटपणें सांगतां येत नाहीं, तसें लक्ष्य न देतां उगीच गाढवासारखें काम करणाऱ्या मनुष्याला त्यापासून विशेष फायदा होणार नाहीं.

वेळाचा योग्य उपयोग करणें याचा अर्थ हाच कीं, वेळोवेळीं जी संधि सांपडेल ती फुकट जाऊं न

देणें. एकादें सत्कृत्य करण्याची किंवा सुविचार करण्याची अथवा आपल्या ज्ञानाला भर टाकण्याची जर का संधि आली, तर ती कोणींच फुकट घालवूं नये. ती फुकट घालविली कीं त्यासारखें दुसरें नुकसान नाहीं. पुष्कळांना कोणत्याही विषयाचा एकसारखा अभ्यास करवत नाहीं. पण आतां थोडें, मग थोडें असें ह्मणत ह्मणत ज्या ज्या वेळीं संधि सांपडेल, त्या त्या वेळीं लक्षपूर्वक अवलोकन करून सर्वांना थोडेथोडें ज्ञान संपादन करितां येईल. आणि अखेर सर्व ज्ञान पाहिलें ह्मणजे आपणाला मोठा अचंबा वाटेल! 'बाबारे, खिळा जरी वाटेंत सांपडला तरी तो तूं उचलून घे' असा वृद्ध लोकांनीं आपणाला लहानपणीं केलेला उपदेश पुष्कळांना आठवत असेल. त्याचा हेतु हाच कीं, खिळ्यासारखा लहान जरी पदार्थ असला, तरी तो यःकश्चित् आहे असें समजून त्याकडे दुर्लक्ष्य करूं नये. खिळाच पहाना, ज्यावेळीं तो आपणाला सांपडेल त्यावेळीं जरी त्याचा उपयोग झाला नाहीं, तरी केव्हां ना केव्हां तरी त्याचा उपयोग होईल हें खास. फार तर काय, वाटेंत गोळा केलेल्या मुठभर सुयाटांचण्यावर वाढत वाढत श्रीमंत झालेले कैक लोक हल्लीं आमच्या देशांत सांपडतील. तात्पर्य काय कीं, लहानसान गोष्टींचा देखील प्रभाव मोठा विलक्षण असतो. उपयोगीं नाहीं अशी वस्तुच या जगांत नाहीं. एवढीशी फाटकी चिंधी देखील मोठा रक्तस्राव बंद करिते! ह्मणून संधि सांपडेल त्या-

घेळीं जी गोष्ट आपणापुढें येईल–मग ती मोठी असो अथवा लहान असो–तिकडे दुर्लक्ष्य न करितां लक्षपूर्वक अवलोकन करून त्यापासून आपला फायदा करून घ्यावा.

लहानपणच्या व्यवसायांवरून मनुष्य थोरपणीं कसा निपजेल हें सांगतां येतें. कारण, लहानपणीं मनुष्याला ज्या संवयी लागलेल्या असतात त्यांचाच परिणाम थोरपणीं त्याच्या वर्तनावर होत असतो. इतकेंच नव्हे, तर ज्याप्रमाणें लहान झाडावर बारीक अक्षरें खोदलीं ह्मणजे जसें तें झाड मोठें होत जातें तशीं तीं अक्षरेंही मोठीं होतात, त्याप्रमाणें लहानपणीं लागलेल्या संवयी मोठेपणीं मोठ्या होऊन तदनुसार मनुष्याच्या हातून वर्तन होत असतें. चुलीवर ठेवलेल्या चहाच्या भांड्यावरील झांकण आंतील वाफेच्या जोरानें खडखड उडत होतें हें लक्षपूर्वक पाहून 'वॉट' याच्या मनांत अशी कल्पना आली कीं, वाफेच्या सहाय्यानें आपणाला पुष्कळ कामें करून घेतां येतील. ही कल्पना त्याच्या मनांत पूर्णपणें खिळून गेल्यामुळें त्यानें आपलें सगळें आयुष्य त्याकडे खर्च करून अखेर वाफेचें यंत्र तयार केलें आणि त्याकडून तो कामें करवून घेऊं लागला. आज जगभर जीं वाफेचीं यंत्रें पसरलीं आहेत व त्यांनीं आज जिकडे तिकडे जीं प्रचंड कामें हां हां ह्मणतां उठत आहेत, त्याला कारण केवळ एक 'वॉट' हाच होय. 'टर्नेफेट' यानें शाळा सोडावी आणि रानामाळांत हिंडून लहान लहान झाडें व चमत्कारिक चमत्कारिक फुलें गोळा करावीं. याप्रमाणें

झाडें फुलें गोळा करीत करीत त्यानें वनस्पतिशास्त्राचा उत्तम पाया घालून दिला. 'कॉलरिज'नें ज्या घरांत बाळपणचे दिवस घालविले त्या घरांत अरेबियन नाइट्स-ची एक जुनी प्रत होती. त्या पुस्तकावर 'कॉलरिज'ची इतकी भक्ति बसली होती कीं, केव्हां वेळ सांपडेल आणि केव्हां मी पुस्तक वाचीन इतकी त्याविषयीं त्याला नेहमीं उत्कंठा लागली असे. केव्हां केव्हां तर गडबडीनें पुस्तक कांखेंत मारून जो घूस ठोकी तो बागेतील एका कोपऱ्यांत जाऊन पुस्तक वाचीत बसे. त्या पुस्तकाच्या वाचनानें 'कॉलरिज'ची कल्पनाशक्ति फार वाढली व पुढें इंग्लंडांतील प्रसिद्ध कवींपैकीं तो एक कवि झाला.

'जॉनसन'ची अशी गोष्ट सांगतात कीं, लहानपणीं त्याला एकदां बापाच्या दुकानांतील पुस्तकांखालीं आपल्या भावानें कांहीं सिताफळें लपवून ठेविलीं आहेत असें वाटलें. तीं पुस्तकें पुष्कळ दिवस एका फळीवर उघडीं पडल्यामुळें त्यांवर धुरळा सांचून तीं अगदीं घाण झालीं होतीं. सिताफळाच्या आशेनें 'जानसन'नें तीं सर्व पुस्तकें खालीं काढलीं. सिताफळें त्याला सांपडलीं असतील; पण लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, पुस्तकें काढतां काढतां 'पेट्रार्क'च्या ग्रंथाकडे त्याचें लक्ष गेलें व तो ग्रंथ वाचून त्याला विद्येची फार अभिरुचि लागली. त्यानें जे ग्रंथ करून ठेविले आहेत त्यांवरून त्याचें ज्ञान किती होतें याचें अनुमान सहज करितां येतें.

ग्रंथ संग्रहालय.

लहानपणच्या लक्षणांवरून मनुष्याचें भावी थोरपण ओळखतां येतें ही गोष्ट 'मेकॉले'च्या उदाहरणावरून अगदीं स्पष्ट होते. तो आठ वर्षांचा असतांना त्याच्या आईनें त्याजविषयीं एकास असें लिहिलें आहे—"शिक्षणाच्या ज्या ज्या ह्मणून शाखा आहेत त्या सर्वांत त्याची उत्तम गति आहे. आणि त्याचें वाचन व त्यापासून त्याला मिळालेलें ज्ञान हीं खरोखर अपूर्व आहेत. मी तुह्मांस एक दोन गोष्टी सांगतें, त्यावरून त्याची बुद्धि किती चलाख आहे व स्मरणशक्ति किती बळकट आहे, याची कांहीं कल्पना तुह्मांस करितां येईल. एक वर्षापूर्वी त्याच्या मनानें असें घेतलें कीं, जगाचा संक्षिप्त इतिहास आपण लिहावा. आणि खरोखर जगाच्या उत्पत्तीपासून आजमितीपर्यंत मोठमोठ्या गोष्टींची संगतवार हकीकत देऊन त्यानें चांगलीं पन्नास पानें लिहिलीं ! एके दिवशीं मला त्यानें असें सांगितलें कीं, मी 'हेनरी डाली'ला ख्रिस्तीधर्मावर एक निबंध लिहून देत आहें व 'डाली' त्या निबंधाचें मलबारी भाषेंत भाषांतर करून त्रावणकोरच्या लोकाचीं मनें ख्रिस्तीधर्माकडे वळविणार आहे. मीं जेव्हां तो निबंध वाचून पाहिला तेव्हां मला असें आढळून आलें कीं, ख्रिस्तीधर्माचीं मुख्य मुख्य ह्मणून जीं तत्वें त्यानें लिहिलीं होतीं व तो धर्म स्विकारण्याबद्दल जे मुद्दे व जीं प्रमाणें त्यानें दिलीं होतीं, तीं फारच उत्तम होतीं. 'स्कॉट' ह्मणून इंग्लंडांत जो एक प्रख्यात कवि होऊन गेला त्याचीं 'मारमिअन' व 'ले' हीं दोन काव्यें जेव्हां मेकॉलेनें वाचलीं,

त्यावेळीं त्याला इतका कांहीं आनंद झाला कीं, त्यानें पहिलें काव्य थोडेंबहुत पाठ केलें आणि दुसरें तर संबंध तोंडपाठ केलें. हीं दोन काव्यें त्यानें मुखोद्गत केलीं होतीं आणि तीं तो पुनः पुनः ह्मणत असे व त्यांत त्याला आनंद होई. याचा परिणाम असा झाला कीं, चिव्हिअटच्या लढाईवर आपण एक काव्य करून त्याचे सहा सर्ग करावे असा त्यानें निश्चय केला. एकशेंवीस ओळींचा एक सर्ग याप्रमाणें सरासरी तीन सर्ग त्यानें अगदीं थोड्या दिवसांत संपविले. पुढें त्याचा त्याला कंटाळा आला. बाकीचे सगळे सर्ग त्यानें संपविले असते. पण लिहितां लिहितां त्याच्या मनांत एखादें वीररसप्रधान काव्य लिहावें व त्यांत टिपू आणि हैदर यांचा पाडाव करणाऱ्या इंग्लिश योध्यांचें वर्णन करावें असें आलें. त्यामुळें पूर्वीचें काव्य तसेंच राहून ह्या नव्या काव्यास त्यानें सुरुवात केली. त्यानें त्या काव्याचे किती सर्ग लिहिले व ते कसे लिहिले आहेत हें जरी मला माहित नाहीं, तरी त्यानें तें काव्य लिहावयाचें सुरू केलें होतें हें खास. "

वरील उदाहरणावरून हें स्पष्ट होतें कीं, लहानपणच्या संवयींवर थोरपण पुष्कळ अंशीं अवलंबून असतें. ह्मणून लहानपणींच मुलांना उत्तम संवयी लाविल्या पाहिजेत. त्यांतून वेळाची काटकसर कशी करावी व कोणत्या कामाकडे किती वेळ घालवावा हें तर त्यांना अवश्य शिकविलें पाहिजे. नाहींतर लहानपणीं त्यांना फुकट वेळ घालविण्याची संवय लागली व वेळाचें मह-

त्व किती आहे हें त्यांना समजलें नाहीं; म्हणजे त्यांच्या सगळ्या जन्माचें मातेरें झालें असें खास समजावें.

वेळ उपटणारे मुख्य चोर पांच आहेत. त्या चोरांविषयीं नेहमीं आपण सावध असलें पाहिजे. पहिला चोर निद्रा. वाजवीपेक्षां फाजील निद्रा घेण्याची संवय कधीं ठेवूं नये. चोवीस तासांत सात किंवा आठ तास निद्रा घ्यावी. वैद्यांचें म्हणणें असें आहे कीं, सशक्त मनुष्य असला म्हणजे त्याला सात तास झोंप पुरे आहे. त्यांतून बिछान्याला पाठ लावतांक्षणींच जर त्याला झोंप येईल तर सहा तासमुद्धां ती पुरे आहे. आतां समजा कीं, निद्रेकडे म्हणून आपण सात तास काढून ठेविले आणि एखादे वेळीं आपणाला सहा तास निद्रा पुरे झाली, तर बाकीचा एक तास निद्रेपैकींच आहे असें म्हणून उगीच बिछान्यावर लोळत पडूं नये. तो तास जर विद्याभ्यासांत किंवा दुसऱ्या कोणत्याही उपयुक्त कामांत घालविला तर आपला केवढा फायदा होईल ! कित्येकांना झोंप झाल्यावर उगीच आंथरूणावर पुष्कळ वेळ लोळत पडण्याची संवय असते. ही संवय फार वाईट आहे. त्यानें नुसता त्यांचा वेळ जातो इतकेंच नाहीं तर त्यापासून प्रकृतीलासुद्धां अपाय होतो. शिवाय झोंप झाल्यावर मनाला जी हुषारी वाटते तीही नाहींशी होते. * कित्येकांना जेवल्याबरोबर दोनप्रहरीं

---

* वाजवीपेक्षां फाजील झोंप घेतल्यानें व झोंप झाल्यावर उगीच आंथरूणावर लोळत पडल्यानें प्रकृतीला काय अपाय होतात याचें प्र-

(पुढें चालू.)

निजण्याची संवय असते. त्यामुळें होतें काय कीं, दोनप्रहरचा वेळ फुकट जावयाचा तो जाऊन रात्रीचाही

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

ख्यात तत्ववेत्ते स्पेन्सरसाहेब यांनीं एके ठिकाणीं शास्त्रीयरीत्या विवेचन केलें आहे; ते ह्मणतात,– " जरूर असेल त्यापेक्षां जास्ती झोंप घेण्याकडे पुष्कळ लोकांचा कल दृष्टीस पडतो, इतकेंच नाहीं, तर प्रकृतीचें नुकसान होईल इतकी जास्त झोंप घेण्याची देखील पुष्कळ लोकांची प्रवृत्ति आढळून येते. झोंप ह्मणजे अर्थात् तितका कालपर्यंत सर्व इंद्रियांना अगदीं स्वस्थ ठेवणें होय. ह्मणून कांहीं विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे जर इंद्रियांस त्या अवस्थेंत ठेविलें तर तेणेंकरून उठल्यावर जास्त तरतरी वाटण्याच्या ऐवजीं माणूस गळाठ्यासारखा होतो. आधींच झोंपेंत काम नसल्यामुळें आपलीं इंद्रियें ताठलेलीं भसतात; ह्मणून पुरी विश्रांति मिळाल्यावरही त्यांस श्रमांचें उद्दीपन जर लागलेंच न मिळालें, तर तीं जणूं काय जास्तच निर्जीव होऊन जातात. तेणेंकरून दिवसा श्रम चालले असतां नेहमींप्रमाणें झीज भरून काढण्याचें जें त्यांचें सामर्थ्य तें कमी होतें. ह्याचा परिणाम असा होतो कीं, सगळा दिवस थकल्या थकल्यासारखें वाटत असतें. अंगांत सुस्ती कायम राहून अंगास आळेपिळे द्यावे, व वरचेवर लांब लांब जांभया काढाव्या, इकडे प्रवृत्ति होते. आह्मांस वाटतें कीं, बेताबाहेर झोंप घेतल्यामुळें ह्या गोष्टीचा अनुभव प्रत्येकास कधीं ना कधीं तरी आलाच असेल. तर मग प्रत्येकानें झोंप घ्यावी तरी किती? याबद्दल प्रत्येकास लागू पडतील असे बारीक नियम घालून देणें अशक्य आहे. ठोकळ नियम असा सांगतां येईल कीं, प्रकृति उत्तम असल्यामुळें ज्यांस फारशीं स्वप्नें वगैरे न पडतां गाढ झोंप लागते, त्यांनीं पहिल्यानें झोंपेतून जेव्हां पूर्णपणें जाग येईल तेव्हां केलाशक उठावें. त्यांनीं असें समजावें कीं, इतकी झोंप आपल्यास बस्स होय. एका अमेरिकन डाक्टर–ग्रंथकारानें असेंच सकारण सिद्ध करून दाखविलें आहे. ह्याचा अनुभव प्रत्येकानें घेऊन पहावा ह्मणजे असें आढळून येईल कीं, अशा रीतीनें मर्यादित झोंप घेतल्यानें दिवसास नेहमींपेक्षां विलक्षण रीतीचा जास्त उल्हास वाटतो. "

वेळ फुकट जातो. कारण दोनप्रहरीं झोंप घेतली म्हणजे रात्रीं झोंप येत नाहीं व रात्रीं झोंप न आल्यामुळें खरी विश्रांति मिळत नाहीं. करितां ज्या वेळीं झोंप घ्यावयाची त्यावेळींच ती घ्यावी व जितकी अवश्य पाहिजे आहे तितकीच ती घ्यावी.

दुसरा चोर आळस. जी गोष्ट आतां करावयाला पाहिजे आहे ती 'मग करूं, मग करूं' असें म्हणत उगीच रेंगाळत बसणें याचें नांव आळस. या जगांत आपण पाऊल टाकल्यापासून आपल्यावर पुष्कळ जबाबदारी आहे असें जेव्हां रात्रंदिवस आपण मनांत बाळगूं, त्यावेळीं आळसाचें आपणावर कांहींएक चालणार नाहीं. नाहीं तर त्यानें आपणाला अगदीं पछाडिलें असें समजावें. भर्तृहरीनें म्हटलें आहे कीं, 'आलस्यं हि मनुष्याणां शरिरस्थो महान् रिपुः' म्हणजे आळस हा मनुष्याच्या शरीरांत राहणारा त्याचा एक मोठा शत्रु होय. म्हणून त्याला त्यानें दूर झुगारून दिलें पाहिजे. त्याला दूर झुगारून देण्याचा मोठा व मुख्य उपाय हाच कीं, अमुक एक गोष्ट आपल्या हिताची आहे किंवा अमक्या एका गोष्टीपासून आपणाला सुख होतें म्हणून ती गोष्ट करावयाची असें केवळ आपण न समजतां ती गोष्ट करणें हें आपलें कर्तव्य आहे असें आपण समजलें पाहिजे. म्हणजे कामही शिल्लक रहात नाहीं व वेळही आळसांत जात नाहीं. आळसापासून मनुष्याची किती हानी होते, याचें दासांनीं वर्णन केलें आहे तें असें:—

" आळसें उदारनागवणा । आळस प्रयत्नबुडवणा ॥
आळसें करंटपणाच्या खुणा । प्रकट होती ॥ १ ॥
आळसें राहिला विचार । आळसें बुडाला आचार ॥
आळसें नव्हे पाठांतर । कांहीं केल्या ॥ २ ॥
आळसें नित्य नेम राहिला । आळसें अभ्यास बुडाला ॥
आळसें आळस वाढला । असंभाव्य ॥ ३ ॥
आळसें गेली धारणा धृती । आळसें मलिन झाली वृत्ती ॥
आळसें विवेकाची गती । मंद जाहली ॥ ४ ॥
आळसें निद्रा वाढली ॥ आळसें वासना विस्तारली ॥
आळसें शून्याकार झाली । सद्बुद्धि निश्चयाची ॥ ५ ॥"

तिसरा चोर कामाचा कंटाळा आला असतांना काम करणें. 'कायहो, सकाळपासून एकसारखें काम करितों पण अजून काम आटपेना!' हे उद्गार पुष्कळांच्या तोंडांतून निघतांना आपण ऐकतों. त्याचें कारण पाहूं गेलें तर हेंच कीं, त्यांना कामाचा कंटाळा आला तरी ते काम करीत असतात. त्यामुळें कामाकडे त्यांचें लक्ष लागावें तसें लागत नाहीं व कामही व्हावें तसें होत नाहीं. शिवाय वेळ फुकट जातो तो जातोच. अशा वेळीं काम सोडून घटका तास विश्रांति घ्यावी हें ठीक. अथवा कांहींतरी करावेंसें वाटत असून विवक्षित कामाचाच कंटाळा आला असल्यास काम बदलावें. ह्मणजे अंगांत तरतरी येऊन पुनः पहिलें काम झपाट्यानें होतें व गेलेला वेळही फुकट जात नाहीं.

चवथा चोर कामाला आरंभ न करितां उगीच बेत करीत बसणें. 'अमुक काम करावयाचें आहे नाहीं!

बरें तें कसें करावें? असें केलें तर कसें होईल? ' इत्यादि बेताखालींच सगळा वेळ जातो आणि काम राहतें एकीकडेच. करितां उगीच बेत करीत बसून कामाला सुरुवात न करितां सगळा वेळ बेतांत घालविणें ठीक नाहीं. यावरून कामाला सुरुवात करण्यापूर्वी बेत करूं नये असा अर्थ नव्हे. बेत करण्यांत कांहीं वेळ घालवावा पण त्यासारखें कामाला तरी लागावें. नाहींतर बेत करण्यांत सगळा वेळ आणि काम जागच्या जागींच, असें होऊं नये.

पांचवा चोर काम अर्धं करून तें तसेंच टाकणें. या चोरासारखा वेळ हिरावून नेणारा बिलंदर चोर दुसरा नाहीं. कारण आपला वेळ फुकट न जातां कामांत जातो असें दिसतें. पण काम अर्धंमुर्धं करून तसेंच टाकिल्यामुळें त्यापासून कांहींच उपयोग होत नाहीं. एक काम थोडें केलें न केलें तोंच दुसऱ्याला हात घालावयाचा. त्यामुळें घडपणें असें कांहींच होत नाहीं. निरनिराळीं कामें दररोज थोडथोडीं करावीं, करूं नयेत, असें नाहीं; पण जें काम हातीं घेतलें असेल त्याचा अगदीं शेवट लावावा. नाहींतर काम अर्धं करून तें तसेंच टाकिलें म्हणजे तें करण्याला जो वेळ लागला असेल तो फुकट गेला असें समजावें.

वर सांगितलेल्या पांच चोरांना जो बघत नाहीं त्याचा थोडासुद्धां वेळ फुकट जात नाहीं. आजपर्यंत जे जे पुरुष उदयाला आले ते वेळाचें महत्व फार मानीत. त्यांनीं जर आपला वेळ फुकट घालविला असता तर

जगांत आजपर्यंत जीं मोठमोठीं कृत्यें झालीं तीं कधींच घडतींना. यवनांनीं ज्या वेळीं हिंदूंचा छळ आरंभिला त्यावेळीं जर शिवाजी राजा स्वस्थ बसता तर मराठीराज्याची स्थापना होऊन हिंदुधर्म उदयाला आला असता काय? बाजीराव जर पाटावरून उठावें ताटावर बसावें व ताटावरून उठावें पाटावर बसावें असें करिता तर दिल्ली अटकेपर्यंत त्याच्या हातून झेंडे लागले असते काय? नाना फडणविस रात्रंदिवस घोरत पडून जर दिवस काढता तर 'नाना आहेत तोंपर्यंत या राज्यांत कोणाचें शहाणपण चालणार नाहीं,' 'मराठी राज्यांतलें शहाणपण सगळें नानाबरोबर गेलें,' असले उद्गार परकीयांनींही काढिले नसते. पाणिनी, भास्कराचार्य, न्यूटन यांनीं जर आपल्या अमोलिक वेळाचा योग्य उपयोग केला नसता तर व्याकरण, ज्योतिष, पदार्थविज्ञान इत्यादि शास्त्रांपासून सगळ्यांना आज जो फायदा होत आहे तो झाला असता काय? सारांश, अनेक राष्ट्रें, अनेक शास्त्रें व अनेक कला उदयास आणण्यांत ज्या महात्म्यांनीं आपला वेळ खर्च केला ते केवढे भाग्यवान् समजावयाचे!

वेळासंबंधानें प्राच्य भाषेमध्यें निपुण जो 'सर विल्यम जोन्स' याचें उदाहरण सर्वांनीं आपल्यापुढें ठेवण्याजोगें आहे. त्यानें आपला वेळ थोडा सुद्धां फुकट न जाऊं देतां त्याचा इतका कांहीं योग्य उपयोग केला कीं, विसावें वर्ष लागण्यापूर्वीच त्यानें ग्रीक, ल्याटिन, इटालियन, स्पानिश व पोर्टुगीज या भाषांचें पूर्ण ज्ञान सं-

पादन केलें, व अरबी आणि फारशी या भाषांचा बराच अभ्यास केला. वेळाची काटकसर केल्यानें व ज्ञान संपादन करण्याकरितां रात्रंदिवस परिश्रम केल्यामुळें तो इतक्या योग्यतेस चढला कीं, हिंदुस्थानांतील वरिष्ठ प्रतीच्या न्यायसभेंत त्याला सभासद नेमिलें. प्रत्येक तासाला त्यानें कोणकोणतें काम नेमिलें होतें, कोणत्या कामाला तो किती श्रम करीत असे व काम करण्याची त्याची तऱ्हा कशी होती, इत्यादि गोष्टींचें चित्तवेधक वर्णन त्याच्या चरित्रांत दिलें आहे. तें वाचलें असतां वाचकांचा पुष्कळ फायदा होईल. या ठिकाणीं फक्त त्याच्याबद्दल लॉर्ड 'जेफरे'नें आपलें जें मत प्रगट केलें आहे तें दिलें म्हणजे त्याचें एकंदर वर्तन कसें होतें याची कल्पना वाचकांच्या मनांत सहज येईल. तें मत येणेंप्रमाणें आहेः—" लहानपणापासून त्यानें उदार व सद्गुणी मनुष्याचें उदाहरण आपल्यापुढें ठेविलें व त्याचा प्रत्येक गुण आपल्या अंगीं येण्याबद्दल तो रात्रंदिवस खटपट करी. जरी तो घरचा गरीब होता तरी आपल्याला उत्तम प्रकारचें शिक्षण मिळावें व उगीच पदव्यांवर पदव्या मिळवून केवळ त्यांच्या नांवावर न विकतां सार्वजनिक काम करण्याची आपल्या अंगीं खरी योग्यता यावी व राज्यकारस्थानांचें पूर्ण ज्ञान होऊन आपल्या अंगीं खरा स्वाभिमान व खरा देशाभिमान यावा असें त्याला वाटत होतें. हा हेतु तडीस नेण्याकरितां त्यानें पुष्कळ श्रम व खटपट केली व त्यांत त्याला यशही आलें. ज्यांच्या अंगीं कांहीं कर्तृ-

स्वशक्ति आहे व जे उदयाला येण्याचे मार्ग हुडकीत असतील त्यांनीं 'सर विल्यम जोन्स'चें उदाहरण आपल्यापुढें ठेवावें. 'जोन्स'सारख्या ज्या ज्या लोकांनीं पाठीमागें आपलें नांव राखिलें, त्यांच्यासंबंधीं जसजसा अधिक विचार करीत जावा तसतसें आपणाला असें आढळून येतें कीं, दुःख, श्रम व हाल हीं भोगल्याशिवाय खरी योग्यता कोणाच्याही अंगीं येत नाहीं व दीर्घ परिश्रम आणि सतत उद्योग यांच्यापुढें तीव्र बुद्धि किंवा जबर स्मरणशक्ति यांचा मुळींच पाड नाहीं. "

या जगांत वेळ हा केवढा अमोलिक पदार्थ आहे ! त्यासारखा मनाला सुप्रसन्न करणारा व अंतःकरणाला उल्हसित करणारा दुसरा पदार्थ नाहीं. सुख, शांति, समाधान हीं सर्व कांहीं त्याचे ठायीं भरलीं आहेत. इतकेंच नव्हे, तर या जगांत कल्याणाचें निधान कायतो तो आहे. आतां कल्याण करून घेणें किंवा न घेणें हें सर्वथैव आपल्याच स्वाधीन आहे. कारण आपण करूं तसा वेळ होणारा आहे. एक त्याचा चांगला उपयोग करील; दुसरा त्याचा वाईट उपयोग करील. एक तो अमूल्य मानील; दुसरा तो कवडीमोल समजेल. एकाला त्याचें महत्व वाटेल; दुसऱ्याला तो क्षुल्लक वाटेल. एक तो काळजीपूर्वक खर्च करील; दुसरा त्याची उधळपट्टी करील. सारांश, जसा त्याचा सदुपयोग किंवा दुरुपयोग होईल तसें त्यापासून कल्याण किंवा अकल्याण होणार आहे. खरोखर वेळ ह्मणजे काय पदार्थ आहे, त्याचा सव्यय केला ह्मणजे काय फल मिळतें, अपव्यय केला

ह्मणजे काय परिणाम होतात ह्या गोष्टी जर आह्मांला कळतील, तर प्रत्येक मिनिटाबद्दल आपण किती काळजी घेऊं, आपला आळस झडून आपल्या अंगीं किती चलाखी येईल, कामाचा कंटाळा न करितां आपण तें किती आनंदानें करूं व एक मिनिट फुकट गेलें तर मनाला केवढी चुटपुट लागेल!

'कूपर' कवीनें नदी आणि काळ यांची तुलना केली आहे ती सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती अशीः—

ओव्या.

"नदी आणि काळ तुलितां। दोहींची गति एकचि तत्वतां॥
दिसे या जगीं, निरुपता। होईन मी अवधारां॥ १॥
दोघेंही पथीं जातां विश्रम। न घेती ऐसा जाण नेम॥
त्वरित जाताति करूनि काम। आपुलिया मनींचें॥ २॥
तयांची रोधावया गति। होई न समर्थ संपत्ति॥
लांच आमिष तयांप्रति। वश्य करूं असमर्थ॥ ३॥
रात्रंदिन करितां प्रार्थना। कोणी पदही परतेना॥
एकदां गेल्या वरि पुनः। परत न येती कदापि॥ ४॥
शेखीं दोघांसही अपार। गिळीतसे महासागर॥
ऐसें दोघांत साम्य थोर। परि भेद एक दिसताहे॥ ५॥
जलप्रवाह वृथा न वाहती। पथीं भूमी सुपिक करिती॥
फल, धान्य वाढवोनि क्षितीं। संतोषविती प्राणियां॥ ६॥
जया काळें करूनी ऐसें। ओदार्यें जनमनें भरावीं तोषें॥
तया उपेक्षितां होतसे। महाहानी सकळांची॥ ७॥
यया भेदें जाणिजें चतुरू। काळ आहे महा थोरू॥
महात्म्य तयाचें नये विसरूं। सत्कार्यीं लावा तयातें॥ ८"

'चेस्टरफील्ड' यानें आपल्या मुलाला वेळासंबंधीं जो उपदेश केला आहे तोही सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. तो ह्मणतो—" बाबारे, जितका वेळ तूं फुका घालविला, तितका तूं आपल्या हितास मुकलास; जितक्याचा तूं सदुपयोग केलास, तितकें तूं आपलें धन मोठ्या शहाणपणानें व्याजीं लाविलें असें समज. ह्या अल्प आयुष्याचा एक क्षण देखील निवळ आळसांत दवडणें ह्यासारखें दुसरें आश्चर्य नाहीं. तर वेळाचें मोल मनांत आण व जो क्षण येईल तो व्यर्थ जाऊं न देतां त्याचा चांगला उपयोग कर."

थोर लोकांचा कित्ता आपल्यापुढें ठेऊन त्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यानें आपलें वर्तन ठेवावें. स्वतःच्या उद्योगानें जो पुढें उदयाला आला व ज्याची या जगांत मोठी कीर्ति झाली त्या 'बेंजामिन फ्रांक्लिना'नें आपलें वेळापत्रक केलें होतें तें असें:—

सकाळ. ५–८ } उठणें, मुखमार्जन, प्रातःस्मरण; सगळ्या दिवसांत काय काय करावयाचें तें ठरविणें; रोजचा अभ्यास; चहाकाफी वगैरे सकाळचें खाणें.

८–१२ उद्योग.

दुपार १२–१ जमाखर्च करणें व भोजन करणें.

१–५ उद्योग.

संध्याकाळ ५–१० } सामान जागच्याजागीं ठेवणें; रात्रीचें जेवण; गायन किंवा दुसरी एखादी करमणूक; संभाषण; सगळ्या दिवसांत काय काय केलें त्याची तपासणी.

रात्र १०–५ झोंप.

या वेळापत्रकाप्रमाणें तो नेहमीं वागत असे. तो असें ह्मणे कीं, 'दिवस संपला ह्मणजे प्रत्येक मनुष्यानें आपण काय काय केलें त्याची तपासणी करावी. ह्मणजे आपण ठरविलें होतें काय आणि आपल्या हातून त्यांतलें झालें किती हें तेव्हांच कळून येतें व आपल्याला नियमितपणानें वागण्याची संवय लागते. माझी तपासणी मी दररोज करीत असल्यामुळें माझा मोठा फायदा झाला आहे.'

वेळाची काटकसर कशी करावी याविषयीं अनुभविक लोकांनीं कांहीं ठोकळ नियम काढिले आहेत ते असेः–

(१) एकदम सतराशें कामांना हात न घालतां एका वेळीं एकच काम करा. आणि सतराशें कामें उरकण्याचा जवळचा व सुलभ मार्ग हाच आहे.

(२) जें करावयाचें तें एकदम करून टाका.

(३) आजचें काम उद्यांवर टाकूं नका.

(४) तुमच्या हातून जें होण्यासारखें असेल तें दुसऱ्यावर ढकलूं नका.

(५) त्वरा चांगली; पण गडबड वाईट.

(६) काम लवकर संपावें याकरितां मध्यें पाहिजे तर थोडी विश्रांति घ्यावी.

रामदासस्वामींची अशी एक उक्ति आहे कीं, 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' ही प्रत्येकानें लक्षांत ठेवावी. 'असें वागा, तसें वागा,' असा उपदेश करणारे पुष्कळ लोक भेटतात; पण त्याप्रमाणें आचरण ठेव-

विरळा ! वर सांगितलेले नियमसुद्धां माहित अ-
णारे व त्याबद्दल उपदेश करणारे पुष्कळ लोक आ-
मच्या वाचकांत सांपडतील; पण स्वतः काळजीनें वेळ
खर्च करणारे किती निघतील? उपदेशापेक्षां आचरणा-
चा ठसा लोकांच्या मनावर जास्त उमटतो. बेताबातानें
व काटकसरीनें वेळ खर्च करणाऱ्या मनुष्याचें उदाहरण
जर आपल्यापुढें असेल तर त्यापासून वेळाचें महत्व
आपल्या मनांत जितकें बिंबेल, तितकें पुस्तकांतील शें-
कडों नियमांनीं किंवा वेळावर रात्रंदिवस वादविवाद
केल्यानें बिंबणार नाहीं. आजपर्यंत जे जे थोर पुरुष
होऊन गेले, त्यांना या जगांत आज जो एवढा मान
मिळत आहे त्याचें कारण ते वेळाचा योग्य व्यय करी-
त होते हेंच होय. मोठ्या योग्यतेस चढलेला एकादा
मनुष्य तुह्मीं दाखविला कीं, वेळाची काटकसर करणारा
मनुष्य तुह्मीं दाखविला असें झालें ! आपल्या शहाणप-
णानें ज्यानें जगाचा मोठा फायदा केला आहे किंवा
देशाभिमान बाळगून ज्यानें आपल्या देशाचा उत्कर्ष
केला आहे, अथवा भूतदयेनें ज्यानें हजारों जिवांचें क-
ल्याण केलें आहे, असा एकादा मनुष्य तुह्मीं दाखवि-
ला कीं, प्रत्येक मिनिटाचा ज्यानें उत्तम उपयोग केला
आहे तो मनुष्य तुह्मीं दाखविला असें झालें! ज्यांना
ज्यांना ह्मणून मोठमोठ्या कामांत जय आला आहे
त्यांना त्यांना वेळाचा उपयोग व महत्व हीं चांगलीं
कळत होतीं. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलि-
क हे अशांपैकीं एक होते. आपलीं कामें ते इतकीं

वक्तशीर करीत कीं, त्यांच्या जाण्यायेण्यावरून आपलीं घड्याळें लावीत !

इंग्लंडांतील प्रख्यात निबंधकार जो 'आडिसन' त्यानें वेळाचा सदुपयोग करण्याचे कांहीं मार्ग सांगितले आहेत ते असेः—

पहिला मार्ग हा कीं, आपल्या अंगीं लहान लहान सद्गुण आणण्याचा आपण प्रयत्न करावा. अशिक्षितांना शिक्षण देण्याबद्दल, दुःखितांचें दुःख निवारण करण्याबद्दल व अनाथांना साहाय्य करण्याबद्दल आपल्या हातून दररोज होईल तितकी खटपट करावी. एकमेकांत कलह माजून जर दुफळी होण्याचा रंग दिसत असेल तर त्यांचा समेट करण्याचा प्रयत्न करावा. सदाचरणानें वागणाऱ्या मनुष्याची अवहेलना जर चालली असेल तर ती कमी होण्याविषयीं झटावें. आपण कोणाचा द्वेष संपादन करूं नये व दुसऱ्या कोणाचा आपण द्वेष धरूं नये. आपण दुसऱ्यावर रागावूं नये व आपल्यावर कोणी रागावल्यास त्याचा राग आपण शांत करावा. दुसऱ्याबद्दल आपलें मन व आपल्याबद्दल दुसऱ्याचें मन दूषित होऊं देऊं नये. सारांश, हे व अशाच प्रकारचे व्यवहारांत उपयोगी पडणारे सद्गुण अंगीं आणण्याचा जो मनुष्य प्रयत्न करितो त्याचा वेळ चांगला जाऊन त्याच्या चित्तालाही समाधान वाटतें.

वरचे सद्गुण समाजांत आपण वागत असलों ह्मणजे आपल्या अंगीं आणितां येतात. पण ज्यावेळीं आपण समाजांत नसतों किंवा आपल्याबरोबर बोलण्यासवरण्या-

दुसरें कोणी माणूस नसतें व आपण अगदीं एकांतांत असतों, त्यावेळीं दुसऱ्या प्रकारचा एक सद्गुण आहे तो आपण अंगीं आणण्याचा प्रयत्न करावा. तो सद्गुण हा कीं, परमेश्वराच्या अगाध चातुर्याचें ज्ञान संपादन करून घेऊन त्याला अनन्यभावें शरण जावें. या सद्गुणाचा प्रभाव असा आहे कीं, तो अंगीं आणिला असतां त्याच्या योगानें आपला आत्मा शांत राहून मनाला मोठा आनंद होतो. शिवाय पूज्यभाव, एकाग्रता, नम्रता, कृतज्ञता हेही गुण त्याच्याबरोबर आपल्या अंगीं येतात. ईश्वराचा महिमा समजून घेण्यांत जो वेळ जातो तो कंटाळवाणा न वाटून अगदीं हां हां ह्मणतां जातो. त्यावेळीं आपण एकांतांत असतों असें दिसतें मात्र; पण वास्तविकपणें ईश्वर आपणाजवळ असतो व त्याजबरोबर आपलें भाषण सारखें सुरू असतें. ईश्वरमहिम्याचें चिंतन करण्यांत आपण दंग झालों कीं, दुःख, त्रास, निराशा हीं चटसारीं आपल्यापासून दूर पळतात व सौख्य, शांति आणि परमानंद हीं आपणास वरितात.

दुसरा मार्ग हा कीं, आपला उद्योग करून कंटाळा आला असल्यास कांहीं वेळ करमणुकींत घालवावा. आतां करमणूक करावयाची तीपासून आपला तोटा होऊं नये हें तर खरेंच, पण तीपासून दुसऱ्याला त्रासही पोहोंचूं नये किंवा दुसऱ्याच्या सुखाला व्यत्यय येऊं नये. जुवा खेळणें, दारू पिणें, बाहेरख्याली असणें ह्या करमणुकी कोण चांगल्या ह्मणेल? त्यामुळें आपण स्वतः पापांत पडून दुसऱ्यास पापांत पाडितोंच, पण शिवाय

त्यांपासून शरीरप्रकृति, द्रव्य व वेळ यांची नासाडी होऊन उलट हालअपेष्टा व क्लेश हीं भोगावीं लागतात ! असें असून कित्येक विद्वान व बुद्धिमान ह्मणविणारे सुद्धां आपला वेळ त्यांत घालवितात तेव्हां त्यांना काय ह्मणावें? त्यांना करमणूक पाहिजे आहे तर अश्लिल किंवा चावट नाटकें रंगभूमीवर येत नसल्यास नाटकगृह हें एक उत्तम साधन आहे. मित्रांबरोबर संभाषण करणें हें दुसरें एक साधन आहे. गाणें, चित्रकला, यांचा नाद असेल तर तींही चांगलीं साधनें आहेत. सारांश, शरीर व मन यांची सुधारणा होऊन जिवाला सुख मिळेल अशा करमणुकींत वेळ घालविल्यास कांहीं हरकत नाहीं.

वेळाचा योग्य उपयोग करणें हेंच या जगांत यशाचें खरें साधन आहे. वेळाचा योग्य उपयोग केला ह्मणजे आपलें हित होतें व वेळाचेंही चीज होतें. जो मनुष्य वेळाचा योग्य उपयोग करीत नाहीं त्याच्या अंगीं इतर पुष्कळ गुण असले तरी त्यांचें तेज पडत नाहीं. उलट 'इतके गुण अंगीं असून तो वेळाचा असा कसा दुरुपयोग करितो,' ह्मणून लोक त्याला दोष देतात. आळशी मनुष्य वेळाचा जीव घेतो व उद्योगी मनुष्य वेळाला जगवितो. वेळाचा सव्यय न करितां मनुष्य शंभर वर्षें जरी जगला तरी तो 'पुष्कळ दिवस जगला' असें ह्मणतां येत नाहीं. तसें असेल तर 'काकोऽपि जीवति चिरं च बलिं च भुंक्ते' या ह्मणप्रमाणें पुष्कळ दिवस जगणारे शेंकडों लोक सांपडतील. मग त्यांना 'जगले' असें ह्मणावें काय? वे-

ळाचा सदुपयोग करून ज्यानें आपल्या जीविताचें सा-फल्य केलें—मग तो थोडे दिवस कां जगेना—तोच 'पुष्कळ दिवस जगला' असें ह्मणावें. ज्ञानेश्वरांचा ए-कंदर कारभार २२ वर्षांत आटपला! पण त्यांनीं लिहि-लेल्या 'अमृतानुभव' व 'ज्ञानेश्वरी' या दोन ग्रंथांव-रूनच ते केवढे ज्ञाते, केवढे तत्वज्ञानी, केवढे विचारी व केवढे वक्ते होते याची साक्ष तेव्हांच पटते! शिवाय त्यांनीं आह्मां महाराष्ट्रीयांवर केवढे उपकार करून ठे-विले! खरोखर ज्ञानेश्वर, तुकाराम, शिवाजी महाराज अशा सत्पुरुषांनीं आपलें आयुष्य जसें खर्च केलें तसें जो आपलें अंशतः तरी खर्च करील तोच मनुष्य 'ज-गला' असें ह्मणतां येईल. नाहींतर जन्माला येणें काय आणि मरणें काय सारखेंच! एका संस्कृत कवीनें खरें जी-वित कशाला ह्मणावें याचें वर्णन केलें आहे तें असें:—

परिवर्तिनी संसारे मृतः कोवा न जायते ।
जातस्तु गण्यते सोऽत्र यः स्फुरत्यन्वयाश्रिकम् ॥ १
किं तेन जातु जातेन मातुर्यौवनहारिणा ।
आरोहति न यः स्वस्य वंशस्याग्रेध्वजो यथा ॥ २ ॥
यस्मिञ्जीवति जीवन्ति बहवः सोऽत्र जीवति ।
वयांसि किं न कुर्वन्ति चञ्च्वा स्वोदरपूरणम् ॥ ३ ॥

यज्जीव्यते क्षणमपि प्रथितं मनुष्यै-
र्विज्ञानशौर्यविभवार्यगुणैः समेतम् ।
तन्नाम जीवितमिह प्रवदन्ति तज्ज्ञाः
काकोऽपि जीवति चिरं च बलिं च भुंक्ते ॥ ४ ॥

पुस्तक २ रें अंक ५ वा.

हिंदुस्थानांतील

साडे चोवीस कोटी अज्ञान प्रजा

आणि

राष्ट्रीय सभा.

हिंदुस्थानांतील २९॥ कोटी प्रजेपैकीं पांच पंचवीस विद्वान गृहस्थांस असें वाटूं लागलें आहे कीं, **" आह्मी इंग्रज लोकांची बरोबरी करण्यासारखे झालों आहोंत, असें असून आह्मांस राज्यकारभारांतील मोठमोठाले अधिकार कां मिळूं नयेत ? "** राष्ट्रीय सभा उपस्थीत होण्यास ह्याच लोकांची आशा मूळ कारण झाली आहे. परंतु हिंदुस्थानांतील लोकांची योग्यता मोठमोठे अधिकार चालविण्यासारखी अद्याप झाली नाहीं व त्यांच्यांतील अज्ञान व त्यामुळें आपसांत धर्मबंधनाचा, जाति भेदाचा व भाषाभेदाचा मत्सर आणि आडपडदा हीं अद्याप गेलीं नाहींत. ते शुद्धअंतःकरणानें, एकीनें आणि प्रीतीनें वागत तोंपर्यंत देशबांधवांचे किंवा कोणत्याही लोकांचे कल्याणकर्ते ठरले जाणार नाहींत. असा इंग्रज लोकांतील स्पष्ट वक्त्यांचा नेटीव लोकांविषयीं महत्वाचा संशय आहे. तो दूर झाल्याशिवाय ते राष्ट्रीय सभेच्या मागण्यावर भरंवसा ठेवणार

नाहींत. असें या राष्ट्रीय सभेच्या उत्पादकांस वाटून ही राष्ट्रीय सभा हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या, सर्व मतांच्या, सर्व भाषांच्या, सर्व शहरांच्या, सर्व गांवांच्या आणि सर्व डोंगरी लोकांनीं निवडून पाठविलेल्या मुखत्यारांची आहे, असें हे लोक हिंदुस्थानांतील लोकांस व इंग्रेज लोकांस फक्त वर्तमानपत्रद्वारें कळवीत आहेत! परंतु राष्ट्रीय सभेच्या चालकांची ही शुद्ध लबाडी आहे. आतां ही लबाडी तिच्या नांवापुरती झाली. परंतु तिचें करणें जरी नांवाप्रमाणें असतें तरी तिच्या उत्पादकांस दोष देतां आला नसता.

राष्ट्रीय सभा जरी आपल्या नांवाप्रमाणें सजलेली नाहीं, परंतु तिची कृति उत्तम असती तरी "उपनांवापेक्षां गुणवान बरा" ह्मणणें जसें सर्वमान्य; तसाच या सभेच्या नांवाविषयींचा समज धरून आपण तिच्या गुणांविषयीं आणि कृतिविषयीं विचार करूं.

ह्या राष्ट्रीय मातेच्या नांवावरून तिचे गुणही चांगलेच असतील असें कित्येकांना वाटेल परंतु असा सिद्धांत ठोकून उपयोग नाहीं. कारण "नांव अन्नपुरणाबाई आणि घरांत कांहीं नाहीं." राष्ट्रीय सभेनें हिंदुस्थानच्या लोकांची आज पांच वर्षांत कितीशी कळकळ बाळगिली आहे हें तिच्या मागण्याविषयीं विचार केला असतां आपणांस सहज समजेल.

मोठ्या अधिकारांच्या जागा नेटीवांस द्याव्या; हें राष्ट्रीय सभेचें पहिल्या नंबरचें (मुख्य) मागणें आहे.

हें मागणें मागण्याचा हेतु असा आहे कीं, "जर आह्मी नेटीव लोक इंग्रज लोकांप्रमाणें विद्वान झालों आहों तर जसे इंग्रज लोकांना मोठमोठे अधिकार मिळतात तसे आह्मांस कां नसावेत?" दुसरें कारण "इंग्रज लोकांना हिंदुस्थान देशाची असावी तशी माहिती नसते ह्मणून आह्मांस लागतें एक आणि इंग्रज अधिकारी देतात एक! त्यामुळें हिंदुस्थानांतील लोकांचें नुकसान होतें." तिसरें कारण असें दाखवितात कीं, "इंग्रज लोकांप्रमाणें नेटीव लोकांस मोठाले पगार द्यावे लागणार नाहींत. यामुळें पैशाचा व्यय कमी होऊन रयतेवर कराचें ओझें वाढणार नाहीं." हे तीन मुद्दे मोठाले अधिकार संपादण्यासाठीं राष्ट्रीय सभेच्या पुढारी मंडळीनें पुढें आणिले आहेत. या संबंधी प्रथम आपण विचार करूं.

विद्वान झाला ह्मणजे तो राज्यकारभार चालविण्यास लायख झाला असें ह्मणतां येत नाहीं. छत्रपति शिवाजी, राजकार्यधुरंधर महादजी शिंदे, युद्धपटु मल्हारराव वगैरे महापुरुष विद्वान नव्हते; परंतु राज्य कारभारांत निष्णात असत. वर प्रदर्शीत केलेल्या पुरुषां सारख्य लोकांस विद्या असणें फार चांगलें खरें; तथापि नुसते विद्वानच उपयोगाचे नाहींत. त्यांचीं मनें साधुवृत्ति झालीं पाहिजेत. (साधु शब्दाचा अथ येथें प्रपंच त्याग करणें असा नाहीं.) हल्लींच्या सुधारलेल्या काळांत त्यांतून हिंदुस्थान सारख्या अनेक धर्माच्या व अनेक जातींच्या लोकांच्या देशांतील

जातिभेद मानणाऱ्या विद्वानांस हिंदुस्थानचा राज्य कारभार देणें ह्मणजे शांततेचा भंग करणें होय. जातिभेद न मानणारा असा विद्वान असल्या शिवाय त्यांस मोठाले अधिकार देणें मोठ्या धोक्याचें आहे. आणि तसे विद्वान नेटिवांत नाहींत ह्मणून नेटिवांस मोठाले अधिकार देणें बरोबर नाहीं. "इंग्रज लोकांस हिंदुस्थानांतील लोकांची असावी तशी माहिती नसते, ह्मणून त्यांच्या हातून चुका होतात" असें जें ह्मणणें आहे तें निव्वळ अभिमानाचें आहे. आमच्यापेक्षां रानटी आणि अज्ञान स्थितींमध्यें इंग्रज लोक होते, ते त्या स्थितींतून निघून आज आमच्याही पुढें ह्मणजे चांगल्या स्थितींत पोंहचले तरी आह्मी जर आमच्या स्थितीचा पालट करूं शकत नाहीं तर आमच्या अडचणी आह्मांस तरी कळतात ह्मणण्यास आह्मांस तोंड कोठें आहे? इंग्रज लोकांस आमच्या ज्या चुका किंवा अडचणी कळतात, त्या सुद्धां आमच्या आह्मांस एखाद्या क्षयरोग्याप्रमाणें कळत नाहींत! जसे ज्याचे त्याला दुर्गुण दिसत नाहींत अथवा कबूल करवत नाहींत तद्वत आमचें झालें आहे. कनिष्ट स्थितींतून उंच स्थितींत (त्यांतून जलद!) जाऊन पोंहचणें याचा अनुभव आह्मांपेक्षां इंग्रजांस अधिक आहे. आणि याबद्दल त्यांचें त्यांच्याजवळ संगतवार इतिहास ही आहेत. फार कशाला, आह्मांस आमच्या देशांतील खनिज द्रव्याची, इतिहासाची, भूगोलाची, धर्मसंबंधी दुर्बोध अर्थाची

इत्यादि महत्वाची माहिती उलट इंग्लीश ग्रंथांतून घ्यावी लागते! तर मग प्रजेच्या कोणत्या अडचणी असतात आणि त्या कशा दूर कराव्यात हें इंग्रज लोकांना आज नव्यानें शिकविलें पाहिजे असें नाहीं. ते सर्व जाणत आहेत. आमची पेशवाई नेटीव शहाण्या जातीच्या हातीं शंभर वर्षे होती, तेव्हां त्यांणीं काय दिवा लाविला तो सर्वांस माहीत आहेच. परंतु त्याच काळीं इंग्लंदांत राजकीय सामाजिक आणि धर्मसंबंधीं ज्या सुधारणा झाल्या तशा अद्यापपर्यंत देखील आह्मांत सुरूं झाल्या नाहींत! असें कां? हिंदुस्थानांतील ब्रिटीश प्रजेमध्यें हल्लीं जी कांहीं थोडी फार सुधारणेची चळवळ चालली आहे ती प्रमाणें अझून सुद्धां आमच्या राजेरजवाड्यांच्या संस्थानांत नाहीं! असें कां? नेटीव संस्थानांतील प्रजेनें व राजानें इंग्लीश लोकांस लाजविण्यासारखें व अनुकरण करण्यासारखें कोणतें उदाहरण करून ठेविलें आहे बरें? नेटीव संस्थानांतील मोठमोठे अधिकार तर युरोपियनांस नाहींत ना? आणि आपल्या संस्थानांतील सामाजिक व राजकीय सुधारणेच्या आड तर सरकार येत नाहीं ना? मग संस्थानिकांच्या प्रजेस इंग्लिश सरकारच्या प्रजेप्रमाणें तरी स्वतंत्रता, विद्यादान, न्याय, लोकोपयोगीं कामें वगैरे बाबींत कोणतें सुख आहे बरें? सुशिक्षीतांत गणिलेले व युरोपांतून अनेक वेळां प्रवास केलेले असे श्रीमान सयाजी महाराज पुण्यांतील डेक्कन असोशिएशनला

दरमहा दोनशें रुपये देत असतात. ते रुपये मराठे ह्मणविणाऱ्या जातीतीलच विद्यार्थ्यांस मदती दाखल मिळतात ! व ते असेच मिळावेत ह्मणून ठरविण्यांत राजपुरुषांस संकोच वाटला नाहीं तर ज्ञातिभेद मानणाऱ्या कोणत्याही पुरुषांस राज्यकारभाराच्या मोठ्या व लहान अधिकारावर असूं देणें इंग्रज लोकांस तरी कसें आवडेल ? आपणच कल्पना करा कीं, हल्लीं जीं हिंदुस्थानांत ठळक ठळक नेटीव संस्थानें आहेत व ती ज्यांच्या सत्तेखालीं चालतात त्या सत्ताधिशांस जर्णो काय गव्हर्नरचे अधिकार देऊन त्या प्रांतांतील प्रजा जनांची व्यवस्था पहाण्यास नेमिले आहे असें समजूं.तर अशा ह्या नेटिव अधिकाऱ्यांपैकीं कोणत्यानें वरें आपलें काम समदृष्टीनें, काटकसरीनें, आणि लोक सुधारणेस योग्य असें चालविलें आहे ? कोणत्या संस्थानांत आज ब्रिटिश राज्यांतील लोकांस आश्चर्य वाटण्यासारखें विशेष कांहीं झालें आहे ? कांहीं नाहीं! अन्याय, पक्षपात, जुलूम, उधळपट्टी, डामडौल आणि गरीब प्रजेची बेदाद हें मात्र कोणी पाहूं इच्छिल तर आह्मी प्रत्यक्ष दाखवूं शकूं. येथें कोणाचें नांव घालून कोणास दुखऊं नये इतकेंच. ह्मणून राष्ट्रीय सभेच्या चालकांस मोठाले अधिकार संपादण्याच्या मुद्याविषयीं आह्मी पुन्हां सांगतों कीं, इंग्रज लोकांनीं आतांच आमच्या हिंदुस्थानांतील जातिभेद मानणाऱ्या कोणत्याच गृहस्थास मोठाले अधिकार देऊं नयेत, इतकेंच नव्हें तर लहानसान अधिकार ही देऊं नयेत. मग तो

युरोपियन असो कीं नेटिव असो, कोणी कां असेना, सर्व भूतांचे ठायीं, द्वेषातें नेणेत्री कांहीं, आपपर जया, नाहीं चैतन्य जैसें; अशा मनोवृत्तीचेच पुरुष अधिकारांस योग्य होत. अमुक परिक्षा पास झाला ह्मणजे तो साधु झाला अथवा बुद्धीमान झाला असें ह्मणतां येत नाहीं. परिक्षांची मजल मारण्यासाठीं आठ आठ दहा दहा शिक्षक ठेवून खूप घोकमपट्टी उड़विली व कोणीकडून तरी विचारले प्रश्न सुटले कीं, आपण ही सुटलों !पुढें आहोंत ते आहोंतच ! असें बुकीश नांलेज किंवा पोपटी विद्वान शेंकडा नव्वद ह्मटले तरी चालतील. लहान वयांत परिक्षा दिल्यानें अथवा पांच सहा परिक्षा पास झाल्यानें आपणांस मोठाले पगाराची व बहुमानाची जागा मिळेल, या आशेवर शिकलेले लोक, लोकांच्या सुखदुःखाचा विचार करण्यास लायक झाले ह्मणतां येणार नाहीं. ज्या आशेनें ते शिकले ती आशा आधाशाप्रमाणें पूर्ण करण्याकडेसच त्यांचीं मनें बहुतकरून गुंगत असतात. ह्मणून लहान असो कीं, मोठा असो; कोणत्याही जबाबदारीच्या अधिकारावर ह्मणजे लोकांचें सुखदुःख ज्यांच्या रुकारावर अवलंबून अशा हुद्यावर जे लोक नेमणें ते विचार करून नेमावे. तुसत्या परिक्षा पास झाले ह्मणजे ते नीतिमान झाले असें होणार नाहीं. त्यांतून हिंदुस्थान देशांतील लोकांचें सुखदुःखाचा विचार करणें ह्मणजे आज जगांत येवढें मोठें भानगडीचें दुसरें कामच नाहीं. ह्या गंगाजमुनी देशाचे स्वामित्व तिन्हाइतांक-

डेस आहे. हेंच ठीक आहे. इंग्रज लोक आहेत ह्मणूनच आज हिंदुस्थानांतील लोकांस घर सोडून आंगणांत रांगतां येऊं लागलें आहे!!

नेटिव्हांस मोठाल्या पगाराच्या जागा दिल्यानें इंग्रज लोकांप्रमाणें मोठाले पगार द्यावे लागणार नाहींत. तेणेकरून पैशाचा बचाव होईल. असें राष्ट्रीय सभेच्या मंडळींचें ह्मणणें आहे. परंतु ही सबब स्वस्त माल घेण्यासारखी आहे. कुचकें किंवा सडकें धान्य खाऊन रोग करवून आणि मग आजार नाहींसा करण्यास औषधास पुष्कळ खर्च करीत बसावें या सारखें आहे. याचा अनुभव मागें होऊन गेलेल्या व हल्लीं चालू असलेल्या आपल्या राजधानींत पहाण्यास मिळतो. क्राफर्ड प्रकरणांत जो व्यापार घडला, तोंच मासला राजधानींत चालत असतो. रावसाहेबांना पगार काय? तर पंधरा! आणि घरांत इस्टेट पंधरा हजारांची!!! मग नोकरी मिळविण्यास पंधराशें गेलें ह्मणून काय झालें? पगारांतील रक्कम कमी झाल्याचें दिसलें परंतु त्याच्या शतपट प्रजेचा चुराडा झाला! तो अंधारांत कसा दिसावा? थोड्या खर्चांत कार्यभाग व्हावा हें तत्व आह्मांस कबूल आहे. थोड्या खर्चाबरोबर थोडाच लाभ होऊं लागणें अथवा थोड्या खर्चामुळें एका हातानें एकपट हित व दुसऱ्या हातानें दसपट नुक्सान होण्याचा संभव असल्यास काय उपायोग? लांच खाणें पाप आहे व तें पाप नाहींसें होण्यास सकाळीं संध्याकाळीं त्यांच्या

ठाणे.

नवळ उपाय असल्यास अशी पर्वा करण्यास ही मंडळी कशाला कमी करील ? लांच खाल्ल्यापासून आपणास क्षमा मिळणार नाहीं, नीतितत्वानें आपण मोठे दोषी ठरूं, लोकांच्या नाशास कारण होऊं आणि मग आपली अब्रु रहाणार नाहीं, व आपण नीच असे समजले जाऊं असें ज्यास वाटेल तोच ह्या निंद्य कर्मास भिऊन वागेल. परंतु आपण कितीही नीच कर्मे आचरलों तरी आह्मी श्रेष्ट ते श्रेष्टच ! अशी समजूत असणाऱ्या जातीचे व विचाराचे लोक फुकट नोकरीस राहिले तरी उपयोग नाहीं ! ! !

राष्ट्रीय सभेच्या लोकांनीं हत्याराची मोकळीक मागितली आहे ! ! २९॥ कोट प्रजेपैकीं १॥ कोट प्रजेस काय ते टफ करतां येतें. बाकी २४ कोट प्रजा शुद्ध अडाणी! व ही नुस्ती अडाणी असून एका धर्माची व एका जातीची आणि एका भाषेची व साधारण जवळ जवळ मताची जरी असती तरी बरें होतें. मग तिच्या ऐक्यतेविषयीं कोणास संशय आला नसता, परंतु हिंदुस्थानांत २४ कोट प्रजा अगदी अक्षरशुण्य अशी अडाणी असून त्यांचे धर्म, जाती, भाषा रीतीभाती ह्या परस्परांस विरुद्ध व अजाण. अशा एक नाहीं शेकडों जाती असतां त्यांच्या हातांत हत्यारें देणें खरोखर आपल्या हातानें आपणावर अरिष्ट आणून घेणें होय. अज्ञान अवस्थेमुळें आज २४ कोट प्रजा केवळ पशुप्रमाणें आयुष्यें लोटीत आहे, हें स्पष्टपणें राष्ट्रीय सभेच्या उत्पादकांस

माहीत असून त्यांनीं ह्या लोकांस ज्ञानामृत पाजून जिवदान देण्याचा मुख्य व महत्वाचा उपाय प्रथम करावा परंतु हा उपाय ह्या लोकांनीं जाणूनबुजून केला नाहीं. हा द्वैतभाव व हें कपट आज सुशिक्षीत जातींचे लोक जर ह्या एकूणीसाव्या शतकांतहीं करण्यास भीत नाहींत व सुधारलेल्या देशांतील लोकांस भिऊन अथवा लाजून २४ कोट प्रजेस नुस्ते साधारण प्रतीचेही शिक्षण मिळवून देण्याविषयीं खटपट करीत नाहींत तर हे राष्ट्रीय सभेचे लोक विद्येंत मागे असलेल्या लोकांचें पाऊल कधींच पुढें पडूं देणार नाहींत, हें सिद्ध होतें. हे आमच्या डोळ्यांत धडधडीत माती टाकतात तर यांच्यावर आह्मी भरंवसा तरी कसा ठेवावा ? मात्र हे लोक येऊन जाऊन इंग्रज लोकांच्या डोळ्यांतील कुसळ काढण्यास धांवत असतात परंतु आपल्या डोळ्यांतील मुसळ यांना दिसत नाहीं! हे ह्मणतात कीं, आह्मांस लागतें एक आणि इंग्रज सरकार आह्मास देतें एक. परंतु हिंदुस्थानच्य २४ कोट शुद्ध अडाणी प्रजेस विद्यामृता शिवाय खरोखर तिच्या उन्नतीस दुसरा कोणताच उपाय योग्य ठरणार नाहीं व हितावह होणार नाहीं हें जर येथल्या येथे ह्या नेटिव्ह लोकांस कळत नाहीं तर मग यांना कळतें तरी काय ? ते या महात्वाच्या गोष्टीस बाजूस ठेऊन हत्याराची मोकळीक मागत आहेत! ह्मणजे शुद्ध लबाडी, कपट, अथवा अज्ञान नव्हें काय ? अज्ञान प्रजेच्या हिताच्या गोष्टींचा विचार न करितां

त्यांचां नाश होणाऱ्या हत्यारांचा खेळ त्यांच्या पुढें ठेवणें ह्मणजे खुद्द सुशिक्षीत जातीचे लोक जाणून सवरून आपणावर विघ्न आणून घेत आहेत. हें कपट किंवा नाक खाजविणें आज नाहीं उद्यां अज्ञान वर्गास कळूं लागलें ह्मणजे हातांत आहेत तींच हत्यारें चार पायाच्या लांडग्यावर व वाघावर न चालवितां ह्या द्विपाद सोकवलेल्या वाघ लांडग्यावर चालविण्यास कमी करणार नाहींत. कारण त्यांच्या हितांचें जें "विद्यादान" तें त्यांस न देतां भलतेंच द्याल तर गरज एकाची आणि देतां एक असें होणार नाहीं काय? आणि तें त्यांना कसें आवडेल? तें ह्या कसुरीबद्दल त्वेषास पेटून त्यांना कळेल तेव्हां सूड घेण्यास मागें पुढें पहाणार नाहींत. निशस्त्र असल्यामुळें शेतकरी वगैरे जंगलांत जीव कंठणारांतील कांहींचे प्राण वाघ लांडग्यांच्या जबड्यांत पडत असतील परंतु २४ कोट शुद्ध अक्षरशुन्य प्रजेंत अज्ञानपणामुळें काय अनर्थ होऊन राहिले आहेत व त्यामुळें दरसाल किती मनुष्यें काळाच्या जबड्यांत सांपडतात याचा विचार राष्ट्रीय सभेनें काय केला? ती का हिंदु धर्म शास्त्राप्रमाणें आमच्या लोकांचे जीव किडे मुंग्या प्रमाणें अद्याप समजत आहे काय? निशस्त्रपणामुळें दरसाल मरणाऱ्या लोकसंखेपेक्षां केवळ अडाणपणामुळें मरणारांची संख्या शंभर पट अधिक आहे!! अज्ञानानें लोकांस अत्यंत गांजलें आहे व त्यामुळें कोट्यावधि लोकांचे जीव अनेक दुर्गुणांत, दुर्व्य-

सनांत, यातायातींत, भांडण कज्जांत, वेड्या समजुतींत, आत्महत्येंत, गर्भपातांत, विष प्रयोगांत, व औषधाचे कमतरतेंत दरसाल जात अहेत. याची माहिती आमच्या राष्ट्रीय सभेस कशी लागली नाहीं? सरकारनें मनुष्य मरणाचें रजिष्टर ठेवलें आहे, त्यांत मनुष्याच्या मरणाचें कारण स्पष्टपणें लिहिण्याचें ठेवलें तर तुह्मांस आश्चर्य वाटेल कीं, शस्त्रें नाहींत ह्मणून मनुष्यें मरतात त्याच्या शंभर पट शहाणपण नाहीं ह्मणून मरतात. नीतीशिक्षण मिळावें ह्मणून सरकार काळजी बाळगते आणि आज २४ कोट प्रजेस शिक्षणच मिळत नाहीं तर त्यांना नीतिशिक्षण कोठून मिळावें? अशा लोकांत अनीतीनें त्यांच्या मालमतेचें व जिवित्वाचें कितपत नुकसान होत असेल याचा विचार जरी आमचे लोकांस तुर्त करतां येत नाहीं तरी कांहीं काळानें ह्याचा सर्व हिशेब ते हल्लींच्या सुशिक्षीत लोकांपुढें अथवा त्यांच्या संतती पुढें ठेऊन हा अपराध त्यांच्या पदरांत घालण्यास धजतील. ह्मणून हल्लींच्या सुशिक्षीत जातीस आमचें इतकेंच ह्मणणें आहे कीं, तुह्मी सरकाराजवळ हत्याराची मोकळीक मागण्यापेक्षां २४ कोट प्रजेंत सक्तीनें फुकट शिक्षण देण्याची मागणी केल्यास सरकार हत्यारापेक्षां इकडे अवश्य लक्ष देईल.

व्हालेंटीयरमध्यें नेटिवास सामील होतां यावे ह्मणून राष्ट्रीय सभेच्या उत्पादकांनीं मागणें मागितले आहे. अहो कोट दीड कोट लोकांस मोकळा वेळ

मराठी ग्रंथ संग्रहालय

मिळण्याचा संभव आहे. परंतु २४ कोट प्रजेनें संसार यातनेंतून आपला कोणता वेळ कवायत शिकण्याकडे खर्च करावा ? तुह्मांस दहा वाजतां ऑफिसांत जाण्यानें आणि चार पांच वाजतां घरी येण्यानें सकाळी संध्याकाळी रिकाम्या वेळीं कवायत शिकण्यास फुरसत मिळण्याजा संभव आहे. परंतु चोवीस कोट प्रवेस सारा दिवस कावाडकष्ट करून पोट भरण्याची मारामार अशास राष्ट्रीय सभेच्या ह्या मागण्या पासून लाभ होणार नाहीं. हें तुम्हाला माहीत असूत जर तुम्ही हें मागणें मागत आहांत तर तुम्ही हें मागणें स्वतः करतांच मागत आहांत, हें सिद्ध होतें. चोवीस कोट अज्ञान प्रजेविषयीं तुम्ही केलेल्या हेळसांडपणामुळें अज्ञान लोक तुम्हांवर रागावून तुम्हांस छळतील, हेंच तुम्ही मनांत आणून त्यांचें पारीपत्य करण्या करितां तुम्ही लढाऊ होऊं इच्छिता काय ? तुम्हांस आम्ही सुचवावें असें नाहीं. तुम्हांस सिव्हिल वारची धडकी व आम्हांस निःक्षत्रियाची धडकी बसली आहे म्हणून समजतां काय ?

मिठावरचा व जमिनीवरचा कर कमी करण्याविषयीं सरकारास सुचविलें आहे. ह्या मागण्या व सर्वच मागण्या आजच मागण्यांत आल्या असें नाहीं, सुशिक्षीत लोकांचा उघड उघड मतलब दिसूं नये आणि हिंदुस्थानांतील सर्व प्रजेकरितां राष्ट्रीय सभा ऊर बडवीत आहे असें सर्वांस वाटावें (आणि असें केल्यानें आपलें इष्ट कार्य सिद्ध होईल) म्हणून ह्या मागण्या

अगदीं शेवटीं मागितल्या आहेत. मिठाचा व जमिनीचा सारा कमी झाल्यास चोवीस कोट अज्ञान प्रजेच्या हिताचें आहे हें आम्ही कबूल करतों. परंतु ह्या उत्पन्नांत जर सरकार खाडा पाडून घेण्यास इच्छील असें तुम्हांस वाटतें तर मग कोट्यावधि अज्ञान व गरीब लोकांस फुकट शिक्षण देण्याचें कबूल करणार नाहीं असें तुम्हांस वाटतें काय ? मिठावरचा आणि जमिनीवरचा कर कमी झाल्यापासून २४ कोट प्रजेचें हित होण्याचा जो संभव आहे त्याच्या सहस्र पटीनें जास्त नुकसान विद्या नसल्यामुळें होत आहे. एखाद्या अज्ञानी, दुर्व्यसनी, आणि उधळ्या पुत्रास शहाणपण देण्याचे कामीं खर्च न करितां त्याजवळ मुकाट्यानें लाखों रुपये बापानें दिले तर त्यापासून काय हित होणार आहे ? तो अधिकाधिक निरुपयोगी आणि अपायकारक बाबींत पैशाची उधळपट्टी करील. हा विचार त्या अज्ञानी पुत्राच्या बापानें अगोदर नको कां करावयाला ? त्यास पाहिजे त्या वस्तु तुह्मी जरी आणून दिल्या तरी तो जर छंदी, मूर्ख दुर्व्यसनी, आणि दुराचारी आहे तर तो त्या वस्तूंचा वाईटच उपयोग करणार आहे. यासाठीं अशा पुत्रांस (२४ कोट अज्ञान लोकांस) प्रथम शाहणे करण्याच्या कामीं त्यांच्या वडिलांनीं (१ कोट सुशिक्षीत लोकांनीं) तन मन धन खर्च करणें हेंच त्यांस उचित आहे. याखेरीज जो पिता इतर खटाटोपी करील, तो पिता त्या पुत्राचा कितपत हितकर्ता आहे अथवा कितपत

पुत्राविषयीं माहितगार आहे, हें उघड दिसून येतें. यासाठीं सकल सूज्ञ लोकांस आमची अशी विनंती आहे कीं, तुह्मी अज्ञान लोकांचें खरें कल्याण ज्यांत आहे अशा गोष्टी प्रथम सुरूं करा, आणि मग इतर राष्ट्रीय सभेच्या मागण्यासारख्या उठाठेवी करीत बसा. अज्ञान प्रजेचे तुह्मी खरें हितचिंतक (बाप) आहांत, हें तुह्मी आपल्या व त्यांच्या संततीस कृती रुपानें करून दाखवा. असें केल्यानें कोणाचा कोणावर रोष न रहतां भावी गुदरणारा भयंकर प्रसंग टळेल, हें चांगलें लक्षांत ठेवा. नाहींपेक्षां तुह्मी जाणून सवरून चालविलेल्या हेळसांडीबद्दल पुढें मोठा भयंकर कलह माजणार आहे, व त्या योगानें सर्व देशांत हाहाकार होऊन राष्ट्राचा नाश होण्याचा संभव आहे. तुम्ही (राष्ट्रीय सभानुयायी) मुद्दां या देशांतील लोकांच्या सार्वजनिक अडचणी विषयीं गैरमाहितगार आहांत असें तुमच्या सांप्रतच्या कृतीवरून विचारवंत लोकांस सहज समजणार आहे. दयाळु इंग्रज सरकार जवळ मोठमोठाले अधिकार, हत्यारांची मोकळीक, व्हालंटिअरचे अधिकार, पलटणींतील हुद्दे, इत्यादि मागण्या मागणें आणि अज्ञान प्रजेस साधारण प्रतीचें शिक्षण फुकट देण्याविषयीं अथवा तीस विद्या प्राप्त करून देण्याच्या कोणत्याही मार्गाविषयीं विचार न करणें ; या वरून इंग्रज लोकांस तुमचा वहीम येणार नाहीं काय ? आणि या मुळें तुम्हां बरोबर सर्वांचेंच नुकसान होणार नाहीं काय? तुम्ही म्हणतां कीं, आम्ही

राष्ट्रीय सभावाले लोक हिंदुस्थानांतील सर्व लोकांच्या वतीनें आलों आहोंत. तेव्हां हें तुमचें म्हणणें खोटें पाडण्यासाठीं चोवीस कोट अज्ञान प्रजेस सरकारास ही गोष्ट कळवून आज नाहीं उद्यां केव्हां तरी इलाज करून दोष मुक्त होणें भाग पडणार आहे. कारण ज्या अर्थी तुमच्या मागण्यांत चोवीस कोट अज्ञान प्रजेचे हिताचें विशेष कांहीं नाहीं, त्या अर्थी राष्ट्रीय सभेस आमचें अंग नाहीं असें प्रसिद्धपणें म्हणण्यास काय हरकत आहे ? आणि असें करण्यांस त्यांणीं बिलकूल विलंब लाऊं नये असें आम्हीं म्हणतों. परंतु अज्ञान लोकांस आपलें हित अनहित कशांत आहें हें चांगलें समजत नाहीं म्हणून त्या सर्वांच्या हातून सांप्रत जरी व्हावा तसा प्रयत्न झाला नाहीं तरी आमचे राजकार्य धुरंधर इंग्रज सरकार या गोष्टींचा पूर्ण विचार केल्या शिवाय राहणार नाहीं. मूठभर लोकांच्या भेडविण्यानें भिवून इंग्रज सरकार सर्व प्रजेची पायमल्ली करणार नाहीं, हें आह्मी समजून आहोंत; तथापि कोव्यावधि अज्ञान प्रजेच्या हितचिंतकांनीं अशा संधींत स्वबांधवांविषयीं डोळे झांक न करितां ह्या राष्ट्रीय सभेस कोणत्याहि प्रकारें साह्य करूं नये व मत देऊं नये. उलट स्पष्टपणें सरकारास आमची राष्ट्रीय सभेस सम्मती नाहीं असें कळविण्यास पुढें यावे.

समाप्त.

नि. 23

वृद्धपणीं लग्न करण्यापासून अनर्थ

व

या संबंधानें

भारताचें थोडक्यांत सार.

हें पुस्तक,

गोविंद बाबाजी जोशी

यांनीं तयार केलें

तें

मुंबई येथें

इंदुप्रकाश छापखान्यांत छापिलें.

सन १९०१.

आरंभीं दोन शब्द.

—0—

पुष्कळ दिवसांपासून मनांत होतें कीं, वृद्धपणीं लग्न कर-ण्यापासून कसे कसे अनर्थ घडतात याबद्दल एक लहानसें पुस्तक लिहावें व त्यांत युरोपखंडांतील व आपल्या देशांतील कांहीं माहिती द्यावी.

सांप्रत 'शारदा नाटक' वगैरे कांहीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत व त्यांचे खेळ मोठमोठे शहरीं होतात; पण खेड्यापाड्यांत, तालुक्याच्या गांवीं ते खेळ होत नाहींत. अशा गांवचे लोकांनीं या संबंधानें कसे यत्न करावे हें या पुस्तकांत थोडक्यांत सांगितलें आहे.

जर या पुस्तकापासून थोडेंसें हित झालें तर माझ्या य-त्नाचें सार्थक झालें असें मी समजेन.

वसई,
ता. १-१२-१९०१. } गोविंद बाबाजी जोशी.

अनुक्रमणिका.

	विषय.	पृष्ठ.
१	नवरदेव होऊं इच्छिणारे ह्यातारे गृहस्थास पाठविण्याचें पत्र	१—१०
२	युरोपचे इतिहासांतील कांहीं हकिकत....	११—१४
४	भारत ग्रंथांचें सार.	१५—२३
४	वृद्धपणीं लग्न करूं इच्छिणाऱ्या ह्याताऱ्याचें मन परावृत्त होण्यास गांवकऱ्यांनीं कसा यत्न करावा.....	२४—२५
५	दोन ह्याताऱ्यांचे लग्नाची चमत्कारिक हकिकत.	२६
६	कविता, ह्याताऱ्या नवऱ्याचा तरुण पत्नीचे सहवासाचा अनुभव.	२७—२८
७	कविता, तरुण पत्नीचा ह्यातारे नवऱ्याचे सहवासाचा अनुभव.	२९—३०

नवरदेव होऊं इच्छिणारे ह्यातारे गृहस्थास पाठविण्याचें पत्र.

विनंति—तुह्मी आपल्या वयाकडे न [illegible] लग्न करण्याची तजवीज चालविली आहे हें ऐकून फार फार वाईट वाटतें. हिंदुशास्त्राप्रमाणें लग्न ह्मणजे जन्माचें बंधन. एकदा तें बंधन जोडलें गेलें ह्मणजे मग जन्मपर्यंत सुटत नाहीं. याकरितां अशीं कृत्यें करतांना उताविळपणा अगदीं उपयोगाचा नाहीं. याचा तुह्मीं अगदी विचार करित नाहीं. आणि "उतावळा नवरा व गुढग्याला बाशिंग" अशी वर्तणूक करितां हा मोठा चमत्कार आहे.

कोणतेंही विशेष जोखमाचें काम करते वेळीं पुष्कळ लोक आपल्या स्नेह्यांस व इष्टमित्रांस विचारून मग अशा कामांत पडतात. त्याप्रमाणें आपण वागलां असाल असें आह्मांस वाटत नाहीं. कारण खरा मित्र तुह्मांला लग्न करण्याविषयीं कधींही मत देणार नाहीं.

पन्नाशी उलटून गेल्यावर विषयोपभोगाची किती तरतरी पुरुषांत राहते, याचें तुह्मीं आपले मनाशी चांगलें मनन करा, यौवन दशा पावलेल्या स्त्रियांस वृद्धपतीपासून सुख होत नसल्यामुळें स्त्रिया कशा पापाचरणला प्रवृत्त होतात, आणि त्या योगें पतीस पुढें पावलीं पावलीं कशी गैरअब्रु सहन करावी लागते याचीं उदाहरणें खुद्द तुमचे गांवचीं व आसपासचे गांवचीं तुह्मांस माहित नसतील असें नाहीं.

आरंभीं दोन शब्द.

—0—

पुष्कळ दिवसांपासून मनांत होतें कीं, वृद्धपणीं लग्न करण्यापासून कसे कसे अनर्थ घडतात याबद्दल एक लहानसें पुस्तक लिहावें व त्यांत युरोपखंडांतील व आपल्या देशांतील कांहीं माहिती द्यावी.

सांप्रत 'शारदा नाटक' वगैरे कांहीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत व त्यांचे खेळ मोठमोठे शहरीं होतात; पण खेड्यापाड्यांत, तालुक्याच्या गांवीं ते खेळ होत नाहींत. अशा गांवचे लोकांनीं या संबंधानें कसे यत्न करावे हें या पुस्तकांत थोडक्यांत सांगितलें आहे.

जर या पुस्तकापासून थोडेंसें हित झालें तर माझ्या यत्नाचें सार्थक झालें असें मी समजेन.

वसई,
ता. १-१२-१९०१. } गोविंद बाबाजी जोशी.

पत्नीचा यौवन दशेस चढलेला सूर्य आपल्या तेजोमय प्रभेनें मध्याकडे येत असतो, ह्मणजे भर ज्वानीचीं सर्व चिन्हें पत्नीचे मुखावर खुलत असतात, आणि तिकडे पतीकडे पाहिलें तर त्याचा 'भानु' भ्रमण करित करित अस्ताचलाकडे मावळण्यास जात असतो आणि त्या योगें त्याचे तोंडावर (जरेमुळें) प्रेतकळा दिसत असते.*

त्यायोगें थोडक्यांत सांगितलें तर दोघांत अगदीं "तिरपगडें" होऊन राहतें. (यास गुजराथी भाषेंत "कजोडा"

---

*मोरोपंतांनीं वृद्ध पुरुषाचे स्थितीविषयीं एक्या केकेंत वर्णन केलें आहे तें असें-म्हातारा, देवास म्हणतो, ॥ कृतांत कटका मलध्वज जरा दिसों लागली ॥ पुरस्सर गदासवें झगडतां तनु भागली ॥ सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा ॥ नहीं जरि उतावीस्वरिपु कापितो हा गळा ॥ १ ॥ कृतांत म्हणजे (यमधर्म) याचे लष्कराची विमलध्वजा (निशाण जें लष्करापुढें सर्व काळ चालत असतें)तिनें माझे शरीरावर अमल केला आहे म्हणजे म्हातारपणामुळें सर्व केंस पांढरे झाले आहेत. त्याच प्रमाणें यमाचे सरदार रोगादिक (आंगांत वारा मारणें, खोकला होणें, सर्व अवयवांनीं आपलीं कामें बरावर न करणें, सांधे धरणें इ०) त्यांचे आधीन माझें शरीर होत चाललें आहे. तर हे देवाधि देवा तुझे चरणापाशीं मला लौकर घेऊन जा, असा या केकेचा अर्थ आहे. ह्मातारे बाबा, या अर्थाशीं तुमचें शरीर कितपत मिळतें आहे याचें मनन करा, यमाची विमल ध्वजा, ह्मणजे केंस पिकणें, त्याच प्रमाणें शरीरांत वायूचा जोर होणें, सांधे धरणें, खोकला होणें, निजते बेळीं उशाशी करवंटी ठेवावी लागणें, याच्याशीं तुमची शरीरप्रकृति मिळती झाली आहे काय, याचेंही मनन करा आणि मग लग्नाची उठाठेव करा.

हा अगदीं बरोबर शब्द आहे) आणि त्या योगें पुढें गांवकऱ्यांच्या व उनाड पोरांच्या उपहासास मात्र तें दंपत्य प्राप्त होतें. पतीस वाटतें कीं पत्नीनें मजपाशीं वारंवार यावें, हास्य वदनानें मजकडे पाहावें, गोड गोड बोलावें, पण त्या बालपत्नीस त्याची ती इच्छा विषासमान वाटत असते. साधारण नियम या (बालावृद्धा) दंपत्यांत असा असतो कीं, पत्नी जों जों त्याचा अव्हेर करित असते, तों तों म्हातारा पती ज्यास्तच लाडी गोडी लावण्यास पुढें पुढें जात असतो आणि पत्नी त्याचा धिक्कार करित असते. तीस त्या म्हाताऱ्याचे अंगाची बुरसट घाण अगदीं सहन होत नसते; तो जर माजघरांत आला तर ती स्वैंपाक घरांत किंवा मागील दारीं जात असते; असे लपंडाव चालतात. भिक्षुकी किंवा रोजगार धंद्यामुळें जर म्हाताऱ्यास बाहेर गांवीं राहणें भाग असलें, तर तो रविवार अगर सवड केव्हां येईल, हें पाहून मोठे हुरूपीनें घरीं येतो, पण बालपत्नीस तो मोरोपंताचे आर्ये प्रमाणें "आला कीं काय काळसा वाटे" असा प्रकार होतो. थोडक्यांत सांगितलें तर माकडाचे तमाशांतील 'देवजी धसाडया' आणि 'रत्नी पोरी' प्रमाणें मग दोघांत माकडचेष्टा चालतात. कांहीं ठिकाणीं या रात्रंदिवसाचे त्रासास कंटाळून उच्छृंखळ पोरी निघून गेल्याचीं उदाहरणें वर्तमानपत्रांत वारंवार वाचण्यांत येतात.

पतीचे अंगीं त्याचे वयाप्रमाणें पोक्तपणा आलेला असतो, व त्या प्रमाणें त्याचें वर्तन घरांत बाहेर सभ्यपणाला धरून असतें; पण इकडे पत्नीकडे पाहिलें तर सर्व प्रकार अगदीं उलट असतो; घरांत सासु असली, तर कांहींसें वळण

लागण्याचा संभव असतो. बाळपणाचे धावरे स्वभावास थोडीशी अटक राहते, पण अशा स्थळीं ह्मणजे ह्माताऱ्या नवऱ्याच्या घरचीं सर्व वडील माणसें श्राद्धपक्षाशिवाय घरीं राहतच नसल्यामुळें दाब ठेवणारें, मायेचें कोणी नसावयाचें, कदाचित् कांहीं दूरदूरची मंडळी असली तर ती आश्रित किंवा परकी असल्यामुळें कार्यसाधु आणि बाईसाहेबांचे शब्द झेलणारी अशीच असावयाची. त्यामुळें त्याच्या ह्मणजे ह्माताऱ्या नवऱ्याच्या संसाराची पुढें फारच दुर्दशा होते.

पतीस वाटतें कीं, माझे पत्नीनें वारंवार ओटीवर, दिवाणखान्यांत जाऊं नये, परक्यांशीं फारसें बोलूं नये, शेजारच्या मुलांशीं वारंवार बोलूं नये, त्यांच्या तोंडाकडे पाहूं नये, खिदळूं नये, रस्त्यांतून चालतांना खालीं मान घालून चालावें, पदर, ओंचा, जेथच्यातेथें असण्याविषयीं काळजी घ्यावी. इ० इ०

पण इकडे पाहिलें तर पत्नीचा बालपणा समाप्त जालेला नसतो. तशांत ती हलके कुळांतून आलेली असल्यामुळें तिचा सर्व कांहीं प्रकार माहेरच्या वळणाप्रमाणेंच असावयाचा. एखादे बारा पंधरा वर्षांचे मुलास सांगितलें कीं, बाळा, तुझे अंगीं (किनई), चाळीस पन्नास वर्षांचे पुरुषाप्रमाणें पोक्तपणा येऊं दे, तर तसें होईल काय ? तोच प्रकार या पोक्त नवऱ्याचे बालपत्नीचा असावयाचा.

तशांत अशा बिजवरास आणि त्यांत पन्नाशीच्या किंवा साठीच्या घरांत आलेल्या (जरठ) नवरदेवास आपली मुलगी देणारा कुलवान् असेल काय ? छी, छी, कुलवान् गृहस्थ असें (कसायाचें) काम कधींही करणार नाहीं.

तर अगदीं हलका, नीच कुळांतीलच 'खाटीक' पोटचा गोळा विकून धनाची आशा करणारा असावयाचा. अशा हलक्या कुळांत मोठ्या झालेल्या मुलीचे अंगीं पतीच्या प्रौढ घराण्याचें सभ्यपण कसें यावें? कधींही यावयाचें नाहीं. आणि त्या मुळें पत्नीस पतीनें केलेला उपदेश मुळींच ठसत नाहीं यांत नवल तें कोणतें? तिला तें पतीचें बोलणें चमत्कारिक वाटतें आणि त्या योगें 'मूर्खाला काहाणी' असा उपदेशाचा परिणाम होतो.

वारंवार उपदेश केला, एकांतांत समजूत घालून पाहिली, गोडी गुलाबीनें सांगितलें, पण समजूत कशी ती अगदीं पडत नाहीं; असा, नवऱ्यास अनुभव आला, ह्मणजे मग त्याचे अंगाचा 'तिळपापड' होतो. मग तो बायकोचा दांडगेपणा पाहून मनांत सार्विकाळ जळत असतो. त्यास हलके कुळांतील मुलीशीं लग्न केल्याबद्दल पश्चाताप होतो; फार वाईट वाटतें. पण आतां उपयोग काय? पाणी प्याल्यावर कां घराचा तपास करावयाचा? "जाती तशी पुती आणि खाण तशी माती" याप्रमाणें आईबापाचे वळणावर ती मुलगी जावयाचीच. सासरीं जरी तिला पोटभर अन्न खावयास मिळालें, तरी उनाड ढोराप्रमाणें ओटींत पोहे घेऊन ती 'फक्या' मारावयाचीच; माहेरचे वळणाप्रमाणें तिचें वर्तन असावयाचें; पतीनें वेळोवेळ केलेला उपदेश तिला मुळीं समजावयाचा नाहीं, इतकेंच नाहीं, तर तो तिला विषासारखा वाटत असावयाचा. यामुळें पुढें ती निगरगट्ट, व कोडगी कांहीं काळानें व्हावयाची. तिचा सर्व ओढा माहेरचें घर भरण्याकडे असावयाचा, माहेरचें कोणी

आल्यास घरांतील हवी ती वस्तु गुप्त रीतीनें देण्यास ती कधीं चुकावयाची नाहीं. पतीचें पाणी मग ती जोखून टाकिते; नवरा रागावला, तरी मग ती त्याची फारशी पर्वा करीत नाहींशी होते; सांगितलेलें ऐकत नाहीं, अलीकडे ये झटलें तर पलीकडे जाते, तोंडास तोंड देते, असें झालें झणजे मग नवऱ्यास वारंवार राग येऊं लागतो; त्यास सुचत नाहींसें होतें. त्याला "सशी मिरें" लागतात. असें होतां होतां दोघेंही तमोगुणी असलीं तर दांडपट्टा सुद्धां खेळतात. 'दादाचें बळ बहिनीला माहीत' या झणीप्रमाणें एकमेकांस पुरा अनुभव असला तर दोघांत कुस्त्या सुद्धां होतात. असें वारंवार होऊं लागलें, दररोज घरांत दारांत बोलाचाल्या, तंटे, होऊं लागले झणजे मग शेजारी पाजारी, सोयरे धायरे मध्यस्ती करण्यास, दोघांची समजूत घालण्यास, येऊं लागतात. माहेरचीं माणसें मग झाताऱ्या नवऱ्याची जास्त 'ढवढव' लोकांत करितात. त्यायोगें पोरीस फूस चढते; ती मग नवऱ्यास न विचारतां माहेरीं किंवा हवी तिकडे जाऊं लागते. अशाप्रकारें दोघांत कोपाग्नी वाढत जातो. जास्त प्रसंग झाला, रक्त निघालें, डोकें फुटलें, तर पोलिसालाही कधीं कधीं तसदी ध्यावी लागल्याचीं उदाहरणें मोठमोठे शहरीं पुष्कळ घडतात. असें होतां होतां दोघांत पटेनासें होतें. वैर, द्वेष वाढत असतो, तो आसपासचे लोकांस दिसत नसतो. आजू बाजूच्या बदफैली लोकांच्या गुप्त ओळखी त्या पोरीशीं होतात. याचा परिणाम शेवटीं दोघांत "गडीफूचा" होऊन मग ती नवऱ्याचे हातावर तुरी देऊन अंगावरील डागिन्यांसह व संधी साधल्यास घरांत हात मारून

पळून जाते; पण एखादी गरीबशी असली तर या त्रासांतून व मारांतून मुक्त होण्याकरितां आड, विहीर जवळ करिते. असा एखादा भयंकर परिणाम झाला ह्मणजे मग तो ह्मातारा नवरा अधोमुख होऊन कोंपऱ्यांत रडत बसतो. पश्चात्ताप पावतो, देवाची आठवण करितोः—

देवा, मला कोठून रे अशी बुद्धि झाली! तरुण बायकोशीं संसार करण्याचें सामर्थ्य मजमध्यें आहे कीं नाहीं याचा आधीं मीं विचार केला नाहीं. कूळ, शील पाहून मग मुलगी करावी अशी जी वडिलांची ह्मण, तिचा मी मुळींच विचार केला नाहीं. माझे विश्वासू मित्र मला सांगत होते त्यांचें मी ऐकिलें नाहीं. अव्हेर केला. याजमुळें माझी अब्रू गेली, संसाराची दैना झाली, पैशापरी पैसा गेला आणि बायकोही गेली, आतां मी लोकांस तोंड तरी कसें दाखवूं! मीच होऊन आपल्या हातीं आपली फटफजिती करून घेतली!!! शिव! शिव! शिव! देवा, कशीरे मला अशी बुद्धि झाली. तुझी मर्जी! दुसरें काय!!!

आर्या

सौख्याशेनें पुनरपि अज्ञानें नव विवाह लाबियला ॥
मूर्खत्वाचा झेंडा निजहस्तें जगभरींच नाचविला ॥ १ ॥

याप्रमाणें तो रडत बसतो.

ह्मातारे बावा! या गोष्टींचा विचार करा, तुम्हास हें उपदेश पत्र लिहिलें याचा विषाद अगदीं मानूं नका. या आमचे पत्रांतील गोष्टीचें बिच्छान्यावर शयन कराल त्या समयीं शांतपणें चांगलें मनन करा, ह्मणजे जगदीश्वर ज्यांत खरें हित तुमचें आहे, तेंच तुम्हांस करण्याविषयीं बुद्धि देईल.

आतांच आम्ही एक हकीकत ऐकली ती तुम्हांस सांगतों. आमचे ओळखीचा एक गृहस्थ आहे. त्यानें दोनशें रुपये भरून दुसऱ्यानें लग्न केलें. या लग्नास सुमारें पांच वर्षें झालीं असावींत. सांप्रत त्या गृहस्थाची बायको शेजारच्या एका विद्यार्थ्याबरोबर घरांत चोरी करून पळून गेली आहे. हा ग्रहस्थ धनवान व सभ्य चालीचा आहे, घरांत सर्व कांहीं आहे, पण उपयोग काय ? कांहीं कांहीं ठिकाणीं अशा स्थळीं वर आच्छादन असतें त्याखालीं पाप दबून रहातें, पण कांहीं ठिकाणीं आच्छादन उडून जातें व अब्रुदार गृहस्थाची अशी फटफजिती होते. या गृहस्थाचें वय ९० वर्षांपलीकडे नाहीं.

वैद्यशास्त्रदृष्ट्या विचार केला तर कांहीं लोकांचें मत असें आहे कीं, तरूण पत्नीचे संगतीनें तिचे आंगांतील (वीज) पतीचे आंगांत येऊन त्यास थोडीशी पुष्टता येते, पण एका बाजूनें जरी पुष्टता येते असें दिसतें, तरी दुसरे बाजूनें धातुक्षयाचा व नामर्दपणाचा रोग पतीस जडतो, आणि त्यायोगें त्याचा लवकरच अंत होतो, असें सर्व वैद्यकांचें मत आहे.

असें समजा, दोन मल्लांस आपल्या आयुधांसह एकमेकाशीं कुस्ती खेळण्यास सांगितलें आहे, पहिल्याचे हातांत खंड, विखंड तांब चढलेलीं मोडकीं आयुधें आहेत व दुसऱ्याचे हातांत नवीं करकरीत, ताजीं आयुधें आहेत, तर या कुस्तीचा जो परिणाम व्हावयाचा तोच येथें व्हावयाचा, यांत अगदी संदेह नाहीं.

कधीं कधीं तर पुढें असें होतें कीं, मुलाकरतां ह्मणून जी बायको करावी ती मग आसपासचे मुलांकरतां होते. असें झालें ह्मणजे मग नवऱ्यास फार खेद होतो.

महाराज, या सर्व गोष्टींचें मनन करून तुह्मीं आपल्या मनांतील लग्न करण्याचे विचार अगदीं काढून टाकून परलोक सुखाकडे आपलें लक्ष लावा, तीर्थयात्रा करा, तुमचे धर्मसमजुतीप्रमाणें ब्राह्मणसंतर्पण करा, एखादा मुलगा पाहिजे तर दत्तक घ्या, आणि त्याचा संसार करा आणि तेंही पसंत नसेल तर नवीन विचारांप्रमाणें आपले गांवच्या एखाद्या विद्यार्थ्यास स्कालरशिप देऊन तुमचे नांवानें 'जपान' येथें एखादी कला शिकण्याकरतां पाठवा. या यत्नाची आपल्या देशास फार जरूर आहे. तेंही मान्य नसेल व भर ज्वानींत वाईट सवय लागली असेल, मनास आवरण घालण्याचें सामर्थ्य नसेल, आपले सत्तेचें माणूस पाहिजे असें वाटत असेल, तर पुणें मुंबई येथें व इतर गांवीं अनेक (रूप गुणसंपन्न) स्त्रिया विधवा झाल्या आहेत त्यांतील एखादी योग्य वयाची पाहून तिच्याशीं लग्न करा. पुष्कळ सुधारणा इच्छिणारे लोक तुमचे पंक्तीस भोजनास येतील, अशा प्रकारें लग्न केल्यास वैधव्य दुःखांत बुडालेल्या एखादे गाईस बाहेर काढल्याचें तुह्मांस पुण्य लागेल.

ह्मातारेबोवा, या वर सांगितलेले मार्गांतून तुह्मांस एकही मार्ग पसंत न पडतां जर वर्तन विरुद्ध कराल तर आह्मी तुमचे हिताकरतां स्वच्छ सांगतों कीं, अंतीं फसाल बरें! मग तुमची अब्रू जाईल, लोकांत छी, थू होईल आणि मग तुह्मांस तोंड दाखविण्यास सुद्धां जागा राहणार नाहीं अशी दशा होईल, हें ध्यानांत ठेवा.

एका अनुभविक वृद्ध कवीची उक्ती.

सुलग्न सावधान, राम बोलो भाईराम, सुलग्न सावधान ॥ छ ॥ साठीची बुद्धी नाटी, हातीं घेउनीयां काठी, वसवसोनी लागे पाठी, त्याला हांसती कारटीं ॥ १ ॥ सुलग्न सावधान, राम बोलो भाई राम, सुलग्न सावधान.

केका.

नसोनि शक्ती अंगीं, वयही साठीं बा लोटली,
तनू पिकुट भोपळ्या सम दिसे तुझी कोठली,
अशास तुज कासया नवरि पाहिजे बोकडा,
अहा ! तरुण पद्मिणी फुकट बांधिली लांकडा ॥ १ ॥

युरोपचे इतिहासांतील कांहीं हकिकत.

रोम येथील राजाचे वंशावळींत 'नीरो' आणि 'कालीगुला' नांवाचे बादशहा होऊन गेले. त्यांनीं आपल्या राज्यांत असा कायदा केला होता कीं, अमुक वय होऊन गेल्यावर जे ह्मातारे शिल्लक राहतील त्यांस, ते देशाचे धनाचा दुरुपयोग करितात सबब अशा अनुत्पादक लोकांस पकडून राजाचे शिकारखान्यांतील हिंसक जनावरांपुढें टाकून मारून टाकावें. त्या वेळचे लोकांचें असें ह्मणणें असे कीं, ह्मातारे हे देशास उगीच पोसावे लागतात; आणि ते गरिबीनें स्वस्थ बसत नाहींत, अनन्वित कामें करितात, याजकरितां त्यांस मारून टाकावें.

यूरोपखंडाचे सर्व इतिहासांत स्पार्टन लोकांसारखे स्वदेश भक्त दुसरे लोक नाहींत. त्यांच्यांतील एक ह्मण अशी आहे कीं, जोंपर्यंत देश परसत्तेखालीं आहे, तों पर्यंत सर्व लोकांनीं सुतक पाळावें; ह्मणजे ऐषआरामाचा अगदीं त्याग करावा. ह्मातारपणीं लग्न करणें एक प्रकारचा रतिसुखाचा ऐषआरामच होय. भर ज्वानींत प्रत्येक माणसास विषय सुखाची उत्कंठा असते; हें मनुष्य स्वभावास साधारण आहे तशी स्थिति ह्मातारपणीं मुळींच नसते. त्या काळीं आत्म विचाराकडे मन लावणें हेंच प्रत्येक ह्माताऱ्याचें ह्मातारपणचें कर्तव्य आहे. तें सोडून जे अविचारी ह्मातारे आपल्या आत्मघाताकडे ह्मणजे कामविकाराकडे मन लावितात त्यांस उपमा देण्यास भाषेंत शब्द नाहीं. स्पार्टन लोकांत दुसरी

अशी ह्मण आहे कीं, जे लोक परसत्तेखालीं आपला देश असतां अशा प्रकारचीं सुखें भोगून मिशावर हात फिरवितात ते आपल्या आईच्या स्तनावर हात फिरवितात असें समजावें. अशा लोकांचा ते नाश करित असत. त्या लोकांत निरुपयोगी, अनुत्पादक लोकांस अगदीं थारा मिळत नसे. त्याचप्रमाणें लहान मुलांविषयीं त्यांच्यांत असा कायदा असे कीं, मूल जन्मास आल्यावर त्यास प्रथम सरकारी डाक्टरकडे तपासणीस न्यावें लागत असे, डाक्टरचे तपासणींत जर तें सशक्त ठरलें तर त्यास आईबापाचे हवालीं करित, व पुढें त्या मुलाचे जोपासनेसाठीं सरकारांतून कांहीं वार्षिक नेमणूक करून देत. पण जीं मुलें अशक्त ठरत त्यांस मारून टाकित; असा कायदा त्यांचा देश पर सत्तेखालीं असतांना होता. अशा देशांत ह्माताऱ्यास लग्न करण्याचा अधिकार कोठून प्राप्त होणार ?

जर्मनींत, विद्यमान कालींही असा कायदा आहे कीं, कोणाही माणसास लग्न करणें तर सरकारची परवानगी घ्यावी लागते. ह्मातारे माणसापासून जी प्रजा होते ती बहुतकरून अशक्त असते, यामुळें ती देशाला व्यर्थ पोसावी लागते. याजकरितां डाक्टरचे तपासणींत ठरेल त्याप्रमाणें हरएक माणसास लग्नाची परवानगी मिळते.

साधारण असा नियम आहे कीं, जो कोणी मनुष्य विष प्राशन करील, तोच मरण पावेल, दुसऱ्याशीं त्याचा कांहींएक संबंध नाहीं; पण वृद्धापकाळीं कामवासनेचे आधीन होणें हें विष अशा प्रकारचें जलाल आहे कीं, तें घेणाराचाच नाश करून रहात नाहीं, तर तें घेणाराचे कुळाचा, त्याचे

पुत्रपौत्रांचा, तो जर राजा असला तर त्याचे राज्याचा, त्याचे प्रजेचा नाश करूनही थांबत नाहीं; तर त्याचे पुढें त्याचे पत्नीचे एकपतिव्रताचा नाश करितें. कांहीं स्थळीं तर तीस संततीकरितां परदार गमन करणें सुद्धां भाग पडतें. इतका भयंकर परिणाम त्या (कामविषा) पासून होतो. याजकारितां वृद्धमाणसांनीं लग्नाची इच्छा मनांत आणणें फार फार भयंकर आहे. आणि एखादे गरीब मुलीस (तिचे बापास धनाची लालूच दाखवून) ह्याताऱ्यानें कधींही बुडवूं नये व आपलाहि नाश करून घेऊं नये. व गावकऱ्यांनींही अशा अधमाचा धिःकार करून त्यास परावृत्त करावें.

असा प्रसंग ज्या ज्या वेळीं कोणतेहि गांवीं येईल, ह्मणजे ह्मातारा लग्नास तयार होईल, त्या समयीं तेथील लोकांनीं निदान त्या अज्ञान मुलीची दया मनांत आणून तरी (कसायाचा) व्यापार करणाऱ्या त्या पालकास किंवा बापास, व धनानें मोहित करणाऱ्या त्या थेरड्यास साम, दाम, दंड, भेद या कोणतेही मार्गे प्रतिबंध करून लग्न होऊं देऊं नये. व अशा प्रकारचें जर लग्न मोडलें तर त्यांत यत्किंचितही पाप नाहीं. उलट पुण्यच आहे. असो; त्या यत्न करणाऱ्या परोपकारी गृहस्थास तो ह्मातारा आरंभीं पुष्कळ त्रास देईल; त्याजवर खोटे नाटे दावे सुद्धां धनाचे मदतीनें व लबाड लोकांचें साह्य घेऊन आणील, त्या ह्माताऱ्यास त्यावेळीं त्यांचें हें वर्तन व प्रयत्न विषासारखे देखील वाटतील, हें उघडच आहे. पण तुह्मास ठाऊक आहे कीं, वायु झालेल्या माणसास आपण मात्रा घालित असतां तो हात झिडकारून टाकितो असें आपण दररोज पाहातों. परंतु खरे कळवळयाचे जे इष्ट मित्र

व गांवकरी असतात, ते त्यास उताणा पाडून लोखंडाचे पळींनें त्याची बसलेली दांतखिळी उघडून आंत रसायन घालितात, आणि त्या योगानें पुढें त्याचा वायु उतरून सावध झाल्यावर मग त्या सर्वांपाशीं तो क्षमा मागतो. त्यांचे उपकार स्मरतो, त्याप्रमाणें अशावेळीं जर कोणीं हें लग्न मोडण्याची खटपट केली तर ते तशा स्तुतीस दोन्ही पक्षांकडून व सर्व गांवकरी लोकांकडून पात्र होतील यांत अगदीं संदेह नाहीं. पण असें पवित्र काम करितांना थोडासा मनाचा निग्रह कांहीं मंडळीचे अंगीं लागतो; तो असल्यास हें पवित्र कार्य झाल्याशिवाय राहावयाचें नाहीं.

उद्योगाः सहासं धैर्यंबलं बुद्धी पराक्रमाः ।
शऽते यत्र तिष्ठति तत्रदेवो पिशंकते ॥

भारत ग्रंथाचें सार.

दिवा पश्यति नोलुको, काको नक्तं न पश्यति ।।
अपूर्व वृद्ध कामांधो, दिवा नक्तं न पश्यति ।। १ ।।

(उलुक) पक्षी ह्मणजे घुबड यास दिवसास दिसत नाहीं, आणि (काकपक्षी) ह्मणजे कावळा यास रात्रीं दिसत नाहीं, पण नवल हें आहे कीं, जो ह्मातारा कामांध होऊन ह्मातारपणीं लग्न करितो त्यास दिवसाहि दिसत नाहीं आणि रात्रीहि दिसत नाहीं; अशी त्याची अवस्था होते.

कामविषाचें भयंकर वर्णन मी जें वर केलें आहे, तशी कथा ज्या **भारत** ग्रंथास आपण सर्वमान्य ग्रंथ मानितों त्यांत आहे. थोडक्यांत सांगितलें तर त्या उदाहरणांतील ह्मात्राऱ्यानें तें कामवासनेचें विष प्राशन केलें नसतें, तर भारतासारखा महान ग्रंथ लिहिण्यास व्यासास कारण सुद्धां झालें नसतें. इतकेंच नाहीं, तर कौरव पांडवांचें युद्ध झालें नसतें आणि दोघांकडील मिळून जें पंचवीस क्षोणी दळ समरांगणांत खर्ची पडलें, तें सुद्धां पडलें नसतें. इतका त्या विषापासून पुढें अत्यंत भयंकर परिणाम झाला आहे. आतां तें विष कोणतें व कोणी घेतल्यामुळें हा भयंकर परिणाम झाला ती कथा आपल्यास थोडक्यांत सांगतों.

पांडवांचा मूळ पुरुष कुरु कुळांतील जो जन्हुराजा त्याचे वंशांत जन्मलेला " शंतनु राजा " हा होय; आणि त्यानें तें काम (रतिसुख) विष ह्मातारपणीं कोळ्याचे मुलीशीं लग्न करून प्राशन केलें आणि त्याचा भयंकर परिणाम पुढें झाला तो असाः—

शंतनुचा पुत्र **भीष्म** हा सर्व तऱ्हेनें योग्य, रणशूर असा असतां त्याचे लग्नाचा विचार करण्याचें सोडून देऊन शंतनुराजा कोळ्याचे घरीं वाढलेल्या मुलीस मोहित झाला, आणि त्या योगें तिचें त्यास वेड लागल्यासारखें झालें. ती उपवर मुलगी या ह्याताऱ्या शंतनूस वश होईना. इकडे राजा दिवसेंदिवस अशक्त होत चालला, कारभार पाहिनासा झाला. ही सर्व हकीगत भीष्मास समजतांच तो त्या पोरीकडे गेला. तिणें आपल्यास बापाची अनुकुलता नाहीं, हें कारण सांगितलें. नंतर भीष्मानें तिच्या बापाची मनधरणी करून शेवटीं भीष्मानें जन्मपर्यंत ब्रह्मचर्य व्रत स्वीकारावें तर माझी मुलगी तुझी आई होईल, **शंतनूला** वरील, असें ठरलें.

पुढें प्रसिद्धपणें ब्राह्मण समुदायासमक्ष भीष्मानें ब्रह्मचर्य दीक्षा धारण केली. आणि नंतर ती कोळ्याची अल्लड पोर हस्तनापूरच्या राजवाड्यांत राजाची राणी होऊन बसली. या राणीसाहेबांचें नांव सत्यवति साहेब असें आतां * झालें, आणि युवराज भीष्म; ते आतां ब्रह्मचारीबोवा होऊन अलग राहूं लागले.

एका कवीनें ह्मटलें आहे:—

सत्तराची हिच रचना ॥ बसल्यासीं उठवेना ॥
उठल्यासी चालवेना ॥ दिसे मग दैन्यवाणा ॥

अशा स्थितींत पुढें शंतनुपासून सत्यवतीस **अशक्त** मरतुकडे असे दोन मुलगे झाले. त्यांचीं नावें चित्रांगद आणि विचित्रवीर्य. व हेच पुढें शंतनूनंतर गादीवर बसले.

---

* 'राजानी राणी आणि छाणा विणता आणि' अशी गुजराथींत म्हण आहे.

युवराज विचित्रवीर्य हे तर विचित्रवीर्यांची खरी प्रतिमा होतां असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मुलगे मोठे झाल्यावर त्यांचीं लग्नें केलीं, परंतु रुपयौवन संपन्न शंतनूच्या या स्नुषांनां संतती मुळींच झाली नाहीं. इतक्यांत शंतनु स्वर्गस्थ झाले; पुढें पहिले पुत्र चित्रांगद हे चित्रसेन नांवाचा गंधर्व हस्तनापुरावर चालून आला असतां त्याच्याशीं लढतांना मारले गेले, आणि दुसरे विचित्र वीर्यही थोडेच काळानें कफक्षय होऊन निजधामास गमन करिते झाले.

ह्मातारपणचे लग्नाचा असा हा परिणाम झाला! आतां राजवाड्यांत शिल्लक माणसें ह्मटलीं ह्मणजे सत्यवती सासुबाई आणि त्यांच्या त्या दोन विधवा सुना अंबिका आणि अंबालिका, आणि राजवाड्याबाहेर राहणारे ते ब्रह्मचारी बुवा, (यांची गणना आतां राजकुलांत नाहीं हें तुझी जाणतच अहां) सत्यवतीच्या डोळ्यांदेखत तिचा पती व दोन पुत्र मेले. सुना विधवा झाल्या, राजगादीवर स्थापन करण्यास कोणी औरस वारस राहिला नाहीं. अशा वेळीं तिचे दुःखाची कल्पना करणें कितीतरी भयंकर आहे. करते काय बापडी? ह्माताऱ्याचे संयोगाचा असाच परिणाम व्हावयाचा? पुढें तिनें भीष्मास बोलावून आग्रहानें सांगितलें कीं, ज्या प्रमाणें पित्याचे इच्छेकरितां तूं ब्रह्मचर्यव्रत धारण केलेंस त्याप्रमाणें माझे इच्छेकरितां माझे सुनांशीं संभोग करून पुत्रप्राप्ति करून दे. * त्यानें आईस सांगितलें कीं, ही गोष्ट

---

*'देवराज सुतोत्पत्ती' अशी त्या काळीं धर्मशास्त्राची आज्ञा होती. ह्मणीं वऱ्हाडांत कांहीं क्षत्रिय जातींत विधवा भावजयींशीं लग्न

मात्र मजकडून कधीं घडावयाची नाहीं. या बाबतींत मातेच्या आज्ञाभंगाचा दोष मीं पतकरीन; परंतु जी मी दीक्षा घेतली आहे तिला भ्रष्ट करणारी क्रिया मी कधींहि करणार नाहीं. **प्राडविवाक** या नात्यानें कारभाऱ्याचें काम जन्मपर्यंत करीन. हस्तनापुरावर कोणी शत्रू आला तर त्याला शिक्षा करीन. पण माते, मला अशी आज्ञा देऊं नको. याप्रमाणें ब्रह्मचारीबावा कबूल होईनात, तेव्हां भारतग्रंथाचे कर्ते कृष्णद्वैपायन यांस बोलाविलें आणि त्यांस सुनांशीं नियोग * करून पुत्रप्राप्ति करण्याविषयीं आग्रहानें सांगितलें. शेवटीं त्यांनीं ती गोष्ट मोठ्या कष्टानें कबूल केली. वडील सून ऋतुमती झाल्यावर दोघांची गांठ घातली. परंतु व्यासांचें तें भव्य शरीर व तेजोमूर्ति पाहून ती सून अगदीं दिपून गेली. आणि तिनें डोळे मिटले. अशा स्थितींत व्यवहार झाल्यामुळें पुढें पुत्र झाला तो जन्मांध झाला. त्याचें नांव धृतराष्ट्र असें ठेविलें. आंधळा गादीवर बसण्यास योग्य नाहीं तेव्हां सत्यवतीनें व्यासास पुन्हा पाचारण केलें. झालेला वृत्तांत निवेदन केला. झाल्या गोष्टीस इलाज नाहीं. पण गादी वारसाविणें रहाणें चांगलें नाहीं. कुलक्षय होईल. याजकरितां माझें सांगणें आहे कीं, दुसरे सुनेस भोग द्यावा. तेंही व्यासानें कबूल केलें. पण वडील सवतबाईनीं त्यांच्याशीं झालेले पूर्व प्रसंगाची हकिकत धाकट्या सवतबाईस साद्यंत सांगितली होती; ती ऐकून त्या अगोदरच घाबरल्या होत्या. त्या भव्य पुरुषाचे आंगांतील (वीज) आपल्या आंगांत उतरली तर शरीरांस फार दाह होईल, तो

करितात. रामानें सुग्रिवास वालीचे बायकोशीं संबंध ठेवण्यास आज्ञा दिली होती.

आपल्याच्यानें कधीं सहन होणार नाहीं. ह्मणून आंगास चंदन लाऊन बाईसाहेब एकांतांत गेल्या (कांहीं पुस्तकांत व्यासाकडे पाहून ती घाबरून एकदम पांढरीफिक्की पडली आणि त्याचा परिणाम गर्भावर झाला असें लिहिलें आहे). त्याचा परिणाम पंडुरोगी मुलगा झाला. त्याचें नांव **पंडु** असें ठेविलें. हाच पांडवाचा पिता, तिसरे वेळीं दासीपासून विदूर झाला. याप्रमाणें पूर्व हकिकत आहे.

पुढें धृतराष्ट्र व पंडु मोठे झाले. दोघांचीं लग्नें झालीं. पंडुराजाचे बायकोचें नांव कुंती. पण **पंडुराजा** रोगी असल्यामुळें स्त्रीसंभोग करण्याची त्यास सक्त मनाई होती. कारण पंडूचे वीर्यापासून जी प्रजा उत्पन्न होईल ती " यथा बीजं तथांकुरं " या नियमाप्रमाणें रोगी ह्मणजे हल्लींचे प्रचारांतील **शब्दाप्रमाणें** बोलणें ह्मणजे ती देशास भार होईल, त्या प्रजेच्या हातून राष्ट्राला योग्य अशीं पुरुषार्थाचीं कामें होणार नाहींत; याजकरितां त्यास स्त्रीसंग न करण्याची सक्त ताकीद होती.

पूर्वकाळीं प्रजेचे आरोग्याकडे त्या वेळच्या विद्वान् लोकांचें फार लक्ष असें. ते अशी प्रजा उत्पन्न होऊं देत नसत. सांप्रत मुसलमान पारशी यांच्यांत एक दूध खेरीजकरून सख्ये चुलत बहीणभावंडांचीं लग्नें होतात आणि असा शरीरसंबंध, ते अनेक सोईकरितां मुद्दाम देखील करितात. पण त्यापासून प्रजेच्या आरोग्याची फार हानि होते. संतती निर्बल होत जाते. हे दूरवर विचार मनांत आणून आमच्या याज्ञवल्क्यादी ऋषींनीं सगोत्र सपिंडांतील शरीरसंबंध अगदीं वर्ज केले आहेत ते याच चांगले हेतूकरितां होत. त्याचप्रमाणें

याज्ञवल्क्य यांचे पुस्तकांत " अनभ्यासें विषं शास्त्रं वृद्धस्य तरुणी विषं " असें स्पष्ट सांगितलें आहे.

पंडुराजाची बायको कुंती हिला वरून चालत आलेल्या रीतीप्रमाणें पांच गृहस्थांकडून मंत्ररूपानें पांच मुलगे आणि कुमार अवस्थेंत **कर्ण** असे सहा मुलगे झाले. याप्रमाणें शतंनु पासून पांडवांपर्यंतची एकंदर हकीगत आहे.

या एकंदर चरित्राचा परिणाम पुढें कसा काय झाला याचा आपण विचार करूं.

शंतनुराजानें आपलें लग्न ह्यातारपणीं केलें नसतें तर पुढें ज्या भयंकर, अनीतीच्या गोष्टी घडल्या त्या कधींच घडल्या नसत्या; भीष्मासारख्या राजपुत्रास; ऐन पंचविशींत, जो भीष्म त्या वेळच्या पृथ्वींत खरा शूर, खरा योद्धा होता, ज्यानें परशुरामासारख्या एकवीस वेळां निक्षत्रीय पृथ्वी करणाऱ्या वीरांस युद्धांत नमती घेऊन साम करून परत जाणें भाग पाडलें, ज्यानें **गोपाळ कृष्णाची** प्रतिज्ञा भंग करून त्यास चक्र धरण्यास लाविलें, अशा धनुर्धारी महावीरास भरज्वानींत ब्रह्मचर्य दीक्षा घ्यावी लागली ती लागली नसती. त्याचप्रमाणें चित्रांगद व विचित्रवीर्य यांस अशक्त भस्मरोगी अल्पायु स्थितींत जन्म घेणें भाग पडलें तें पडलें नसतें. आणि अकालीं मरणाधीन होऊन सत्यवती पुत्रशोकांत बुडाली नसती. त्यांच्या बायकांस पुत्रप्राप्तीकरितां परपुरुषाशीं रत व्हावें लागतें ना. बरें इतकेंही करून परिणाम काय ? तर एक पुत्र आंधळा आणि दुसरा पंडुरोगी. " एका डोळ्यांत वडस तर दुसऱ्यांत कांहीं नाहीं, " असा प्रकार झाला तो झाला नसता. व त्याचा परिणाम पुढें पंडुराजास

मरेपर्यंत संसारसुखास पराङ्मुख व्हावें लागलें तें लागलें नसतें. इतकेंच नव्हे, तर कुंतीला परक्यापासून प्रजा उत्पन्न करून घ्यावी लागली नसती. तेव्हां या सर्वांस कारण शंतनूनें म्हातारपणीं कामविष प्राशन केलें, हेंच नव्हे काय. व त्या योगानें पुढेंही सर्व माणसें दुःखांत बुडून सर्व नाश झाला नव्हे काय ?

जर शंतनु, कोळ्यानें वाढविलेल्या मुलीस मोहित झाला नसता, तर भीष्माचें लग्न झालें असतें, शंतनु नंतर भीष्म राज्यावर विराजमान झाला असता, आणि प्रजाजनांचें उत्तम पालन करता, त्यास काशी राजाची वडील मुलगी अंबा, जिणें खडतर तपाचरण भीष्मास मारण्याकरितां केलें, आणि दुसरा जन्म घ्यावा लागला तरी घेऊन शेवटीं भीष्मास भर युद्धांत मारीन अशी प्रतिज्ञा करून मारला, तो तिणें कधीं मारला नसता. याचे उलट तिणें मोठ्या प्रेमानें त्याच्या गळ्यांत माळ घातली असती. दोघे आनंदानें सुखांत राज्याचा उपभोग घेतीं, कौरव पांडवांची उत्पत्ती अशा भानगडीनें झाली ती झाली नसती. कौरव पांडव हे सखे चुलत भाऊ असतां एकजण चुलत भावजईस भरसभेंत आणून नग्न करण्याचा यत्न करतो तर विरुद्ध पक्षांतील दुसरा भाऊ आपल्या चुलत भावाचे छातीवर बसून व्याघ्र सिंह्हांदी हिंसक जनावरांप्रमाणें त्याचे नरडीस तोंड लावून भावाचें रुधिर गटगटा पितो; अशीं आंगावर कांटा उत्पन्न करणारीं भांडणें, जर शंतनु कामाधीन[1] झाला नसता, तर कधीं उत्पन्न

---

१ या एकंदर कथेवरून सूक्ष्म विचार केला तर असें दिसतें कीं, दुर्गुण, रतोबराबर संततींत देखील उतरतात. शंतनु विषयांध झाला

झालीं नसतीं, आणि कौरव पांडवांचें दोन्हीं पक्षांचें मिळून पंचवीस क्षोणी दळ रणांत निजलें तें जिवंत राहिलें असतें.

॥ विषमेका किनंहंती कामविश पुत्रपौत्रकं ॥
॥ नविषंविषमित्याहु विषंकामस्य उच्चते ॥

याप्रमाणें भयंकर परिणाम कामापासून झाला, त्या सर्वांस कारण ह्मतारपणीं लग्न करणें हेंच होय. या शिवाय दुसरें कांहींएक नाहीं; असें तुमचे चांगलें ध्यानांत आलें असेल.

ही सर्व भारतांतील आणि तशांत महा पराक्रमी भीष्माचे बापाची हकीकत सांगून, माझे प्रिय गांवोगांवचे लोकांस अशी विनंती करितों कीं, बंधूंनो जर तुमचे गांवीं कोणा म्हाताऱ्यास म्हातारचळ होऊन बाशिंग बांधून तो रुखवत खाण्यास तयार झाला तर या माझे पुस्तकांतील सर्व हकीकत व याशिवाय योग्य अशी तेथील ग्रामस्थांस वाटेल, ती त्यास निवेदन करा. मला वाटतें, त्याचे मनास यापासून उपरती होईल. पण कितीएकांस उपरती जर न झाली, जरी त्यांचें मन फिरलें नाहीं, तरी गांवकऱ्यांनीं हताश होऊं नये. हरएक प्रयत्न करून त्यांचें लग्न होऊं देऊं नये. यांतच त्या

हें अगदीं निर्विवाद आहे. पुढें त्याचा मुलगा धृतराष्ट्र हा अंध होता याजमुळें त्याचें चरित्र दुनियेपुढें येण्यास मार्ग नव्हता. पण त्याचे पुत्र दुर्योधन दुःशासनादि यांचें मन कामविकाराधीन होतें. हें भारत सांगत आहे. याजवरून मनाचे विकार रेतांत उतरतात यांत संशय नाहीं व प्रत्येक कुटुंबाचे नायकानें आपलें बाहेरील आचरण शुद्ध ठेवावें इतकेंच नाहीं, तर आपलें मनही पवित्र राहणेविषयीं काळजी घ्यावी. तरच प्रजा पवित्राचरणीं उत्पन्न होईल. कारण मनाचा आणि रेताचा फार निकट संबंध असतो. हें सर्वांनीं ध्यानांत ठेवावें.

ह्याताऱ्याचें कल्याण आहे. तें त्यास त्यावेळीं दिसणार नाहीं. पण पुढें खचित् त्यास दिसेल. आणि मग तो तुह्मा परोपकारी गांवकऱ्यांचे उपकार मानील. शंकराचार्यांच्या शिष्यांनीं शंकराचार्यांस एकदां असा प्रश्न केला कीं, आम्ही मित्र कोणास समजावें. त्यास स्वामीनीं उत्तर दिलें कीं, जो वाईट आचरणापासून प्रेमभावानें स्वतःला त्रास सोसून देखील आपले मित्राचें रक्षण करतो; त्यासच मित्र अवश्य समजावें. बाकी भोजनबंधू मित्र जाणावे.

कोमित्रा ? यो निवारयति पातात्.

वृद्धपणीं लग्न करूं इच्छिणारे ह्यातारेबाचें मन परावृत्त होण्यास गांवच्या लोकांनीं कसा यत्न करावा.

प्रथम हें पुस्तक वाचावें. नंतर आपल्या मित्रांशीं विचार करून लग्न करूं इच्छिणारे ह्यातारेबावास पुस्तकाचे आरंभीं "ह्यातारे नवरदेवास पाठविण्याचें पत्र" याचा नमुना लिहिला आहे. त्यांतील मजकूर व गांवांत विधुर स्थितींत राहिलेल्या गृहस्थांचीं योग्य असतील तितकीं उदाहरणें देऊन व दुसऱ्या कांहीं अनुकूल गोष्टी असतील त्या लिहून पत्र पाठवावें. त्यानें उपयोग झाला नाहीं तर ह्यातारेबोवाचे स्नेह्यांनीं—इष्ट मित्रांतील चार गृहस्थांनीं एकत्र मिळून डेपुटेशन रूपानें त्याजकडे जावें किंवा त्यास गांवचे देवळांत गांठून अशा लग्नापासून काय परिणाम होतात तें सर्व नीट समजूत घालून सांगावें.

पण इतकेंही करून तो हट्टानें मंडळींचें ऐकणार नाहीं, तर मंडळींनें निराश न होतां हिंमत धरून त्यास साफ सांगावें कीं, पहा, आजोबा आमचा उपदेश न ऐकतां जर आपण लग्न करीत असाल तर खुशाल करा, त्यांत आमचें कांहीं जात नाहीं. आमचे हातीं कांहीं राजसत्ता नाहीं कीं आह्मीं तुह्मांस प्रतिबंध करूं. तरी पण आह्मी तुह्मांस सांगतों कीं, आमचे हातीं जी सत्ता आहे व ज्या सत्तेचा उपयोग पवित्र कामांत करण्याचा अधिकार परमेश्वरानें प्रत्येक माणसास दिला आहे, तसा आह्मासही दिला आहे आणि याजकरितां सांगतों कीं एखाद्या अनाथ मुलीस बुडविण्यास,

तिचे जन्माचें मातेरें करण्यास, तिचे बापास पैशाची लालुच दाखवून जर आपण तयार झालां असाल, तर आमचा तो अधिकार अमलांत आणल्याशिवाय आह्मीं कधीं राहणार नाहीं.

मनुस्मृतींत लोकसमुदायाविरुद्ध वागणाराशीं गांवकऱ्यांनीं कसें वागावें याजबाबद असें सांगितलें आहे कीं,

त्यजेद्देशं कलौयुगे त्रेतायाम ग्राममुत्सृजेत ॥
द्वापारे कुल मकेतु कर्तारं तू कलौयुग ॥ १ ॥

ह्मातारे बोवा, आह्मी वरील वचनाधारें आपल्यास सांगतों कीं, आपण जर आमचें न ऐकतां लग्न करीत असाल तर आह्मीं मनूचे आज्ञेप्रमाणें अजन्मपर्यंत तुह्माशीं भाषण करणार नाहीं. याप्रमाणें साफ सांगावें ह्मणजे गांवकऱ्यांनीं जातवाल्यांनीं आपलें कर्तव्य केलें असें होईल.

याप्रमाणें यत्न केल्यावर खचित कार्य होईल अशी खात्री आहे. पण ह्मातारे बोवांचे खरे मित्रांनीं जुळवाजुळव करून उपदेश केला पाहिजे तरच कार्य होईल.

मित्राविना मनुज कूप जसा अभद्र ॥
तोयाविणें कि रजनीविण तो निशिद्र ॥ १ ॥

या श्लोकाप्रमाणें मग ह्माताऱ्याची अवस्था होईल व मग तो या बोधाचा विचार करील व परमेश्वरही त्यास तशी बुद्धि देईल अशी खात्री आहे. पण असे खरे हितचिंतक यावेळीं पुढें आले पाहिजेत. आर्या

भीष्म, धृतराष्ट्र, विदुर, द्रोण, नृप, कृपासि, बोलतो लावी,
कीं समर्थीं न वदावी तरि मग केव्हां सदुक्ति बोलावी.

श्लोक.

काकः कृष्ण पिकः कृष्णको भेदो पिक काक योहोः
वसंत समये प्राप्ते काकः काकः पिकः पिकाहाः

दोन म्हाताऱ्यांचे लग्नाची चमत्कारिक हकिकत.

पुण्यास एक आजोबा नातीचे वयाचे मुलीशीं लग्न करण्यास तयार झाले होते. ही हकीकत शेजाऱ्यापाजाऱ्यांस समजली तेव्हां त्यांनीं त्या म्हाताऱ्यास बुद्धिवाद करून पाहिला. पण "मुर्खाला कहाणी" असा प्रकार झाला. नंतर एक दिवस (लग्नाचे पूर्वी) गाढवावर एका जख्ख म्हाताऱ्यास व पुढें एका लहान मुलीस बसवून या नवरदेव म्हाताऱ्याचे घरा पासून वाजंत्री ताशे ब्यांड व मागें पोरांचा घोळका व गोंगाट अशा थाटानें मिरवणुक काढली. त्याचा परिणाम असा झाला कीं, त्या म्हाताऱ्यास उपरती होऊन त्यानें रुखवत खाण्याचा बेत पुढें रहित केला.

दुसरी गोष्ट अशी आहे, सातारा जिल्ह्यांत एके खेडेगांवीं मुलीचे आईस एका विधवेनें लालुच दाखवून दोनशें रुपयांस एका म्हाताऱ्यास मुलगी देण्याचें साटें केलें. ही हकिकत मुलीचे भावास समजली तेव्हां तो आपल्या गांवीं आला व आईस पुष्कळ प्रकारें सांगितलें; पण ती मध्यस्त विधवा तिचें मन वळूं देईना. मुलगी म्हाताऱ्याशीं लग्न करण्यास खुशी नव्हती.

नंतर लग्नाचे दिवशीं म्हातारेबोवा मुंडावळ बांधून घोड्यावर बसून गालबोट लावून मांडवांत आले. भावानें बाहुलें वगैरे फोडून टाकून बहिणीस बरोबर घेऊन तो परगावीं निघून गेला. मग इकडे गांवकऱ्यांनींही म्हातारेबोवांची बरीच संभावना केली व म्हातारेबोवा आले तसे परत गेले.

शैल्ये शैल्ये नामणिक्यं मौक्तिकं न गजे गजे,
साधवो नही सर्वत्रं चदनं न वने वने ॥ १ ॥

म्हाताऱ्या नवऱ्याचा तरुण पत्नीचे सहवासाचा अनुभव.

आर्या.

काम स्त्रीतें भारी, जाणुन बुधजन समस्त कां चुकला ।।
वरितो जो तरुणीला सांगे मी वृद्ध तो सुखा मुकला।।१।।
शुंकाया करवंटी नेसी पंचा खराच बुधवारीं ।।
कांपे कर थरथर हर नसती पारि या पिडेस बुध वारी।२।

श्लोक.

झाले झाले मार्दय कच हे पांढरे शुभ्र झाले,
गेले गेले द्विज सकलही सोडुनी सत्य गेले ।।
लाळा कैसी मुखिची गळते शक्ती नाहीं उठाया,
आतां कैचें रतिसुख मला सत्यही भ्रांति वाया ।। १ ।।
कानांनीं या नच पारिसवे मानही सांवरेना,
आतां यष्टि व्यतरिक मला सत्य हो चालवेना ।।
हस्तादि, हे थरथर पहा कांपती नित्य आतां
(खासे) केली उचल ही किती नाहीबा कोणी त्राता।२।
देहा माझ्या किति सुरकुत्या येती या दैन्ययोगें,
वृद्धावस्थे नमन तुजला दे ही या शांतीभोगें ।।
नेत्रा आली किती शिथिलता कांहीं माते दिसेना,
भार्या सुद्धां मज निकट ती सत्य आतां बसेना ।। ३ ।।
बाल्यावस्थेमधें किती तरी खेळलों खेळ नाना,
तारुण्यीं तै रमणीसह त्या नित्य केल्या तनाना ।।
आनंदी त्या नच गणियले पुढल्या यात नाना,
वाटे चित्तीं हरिविण आतां मार्ग हा दैन्य वाणा ।। ४ ।।

वृद्धत्वीं या इतर जनते रामनामास ध्याती,
इंद्रीयेंही परी मम सदा प्रीयभार्येस गाती ॥
तृष्णा माझी अनुदिन पहा वाढते या सुखाची,
माझे भाग्यीं सुख मुळीं नसे भ्रांति ही हो फुकाची ।५।
पर्जन्यीं सुख तें वसंत ऋतुचें कैसें मिळे इच्छितां,
रात्रौ सूर्य कसा दिसेल गगनीं सांगा बरें तत्वतां ॥
वस्त्राला चिरतुं नये ह्मणुनी कां घालाल काष्ठावरी,
वार्धक्यीं नव पत्नीसौख्य मग तें कैसें मिळे भूवरी ॥ ६॥
कोणाची ललना तसा तनय कोणी कुणाचें नसे,
दुःखाचा समभाग घेई ललना खोटें परी तें असे ॥
गोमाशा नव वारुच्या असती ह्या शंका मुळींही नसे ॥
कंठीं घालिती प्रेमपाश सटव्या तारुण्य हें जें वसे ॥ ७ ॥
त्यांचें प्रेम पडे खरें शिथिल तें वृद्धाप्रती पहातां,
होती धुंद मदे मुळीं न बघती कांताकडे तत्वतां ॥
जाती कर्ण जसे त्यजून जठरा वृद्धत्व येतां तया,
ह्मातारा पती पहातां बधिर त्या होती पहा हो स्त्रिया॥८॥

तरुण पत्नीचा ह्याताऱ्या नवऱ्याचे सहवासाचा अनुभव.

(अक्रुर हा नेतो श्रीकृष्णला– ही चाल)

धांव धांव प्रभो धाव सख्या भगवंता,
मज दुरधर जडली चिंता ॥
गुज सांगुं कुणा तुजवांचुनि इतराशीं,
दुर्दैवें पिडिलें मजसीं ॥
आहे विधवा मी हीन दीन परदेशी,
वय अल्पची सासुरवासी ॥
॥ चाल ॥ नाहीं लेश सुखाचा मजला,
आनंद दीप कीं विझला
माझा रडून पदरही भिजला,
करुं गत कैसी न सुचे कांहीं आतां ॥
मज दुरधर जडली चिंता ॥ २ ॥
अठवे वरुषीं माझें लग्न पहा झालें,
बहु वृद्ध पती योजीले,
साठ वरुषांचें वय त्यांचें मग कळलें,
आप्तवर्ग तिकडे वळले,
॥ चाल ॥ मायेचें कोणी न उरलें,
शतरुपयांसी मज कि केलें,
सर्व सौख्य त्वरितची सरलें
कधीं पाहिली कीं मज सम दुःखी दुहिता ॥
मज दुरधर जडली चिंता ॥ ३ ॥
काय सांगुं प्रभो दुःखस्थिति ही आमुची,
जाचणूक सासरच्यांची

मराठी ग्रंथ संग्रहालय

वदवेना जे शब्द शिव्याचे देती,
तप्तलोह वदनींहाणिती,
॥ चाल ॥ जरि चूक अल्पही घडली,
समजा मग विज कडकडली,
लांकडें पाठिवर पडलीं,
भडमार बहू होत शिव्यांची संथा
मज दुरधर जडली चिंता ॥ ४ ॥
आयबापांनीं अल्प वयांतचि त्यजिलें,
इतुक्यामाधिं विधवा झालें,
सासु श्वशुरांनीं नापिकासि आणविलें,
बाराचे वर्षी कच हारिले
॥ चाल ॥ मी लहान अज्ञकी अबला,
काय करिती नकळे मजला,
नापिक तो संनिध बसला,
मम मृत्यु कुठें तरि निजला,
सुख होतें तो याच घडिला येता
मज दुरधर जडली चिंता ॥ ५ ॥

केका.

असोन वरिशी दुजी तुज न लाज ही वाटली,
वरून पति येकला गतधवाच कां वाटली ॥
न दात मुखीं एकही तनु सकंप आली जरा,
हवी तरूण नोवरी परी तिला न अज्ञा जरा ॥ १ ॥

नं. ३६

॥ श्रीगजानन ॥

श्रीगणेशोत्सव

दुष्काळ व प्लेग वगैरे संकटें ओढवण्यास कारण झाला काय?

हें पुस्तक

गंगाधर रावजी खैरे,

यांनीं

बे० मु० बाळकृष्ण नारायण शहरकर

यांच्या संमतीनें लिहिलें.

तें

बळवंत नारायण सांतव,

यांनीं

पुणें येथें 'इंदिरा' छापखान्यांत छापिलें.

शके १८२०–सन १८९८.

किंमत एक आणा.

श्रीगणेशोत्सव

दुष्काळ, प्लेग वगैरे संकटें ओढवण्यास कारण झाला काय ?

धर्माचें पाळण । करणें पाखांड खंडण ॥
हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ॥
तीक्ष्ण उत्तरें । हातीं घेऊनि बाण फिरे ॥
नाहीं भीड भार । तुका म्हणे साना थोर ॥

तुकाराम.

हिंदुमुसलमानांमध्यें बखेडा उत्पन्न होण्यापूर्वी, हिंदूंच्या कोणत्याही उत्सवाकडे कोणाचें लक्ष्य गेलें नव्हतें. शेंकडों वर्षांपासून चालत आलेले उत्सव कोणतीही आडकांठी न येतां पार पडत असत. परंतु दुर्दैवानें पांच सहा वर्षांपूर्वी प्रभासपट्टण येथें कांहीं धर्मसंबंधी बाबतीवरून हिंदुमुसलमानांमध्यें दंगा झाल्यामुळें, ठिकठिकाणच्या मुसलमानांच्या मनांत हिंदूंविषयीं विनाकारण द्वेष उत्पन्न झाला व क्षुल्लक कारणावरून मारामाऱ्या व खून पडूं लागले. ह्यावेळीं सरकारी अधिकाऱ्यांचा विलक्षण गैरसमज होऊन त्यांचा विशेष कटाक्ष हिंदूंच्या वार्षिकोत्सवावर झाला. येथें बहिरोबाचा छबिना, डुल्यामारुतीचा छबिना, श्रीज्ञानदेव, तुकाराम यांच्या पालख्यांची मिरवणूक, नागोबाची मिरवणूक वगैरे धर्मसंबंधी समारंभ शेंकडों वर्षांपासून वहिवाटीच्या रस्त्यानें होत असत.

त्यांजविषयीं, प्रभासपट्टण येथें दंगा होण्यापूर्वी येथील मुसलमानांनींही कधीं आडकांठी घेतली नाहीं व सरकारी अधिकाऱ्यांनींही दरसालच्या वहिवाटीकडे कधीं लक्ष्य दिलें नाहीं, परंतु प्रभासपट्टणाचा दंगा होऊन त्याची सांथ मुंबईसही आली तेव्हां आमच्या येथील कांहीं असमंजस मुसलमानांचेंही हिंदूंविषयीं मन बिघडलें. व तेव्हांपासून येथील सरकारी अधिकाऱ्यांचेंही हिंदूंच्या उत्सवाकडे लक्ष्य गेलें. प्रथम बहिरोबाच्या छबिन्याच्या मिरवणुकीस अडथळा आला, व श्रीज्ञानदेव, तुकाराम यांच्या पालखींत जोडा ठाकून कुरापत उपस्थित करण्याचा प्रयत्न झाला, नागोबाच्या मिरवणुकीस ते आड आले व डुल्या-मारुतीच्या छबिन्यासही त्यांनीं वाद्यांच्या बाबतींत हरकत घेतली. ह्याप्रमाणें सदरहू दंग्यापासून उत्पन्न झालेल्या द्वेषामुळें येथेंही कांहीं तरी निमित्त मिळावें म्हणून प्रयत्न करण्यांत आले, परंतु हिंदूंनीं सरकारी अधिकारी सांगतील त्याप्रमाणें वागून कुरापतीचे प्रसंग ठाळले. ह्याच सुमारास पूर्वी श्रीमारुतीच्या वार्षिकोत्सवाची ज्याप्रमाणें स्वाभाविक स्फूर्ति लोकांमध्यें उत्पन्न होऊन निरनिराळ्या पेठेंत व निरनिराळ्या आळींत नव्या नव्या मारुतीची स्थापना होऊन मांडव वगैरे घालून मोठ्या थाटाची रोषनाई होऊं लागली व मोठ्या प्रमाणावर मारुतीचा उत्सव होऊन कथा कीर्तनांची चढाओढ लागली होती, त्याप्रमाणें श्रीगणपतीच्या उत्सवाविषयीं लोकांच्या मनांत स्वाभाविक स्फूर्ति उत्पन्न होऊन चढाओढीनें नानातऱ्हेचे मांडव आरास, रोषनाई, मेळ वगैरे करून लोक उत्सव करूं लागले. मारुतीचे उत्सव होण्यास जेव्हां सुरुवात

झाली तेव्हां दंग्याच्या दुष्ट हवेनें वातावरण बिघडलें नसल्यामुळें त्यांविषयीं कोणीही ओरड केली नाहीं. परंतु श्रीगणपतीच्या उत्सवाचें पुनरुज्जीवन मोठ्या प्रमाणावर झालें त्यावेळीं जिकडे तिकडे द्वेष, मत्सर, सरकारी अधिकाऱ्यांची इतराजी वगैरे गोष्टींनीं काळ पाठमोरा झाला असल्यामुळें ह्या उत्सवाविषयीं मुसलमान व सरकारी अधिकारी यांच्या मनांत विपरीत भाव उत्पन्न झाला. एकदां एखाद्या गोष्टीविषयीं विपरीत भाव झाला म्हणजे त्या गोष्टीची प्रत्येक बाजू विपरीत दिसते. त्याप्रमाणें श्रीगणपतीचे उत्सव दंग्याच्या सांयींतच मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळें हे उत्सव सडकेवर मांडव देऊन दहा दिवस करणें, हंड्या वगैरे लावून मोठी रोषनाई करणें, दहा दिवसांत निरनिराळे पोषाक करून गणपतीची स्तुतिपर पदें तालसुरांत गात व नाचत फिरणारे मेळे, ही मौज पाहण्यासाठीं रात्रीं फिरणारी माणसांची गर्दी, त्यांचा निघणारी एकच भिरवणूक, वगैरे केवळ स्वाभाविक स्फूर्तीनें झालेले प्रकार, आपल्या ताबुतावर तोड करण्याकरितां लोकांनीं मुद्दाम केले असें मुसलमानांस वाटूं लागलें व त्याप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांचीही गैर समजूत होऊन दोघांचाही गणपत्युत्सवावर मोठा कटाक्ष झाला. आमच्यांतील कांहीं शहाण्या मंडळीसही तसेंच वाटून त्यांनींही त्या गैर समजुतीस दुजोरा देण्याची सुरुवात केली. इकडे लोकांच्या मनांत गणपत्युत्सव अशा थाटानें करण्याची झालेली स्वाभाविक स्फूर्ति व इकडे निमित्ताला टेंकलेला विरुद्ध पक्ष अशी वस्तुस्थिति पाहून कांहीं समंजस लोकांनीं हा उत्सव दंगाधोपा न

होतां पार पडावा, येवढ्याच हेतूनें लोक व सरकारी अधिकारी ह्यांच्यामध्यें मध्यस्थी करण्याचें पतकरिलें व सरकारी अधिकारी वेळोवेळीं फरमावितील त्याप्रमाणें लोकांची समजूत घालून त्यांनीं पतकरिलेलें काम मोठ्या हुशारीनें व खबरदारीनें पार पाडिलें; तथापि जो प्रकार व्हावयाचा तो झालाच व त्याबद्दल लोकांना विनाकारण त्रास सोसावा लागला. पुढें त्या वेळचें तुफान शांत होऊन दरसाल श्रीगणपत्युत्सव निर्विघ्नपणें पार पडत आला आहे, तरी त्याविषयींचा झालेला गैरसमज अद्याप कायम आहे असें आढळून येतें. आमच्या सुधारकांनीं आपण उचललेली बाजू दरसाल गणपत्युत्सवाचेपूर्वी महिना दोन महिने वर्तमानपत्रांतून पुढें आणण्याचा व कोणत्याही विषयावर लिहितांना मधून त्यावर टोला मारण्याचा आपला क्रम तेव्हांपासून सारखा चालू ठेविला आहे. परंतु त्यांस अद्यापपर्यंत बिलकुल यश मिळालें नाहीं.

दुर्दैवानें दोन सालांपासून दुष्काळ, प्लेग वगैरे अरिष्टें लोकांवर गुजरल्यामुळें त्यांच्या मनाची चलबिचल झाली आहे, ही सोन्यासारखी संधी पाहून पहिल्यापासून गणपत्युत्सवाच्या विरुद्ध असलेली मंडळी, श्रीगणपती महा कडकडीत दैवत, त्याची यथाविधि पूजाअर्चा, ब्राह्मणभोजन कथाकिर्तनें वगैरे करून त्यास नीच जातीचा स्पर्श सुद्धां न होऊं देतां; अगदीं सोंवळ्यानें त्याचे उत्सव करावयाचे सोडून, त्याची भलत्याच जागीं स्थापना करून व मांडव वगैरे घालून, नुसत्या रोषनाईच्या भपक्यांत व मेळ्यांच्या तालसुरांतच लोकांनीं ते कर-

ण्याचें आरंभिलें, त्याची पूजाअर्चा यथासांग होत नाहीं मिरवणुकींत चांभारांचे वगैरे गणपती येऊन त्यास शिवता-शिवत होते ह्यामुळें त्यांचा कोप होऊन दुष्काळ, प्लेग वगैरे अरिष्टें लोकांवर कोसळलीं असें सांगून गणपत्युत्सवावरून लोकांचीं मनें उडावीं ह्या दुष्ट हेतूनें, लोकांचा गैरसमज करण्याचा जारीनें प्रयत्न चालविला आहे. ह्या प्रयत्नानें अज्ञान लोकांचीं मनें गणपत्युत्सवावरून उडण्याचा बराच संभव दिसतो ह्मणून श्रीगणपत्युत्सवावर ताबुताचें अनुकरण केल्याबद्दल व त्यापासून प्लेग उद्भवला वगैरे जे आक्षेप पुढें आले आहेत त्यांचा विचार करण्याचें योजिलें आहे.

वास्तविक पाहिलें तर श्रीगणपत्युत्सवाविषयीं असा गैरसमज होण्याचें कांहीं कारण नाहीं. श्रीगणपती हा ब्रह्मा, विष्णु, महेशादि देवांचाही आदिदेव आहे, मधुकैटभ दैत्यांशीं युद्धप्रसंग चालला असतां श्रीविष्णूसही यश येईना ह्मां त्यानें ह्या आदिदेवाची आराधना करून त्यास प्रसन्न ले व त्याच्या कृपेनें श्रीविष्णूनें त्या दैत्याचा संहार केला वगैरे अनेक कथा श्रीगणेश पुराणांत आहेत. कोणताही ले कागदावर लिहिण्यापूर्वी श्रीगजानन असें लिहि-ण्याची पूर्वापार वहिवाट पडली आहे. हा देवांचाही देव असल्यामुळें सर्व धर्मसंबंधीं कार्यांच्या आरंभीं त्याची प्रथम स्थापना व पूजा करून नंतर इष्टदेवतेची पूजा करावी लागते. कोणतेही ठिकाणीं कोणताही धर्मविधि करावयाचा असला तरी या ठिकाणीं अगोदर सुपारी मांडून तरी त्या आदिदे-वाची स्थापना करावी लागते. अडाणी लोक जातीच्याजेव-णाचा सैंपाक वाढेल त्या ठिकाणीं करावयाचा असला तरी

अगोदर त्या ठिकाणीं कणकीचा गणपती करून त्याची अगोदर स्थापना व पूजा करीत असतात. ह्यावरून श्रीगणपती हें नवीनच दैवत कोणी उत्पन्न केलें नसून त्याविषयींची पुज्यबुद्धि नवी नाहीं, हें उघड दिसून येईल. दरवर्षी भाद्रपद शुद्ध चतुर्थीस त्याची पूजाअर्चा व उत्सव करण्याची चाल फार जुनी आहे. दरसाल श्रीगणपतीची मृण्मय मूर्ति करून तिची आपल्या येथें स्थापना करावयाची, त्याची जागा रंग वगैरे देऊन सुशोभित करावयाची, त्या जागीं आरसे, हंड्या वगैरे लावून आरास व रोषनाई करावयाची, शक्तीप्रमाणें कथा कीर्तन करावयाचें, ऐपतीप्रमाणें ब्राह्मणभोजन घालावयाचें व ह्याप्रमाणें दोन दिवस, चार दिवस, दहा दिवस इच्छेस येइल तशा थाटानें, समारंभानें व प्रेमानें त्याचा उत्सव करून शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या व इष्टमित्रांच्या गणपतीबरोबरच आपलाही गणपती रस्त्यानें टाळ मृदंग घंटा वगैरे वाजवीत व मोरयाच्या नांवाचा जयघोष करीत नदीवर विसर्जनासाठीं न्यावयाचा ही गरिबीची रीत अद्यापपर्यंत चालू आहे. मराठ्यांच्या कारकीर्दीत श्रीगणपतीचा उत्सव मोठ्या खर्चानें व थाटानें होत असे. श्रीमंतांच्या येथें ह्या गणपत्युत्सवाकरितां निराळीच जागा करून ठेवलेली असे. ह्या जागांस कोठें गणपतीमहाल, गणेशचौक वगैरे नांवें पडलेलीं अद्यापही काळाच्या तडाक्यांतून वाचलेल्या वाडयांत ऐकण्यांत येतात. गणपत्युत्सवाचे आधीं ही जागा रंगरंगोटी छतें वगैरे देऊन व आरसे तसबिरा वगैरे लावून सुशोभित करावयाची, चित्रकारास श्रीगणपतीची भव्य, व सुंदर मूर्ति करावयास आधींच सांगन

ठेवलेलें असावयाचें त्याप्रमाणें ती मूर्ति मोठ्या लवाजम्यानिशीं वाजतगाजत व मिरवत उत्सव करण्याचे जागीं आणावयाची व तिची विधिपूर्वक ब्राह्मणांकडून प्राणप्रतिष्ठा करून स्थापना करावयाची, त्यांच्या पुढें नानाप्रकारचीं चित्रें मांडून त्याच ठिकाणीं अधिक रमणीयता आणावयाची शेंकडों हंडया, झाडें वगैरे लावून रोषनाई करावयाची, नगारखाने, वाजंत्री वगैरे झडावयाचे, ही मौज पाहण्यासाठीं हजारों लोकांच्या झुंडींच्या झुंडी रात्रीच्या रस्त्यानें फिरावयाच्या; गणपतीपुढें नाच, गाणें, कथा, कीर्तनें वगैरे व्हावयाचीं, हजारों ब्राह्मण जेऊं घालावयाचे. ह्याप्रमाणें दहा दिवस आनंदोत्सव होऊन विसर्जनासाठीं गणपतीची मोठी टोलेजंग स्वारी निघावयाची. श्रीमंतांच्या गणपतीबरोबर सरदार, दरकदार, मानकरी, शेट सावकार वगैरे बड्या बड्या लोकांचे गणपती, हत्तीच्या अंबारींत, रथांत पालखींत वगैरे वहानांतून विराजमान होऊन, पुढें अनेक प्रकारचे वाजंत्री, होलार, शिंगें, कर्णे वगैरे वाजविणारांच्या ताफ्यानिशीं व तोफा, स्वार, शिबंदी, डंका, निशाण, जिलबीचे हत्ती व घोडे, मानकरी, सरदार, दरकदार वगैरे मंडळीसह निघून रस्त्यानें मिरवत, थांबत व लेजीम, दांडपट्टा, बंधाटी वगैरे खेळणारे मधून मधून खेळ करीत, बंदुका, कडाबिनी वगैरेंचे बार उडवीत, मोठया आनंद घोषानें नदीवर वगैरे जलाशयाकडे जात असे. सातारा, पुणें ह्या मुख्य राजधानींच्या ठिकाणीं अशा थाटानें होत असलेले गणपतीचे उत्सव व मिरवणूक पाहिलेले वृद्ध लोक अद्यापही क्वचित् जिवंत असल्यास ह्या उत्सवाची

साक्ष देतील. ह्या उत्सवांत गणपतीची जागा रंगविणारे, गणपतीचे चित्र करणारे, आरास व रोषनाई करणारे वगैरे ठराविक इसमांचे वंशज आपल्या वडिलांस त्यांबद्दल इनामें, वर्षासनें वगैरे नेमणुका असल्याचें सांगण्यास अझून हयात असतील. येथें श्रीमंत पेशवे यांच्या शनिवारच्या वाड्यांत ज्या दरवाज्यावरच्या नवखणी महालांत श्रीगणपतीचा उत्सव होत असे त्यास गणेशदरवाजा हें नांव व त्या दरवाज्याच्या एका बाजूस श्रीगणपतीची स्थापन केलेली मूर्ति अद्याप त्याची साक्ष देत आहेत. त्यावेळेच्या सरदार घराण्यांतील जे पुरुष अद्याप हयात आहेत तेही अद्यापपर्यंत श्रीगणपत्युत्सव मोठ्या समारंभानें करीत आहेत. पेशवाईनंतर कित्येक वर्षें गोसावी पुऱ्यांतील श्रीमंत गोसाव्यांच्या येथें दरसाल होणारे वर सांगितलेल्या थाटाचे गणपत्युत्सव, आरास, रोषनाई व त्यांची संगमावर विसर्जनासाठीं लष्करी पोषाक केलेल्या शिपायांच्या लवाजम्यानिशीं कडाबिनींचे बार काढीत निघणारी मिरवणूक मोठ्या उत्साहानें पहावयास गेलेले लोक अद्यापही जिवंत असतील. अजूनही बडोदें, इंदूर, ग्वाल्हेर, उज्जनी, कोल्हापूर, सागली, मिरज, जमखिंडी वगैरे संस्थानांत संस्थानिकांचे गणपत्युत्सव वर सांगितलेल्या थाटानें होत असतात, व त्यांची मिरवणूकही वर सांगितलेल्या थाटानें होत असून, त्यांचे मिरवणुकींत कित्येक संस्थानांतील गोऱ्या रेसिडेंटासही सामील होऊन मान द्यावा लागतो. मोरगांवास श्रीमोरया गोसांवी यांच्या वेळेपासून श्रीगणपतीचीं द्वारें भजनी मेळ्यांसह मिरवत निघण्याची वहिवाट अद्याप चालू आहे. वांईस दरसाल-

द्वारें मिरवितात ते त्याच वहिवाटीचें अनुकरण होय. मुंबईचे श्रीगणपत्युत्सव व तेथील गणपतीच्या मृण्मय मूर्ति प्रसिद्धच आहेत. ह्या गणपतीच्या मिरवणुकी ठिकठिकाणचे गणपती मिळून निघत असतात व त्यांच्या-पुढें श्रीगणपतीचें भजन करीत मोठ्या प्रेमानें नाचत चाल-लेले कोंकणी लोकांचे मेळ पुष्कळांनीं पाहिले असतील.

ह्यावरून हल्लीं होत असलेल्या थाटानें गणपत्युत्सव व त्यांची मिरवणूक ही ताबुताच्या वळणावर काढलेली नवी टूम नसून जुनीच आहे, हें कोणाच्याही लक्ष्यांत येईल. ह्यांत ताबुतांतील कोणत्याही गोष्टीचें अनुकरण नसून ताबुतावर तोड काढावी, त्यावरून लोकांची मनें वळवून इकडे लावावीं व आपल्या मुसलमान बंधूंस चिडवावें ह्या हेतूनें तो कोणी लोकांस भर देऊन करविला नाहीं. ताबूत जसे ठिकठिकाणीं असुरखान्यांत मशिदीच्या आकाराचे करून बसवितात, सडकेवर मांडवांत हंड्या वगैरे लावून रोषनाई करितात, नऊ दिवस जोगीचे, शिद्दीचे वगैरे मेळ, व वाघ, अस्वल वगैरे नाना-तऱ्हेचीं सोंगें घेऊन फिरतात. नालसाहेब व पंजे मिरवितात, हसन हुसेनच्या लढाईचीं वीर व शोकरस-प्रधान गाणीं गातात, कत्तलचे रात्रीं ताबूत ठिकाणावरून हलवून दहावे दिवशीं विसर्जनाकरितां जलाशयावर नेतात तसे गणपत्युत्सवांत हिंदु लोक गणपतीची स्थापना उंचवट्या जागेंत, देवळांत, दिवाणखान्यांत, आंगणांत वगैरे ठिकाणीं करून रस्त्यावर मांडव देतात. हंड्या, झाडें वगैरे लावून रोषनाई करितात, चित्रें मांडतात, त्याच्या पुढें नऊ दिवस मेळे गणपतीच्या आराधनेचीं पदें तालसुरांत गातात,

ही मौज भक्तिपूर्वक पाहण्यासाठीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी रात्रीच्या लोटतात, व दहावे दिवशीं रथांत, गाड्यावर वगैरे वाहनांवरून त्यांस मिरवत, वाजत, गाजत विसर्जनासाठीं नदीवर नेतात येवढ्यावरून ते ताबुताच्या वळणावर मुसलमानांत बखेडे उत्पन्न करण्यासाठीं मुद्दाम केले हें म्हणणें चुकीचें आहे. लोकांच्या मनांत श्रीगणपत्युत्सव मोठ्या प्रमाणावर करण्याची स्वाभाविक स्फूर्ति झाली परंतु तशा मोठ्या प्रमाणावर तो करण्यास पुरेसा पैसा नसल्यामुळें एकट्याच्यानें तसें करणें अशक्य असल्यामुळें आळीआळीच्या व पेठेपेठेच्या लोकांनीं वर्गणी गोळा करून त्याचा सार्वजनिक उत्सव करण्याचें योजिलें व सार्वजनिक उत्सव प्रशस्त सार्वजनिक जागेंतच व्हावयाचा. कोणा एखाद्याच्या घरांत करणें कोणास पसंत पडावयाचें नाहीं व तशीं प्रशस्त घरेंही अलीकडे लोकांजवळ नाहींत. तथापि ज्यांना ज्यांना तशी सवड झाली व वर्गणीदारांच्या पसंतीस आलें त्याप्रमाणें त्यांनीं प्रशस्त वाड्याच्या आंगणांत, दिवाणखान्यांत, धर्मशाळेंत, देवळांत वगैरे ठिकाणीं त्याची स्थापना केली व ज्यांना तशी सवडच नाहीं, त्यांनीं दुकानांत, व उघड्या बखळींत ती केली. कोणत्याही ठिकाणीं गणपतीची स्थापना करण्यास शास्त्राची आडकाठी नाहीं हें वर सांगितलेंच आहे तरी प्रशस्त जागा असून मुद्दाम कोणी गणपतीची स्थापना उघड्या जागेंत केली असें नाहीं. आतां कोणत्याही देवाच्या उत्सवांत दिपोत्सव हा आहेच. तेव्हां वर सांगितल्याप्रमाणें ज्या ज्या ठिकाणीं गणपतीची स्थापना केली त्या त्या ठिकाणास

भव्य स्वरूप यावें व त्याठिकाणीं प्रशस्तपणें दीपोस्तव करितां यावा ह्मणून लोकांनीं सडकेवर मांडव दिले. मांडव देण्याची चाल फार पुरातन आहे हें पुराण ग्रंथांवरून आढळून येईल. ह्या चालीचें अनुकरण लोकांनीं श्रीमारुतीचे व इतर देवाचे उत्सवांत, लग्नकार्यांत, पानसुपाऱ्या, सभा वगैरे प्रसंगीं करावें; त्यांत हंड्या, झुंबर, चिमण्या वगैरे लावून रोषनाई करावी व तसबिरा वगैरे लटकवून त्यांस अधिक सुशोभित करावें आणि श्रीगणपत्युत्सवांतच ते प्रकार करूं नये हें कोणत्या भ्रमिष्ट डोक्यानें कोठलें शास्त्र हुडकून काढलें आहे तें समजत नाहीं. तसेंच श्रीगणपतीपुढें कोंकणांत व मुंबईत कोंकणी लोकांचे मेळे अडाणी चालीचीं पदें मोठ्या प्रेमानें मृदंगाच्या ठेक्यावर ह्मणून ठिकाठिकाणच्या गणपतीपुढें नाचतांना जर आढळतात, अक्षतृतिया, नागपंचमी, गोकुळअष्टमी वगैरे उत्सवांत श्रीकृष्णाचीं रासक्रीडेचीं वगैरे पदें गाऊन टिपऱ्या खेळण्याचें निरनिराळें हस्तलाघव व त्यांच्या ठेक्यावर निरनिराळ्या तऱ्हेनें झटकन् फिरण्याचें कौतुक दाखवीत रस्त्यानें फिरणारे मेळे जर पुरातन कालापासून दृष्टीस पडतात, श्रीज्ञानदेव तुकारामाच्या पालख्यांपुढें एकसारखे पोषाख केलेल्या लोकांचीं दिंडी भजन करीत व त्या प्रेमांत नाचत बागडत जातांना जर दिसते; तर ह्या भजनी मेळ्याचेंच श्रीगणपत्युत्सवांतील मेळे हें अनुकरण असून त्यांत सुधारणा मात्र झाली आहे असें कां न ह्मणावें व लोकांनीं श्रीगणपत्युत्सवांत वरील मेळ्यांचें अनुकरण केल्याबद्दल आमच्या मुसलमानांनीं कां ह्मणून चिडावें व आमच्या विद्वान् सुधारकांनीं ते

मुसलमानांस चिडविण्याकरितांच तयार केले अशी आपली विपरीत समजूत करून घेऊन भलतेंच बहकत कां सुटावें हें आह्मास तरी निदान समजत नाहीं. पूर्वी श्रीगणपतीच्या उत्सवांत गणपतीपुढें नायकिणींचे नाच व गाणें करीत असत. ही चाल येथें श्रीगणपतीत्युत्सव अलीकडे मोठ्या प्रमाणावर होऊं लागण्यापूर्वी होती. ही चाल देवांच्या उत्सवांत, लग्नकार्यांत वगैरे प्रसंगीं पुष्कळ ठिकाणीं अद्याप आहे व ती वाईट आहे, तिच्यापासून तरुण मंडळींत अनीतीचा प्रसार होण्यास फार मदत होते, व जे जे देवाचे उत्सव भक्तिमार्गाकडे मन लागावें म्हणून करावयाचे त्याच उत्सवांत ह्या कलावंतिणींच्या गाण्यानें तें मन विषयसुखामध्यें लटपटून जाणाऱ्या मार्गाकडे लावण्याचा प्रकार घडावा हें अगदीं निंद्य आहे म्हणून ही चाल बंद करण्याची खटपट मद्रासकडे कांहीं विद्वान, वजनदार व सभ्य लोक ज्यारीनें करीत असून तीस आमचे सुधारकाग्रणी विद्वन्मणी न्या० रानडे ह्यांचें पूर्ण अनुमोदन आहे. हींच चाल जर येथें श्रीगणपत्युत्सवांत झालेल्या मेळांनीं अनायासेंच बंद पडण्यास मोठी मदत झाली आहे तर मेळयांकडून ही कां थोडी कामगिरी बजावली गेली ? पण तिकडे लक्ष देतो कोण ? एकदां, मेळे हे मुसलमानांतील जोगी वगैरे मेळांचें अनुकरण असून ते मुसलमानांस चिडविण्याकरितां मुद्दाम केले आहेत अशी मनाची समजूत करून घेतली असल्यावर त्यापासून घडणारे कितीही चांगले परिणाम नजरेस पडले तरी ते वाईटच. कां असेंच नाहीं ? मेळांनीं काय कुणाचें घोडें मारलें आहे, ह्मणून

त्यांचे पोषाक, पदें, फिरणें वगैरे सर्वच वाईट दिसावें ? जोगी वगैरे मेळांत पुरुषांनीं बायकोचें सोंग घेऊन नटाप्रमाणें हावभाव करून नाचणें वगैरे अश्लील व निंद्य प्रकार ह्या गणपतीच्या मेळांत मुळींच नाहींत. तसेंच ह्या मेळांत शिद्दी वगैरे सारखीं सोंगें घेऊन कांहीं तरी हंसूं येण्यासारखें गाणें गाऊन व शरीरविक्षेप करून हलकटपणा दाखविण्याचा प्रकार नाहीं. वाघ, अस्वल वगैरे हिडीस सोंगें नाहींत. धांगडधिंगा नाहीं, अभद्र भाषणें नाहींत, निर्लज्जपणा नाहीं, नालसाहेबांची व पंजांची धामधूम नाहीं, हैदोसचा धुडकूस नाहीं, स्त्रियांची अमर्यादा नाहीं, कोणताही वाईट प्रकार नाहीं, मग ह्या मेळांनीं ताबुतांतील मेळांचें अनुकरण तें काय केलें? उलट बिचारे मेळे श्रीगणपत्युत्सव महिना दोन महिने पुढें आहे तोंच, अचकटविचकट लावण्या म्हणणें व ऐकणें, तमाशे व नाटकें पाहणें व दुसऱ्या वाईट छंदांत रात्र घालविण्याचें सोडून श्रीगणपतीची स्तुतिपर पदें सुस्वर व तालसुरांत गाण्याच्या अभ्यासांत निमग्न होतात, व रात्रीस निशाचर वृत्तीनें फिरणाऱ्या बाहेरख्याली लोकांसही चार घटका ही ईशनामस्मरणाची करमणूक दाखवून अडकवून टाकतात, ह्यांत ते, वाईट तें काय करितात? जोंपर्यंत सर्वच लोक स्वतंत्र व तात्त्विक विचारानें आपल्या आपण नीतिमान् होणें शक्य नाहीं, तोंपर्यंत त्यांस धर्म व नीतिमार्गाकडे लावण्यास हे करमणुकीचे प्रकारच उपयोगाचे आहेत. नुसत्या लांबलांब लेक्चरानें अथवा लेखानें अज्ञान लोकांच्या मनावर इष्ट परिणाम घडत नसतो. आपल्याला जर आपल्यापुरती व तीही ऐषआराम,

चैन, विलास व विषयसुख हीं वाढविण्यापुरतीच सुधारणा पाहिजे असेल तर पोषाखांत, खाण्यापिण्यांत, स्त्रियांच्या रहाण्यांत व वागण्यांत, लग्नपद्धतींत, गाण्याबजाव्यांत वगैरे ज्या ज्या सुधारणा आवडत असतील त्या त्या आपल्या घरांत व मित्रमंडळींत खुशाल वावरूं द्याव्या, व साहेबी चवचालपणाचें, नखऱ्याचें व ढबींचें पूर्ण अनुकरण करून व त्या प्रीत्यर्थ लाखों रुपयांचा चुराडा उडवून आणखी लोकांस नांवें ठेवण्यास व ब्रम्हज्ञानही शिकविण्यास तयार व्हावें, परंतु आपल्यास जर आपल्या अंतःकरणाची सुधारणा व शुद्धता, अज्ञान व उनाड समाजाला घेऊन करावयाची असेल तर हे मेळ्यांसारखे ईश्वरभजनांत तल्लीन करून रंजविणारे उपाय व श्रीगणपत्युत्सवासारखे चित्ताकर्षक उत्सव लोकांत मिळून मिसळून केले पाहिजेत, हें खऱ्या सुधारकास सांगण्याचें कारण नाहीं. असें असून मेळांच्या नांवानें विनाकारण खडे फोडावयाचे, त्याच्या गाण्यास बायकी चालीचीं गाणीं, त्यांच्या पोषाखास मोठ्या खर्चाचे व निरुपयोगी म्हणून कुटाळकी करावयाची ह्यांत कोणता शहाणपणा व लाभ आहे कोण जाणे! मेळ्यांच्या पोषाखांत पैसे जातात तेव्यांस तसे पोषाख करावयास कोणी जुलमानें लावितो असें नाहीं, उलट त्यांनीं आपापले पोषाक नेहमीं उपयोगी पडतील असे व स्वदेशी टिकाऊ कापडाचे करावे असा त्यांस समंजस लोकांकडून उपदेश होत आहे. परंतु गनाची आवड व हौस हीं कोणचें कांहीं चालू देत नाहीं. मोठमोठे अर्थशास्त्र वेत्ते, जाणते, स्वदेशहित पाहणारे ज्ञान लोक जर ह्या हौसेच्या स्वाधीन होऊन तिचे गुलाम

बनले आहेत, तर अज्ञान लोकांस काय दोष द्यावयाचा. साध्या, ठिकाऊ, कमी किंमतीच्या कपड्यानें शरीर संरक्षण होण्यासारखें असून सुंदर, तलम, गुलजार व मूल्यवान परदेशच्या कपड्यांचा व्यापार इकडे कोणी वाढविला ? नानाप्रकारचीं कांच पात्रें, दिवे, टेबलावर केवळ डोळ्यांचें पारणें फेडण्यासाठीं ठेवावयाच्या वस्तु, लांकडी सामान, तसबिरा वगैरे जिनसा ज्यावांचून कांहीं अडावयाचें नाहीं अशा खरेदी करून आपले दिवाणखाने श्रृंगारण्यांत हजारों रुपयांचा फन्ना उडवून परदेशास श्रीमंत कोण करीत आहे ? आपल्या पोषाखाची ऐट वाढविण्यासाठीं विलायती बूट स्टॉकिंग वगैरे जिनसा वापरण्यांत आणून देशास कोण भिकेस लावीत आहे ? आपल्या जिभेच्या चवचालपणासाठीं नाना प्रकारच्या परदेशी खाण्यापिण्याच्या वस्तु कोण बापरीत आहे ? आपल्या बायकापोरांची चैन उडविण्यासाठीं व हौस पुरविण्यासाठीं लाखों रुपये कोण उधळीत आहे ? फक्त मेळेवालेचना ? किं त्यांत आमचे शहाणे ह्मणविणारे सुधारकही आहेत ? ह्यावरून मेळेवाल्यांच्या पोषाखांत देशाचा पैसा फुकट जातो म्हणून तळमळणारांनीं अगोदर आपण काय करीत आहों ह्याचा विचार करावा आणि नंतर दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ हुडकून काढण्याचा प्रयत्न करावा. एरवीं तसें केलें असतां आपलें हसें मात्र होतें. आतां मेळ्यांच्या पदांना आमची सुधारक मंडळी नाकें मुरडितें, परंतु तीं बहुत करून संगीतांतल्या चालींवरच बसविलेलीं आहेत. संगीत नाटकांतलीं पदें जर लोकांना आवडतात, तर त्याच चालीवरचीं गणपतीचीं पदें

कां आवडूं नये ? गणपतीचीं पदें बहुतकरून भक्तिरसानें भरलेलीं असल्यामुळें तीं श्रृंगारप्रिय मंडळीस निरस वाटावीं. ह्यांत कांहीं नवल नाहीं. ज्यांना भक्तिरसाची गोडी आहे अशा लोकांसाठीं तीं आहेत व त्यांना तीं इतकीं आवडतात कीं, रस्त्यानें एखादा मेळ आढळला कीं, त्याचें एखादें तरी पद ऐकावयास मिळावें ह्मणून लोकांची झुंड त्याच्यामागें चाललेली असते. गणपतीपुढें एखादा मेळ आपलीं पदें गात उभा असला तर त्याच्याभोंवतीं तीं ऐकण्यासाठीं इतकी गर्दी होते कीं, रस्त्यानें जाणारास रीघ देखील मिळत नाहीं. तसेंच त्यांस कित्येक श्रीमान व विद्वान लोक आपल्या घरीं मोठ्या आस्थेनें बोलावून चार घटका त्यांचें भजन प्रेमानें ऐकतात. आतां ज्यांना प्रेमगुंफेंतच अडकून राहण्याची गोडी लागली आहे, त्यांना जर मेळ्यांचीं पदें आवडलीं नाहींत, तर तेवढ्यानें ह्मणजे त्यास कमीपणा येतो असें नाहीं. येथपर्यंत मेळ्यांविषयीं झालें.

आतां ताबुताचा उत्सव नऊ दिवस होऊन ते दहावे दिवशीं पाण्यांत टाकण्याकरितां एकाच मिरवणुकीनें नेतात ह्यावरून गणपतींचा उत्सवही नऊ दिवस करून दहावे दिवशीं त्याची एकच मिरवणूक काढिली, हें ताबुताचें अनुकरण केलें, असें जे ह्मणत असतील, त्यांना वेड लागलें आहे असेंच ह्मटलें पाहिजे श्रीगणपतीचा उत्सव दहा दिवस करण्याची पूर्वापार मर्यादा आहे; व सर्व गणपतींची एकच मिरवणूक काढणें, हेंही नवीन नाहीं, हें मराठ्यांच्या कारकीर्दीतील उत्सवांची ज्यांना माहिती आहे त्यांना सहज दिसून येईल. ताबुतास दहावे दिवशीं पाण्यांत

टाकितात, पण गणपतींचेंही विसर्जन पूर्वीपासून पाण्यांतच होत आहे. ह्यांत अमक्याचें अमक्यानें अनुकरण केलें असेंच जर म्हणावयाचें तर हिंदूंच्या पूर्वापार चालीरितींचें मोहरमाच्या उत्सवांत मुसलमानांनीं अनुकरण केलें हें म्हणणें अधिक सयुक्तिक आहे. तसेंच, गणपतीविसर्जन झाल्यानंतर परत येतांना त्याची प्राथर्नापर पदें गाणें, कोणत्याही देवापुढें धूप जाळून त्याचा अंगारा लावणें व पूज्य देवतेवर गुलाल, फुलें, धान्य, मेवामिठाई वगैरे उधळणें ही चाल फार पुरातन असून तिचें अनुकरण अलिकडचे विद्वान लोकही एखाद्या साहेबास पानसुपारी केल्यानंतर परत फिरतांना त्याच्या आंगावर फुलें, नाणें वगैरे उधळतांना व त्याचें आपसांत गुणानुवाद गातांना करीत आहेत. मराठेशाई व पेशवाई नष्ट झाल्यावर अनेक कारणांमुळें सर्वच स्थिति बदलली, व हिंदु समाज विस्कळित झाला. कोणी कोणाच्या कह्यांत नाहीं; कोणाचा जोडा कोणाच्या पायांत नाहीं, जो तो आपला एकटाच फटकून वागणारा; अशी स्थिति झाल्यामुळें श्रीगणपतीचे उत्सवही कमी पडले व जो तो सालावाद आपल्या घरीं त्याची स्थापना व उत्सव करून अनंत चतुर्दशीच्या आंत इच्छेस येईल त्या दिवशीं आपल्या शेजाऱ्या पाजाऱ्याच्या गणपतींबरोबर आपलाही गणपती विसर्जनाकरितां नेऊं लागला. ही शिथिलता पांच सहा वर्षांपासून नाहींशी होऊन श्रीगणपतीचे उत्सव पूर्वीच्या नमुन्यावर पुन्हा होऊं लागले ही मोठी आनंदाची गोष्ट मानली पाहिजे. ह्यांतही पूर्वी श्रीमंत लोक आपापले

उत्सव स्वतः पैसे खर्च करून स्वतंत्र करीत होते, व आतां आळीआळींचे व पेठेपेठेचे लोक श्रीगणपत्युत्सवाच्या निमित्तानें तरी एकत्र होऊन, प्रत्येकजण त्यांत पैशानें व आंग मेहनतीनें झटून मदत करूं लागले, श्रीमंत व गरीब, विद्वान व अज्ञान आणि वृद्ध व तरुण असे सर्व जातींचे लोक, ह्या निमित्तानें तरी एकमेकांत मिसळून वागूं लागले, एकमेकांच्या चालीरिती, एकमेकांस माहीत होऊं लागल्या. गरीब व अज्ञान लोकांस समंजस व विद्वान लोकांच्या सहवासानें अनेक विषयांवर बोलण्याचालण्याचा प्रसंग येऊन बरीच माहिती होऊं लागली ही विशेष आनंद मानण्यासारखी गोष्ट आहे. हे गणपत्युत्सव असेच चित्ताकर्षक होऊन त्यांवर लोकांची अधिक पुज्यबुद्धि बसत चालली व त्यांत एरवीं गरीब लोकांपासून दुरभिमानानें अलग राहिलेले लोक अधिक अधिक मिसळूं लागून त्यांच्या ज्ञानाचा फायदा समाजास होऊं लागला ह्मणजे त्यापासून पुष्कळ हित होण्याची आशा आहे.

येथपर्यंत श्रीगणपत्युत्सव व त्यांतील मेळे, हे ताबुताचें अनुकरण नसून ते मुसलमानास चिडविण्याकरितां मुद्दाम कोणीं करविलेहि नसून जुन्या हिंदूंच्या वहिवाटींचेंच अनुकरण आहे व स्वाभाविक स्फूर्तीनेंच ते करण्यांत आले आहेत, हें सांगितलें.

आतां आपण श्रीगणपत्युत्सव केल्यामुळें दुष्काळ व प्लेग उद्भवला हा जो भयंकर आरोप त्यावर करण्यांत येत आहे व ज्यापासून अज्ञान लोकांची मनें डळमळण्याचा संभव आहे त्याविषयीं विचार करूं.

वरील आरोप मुसलमान व धर्माभिमानाचें ढोंग दाखवून, अंतर्यामीं धर्मभ्रष्ट झालेल्या कांहीं धूर्त भटांकडून करण्यांत येत आहे. व तो आपल्या पथ्यावर पडण्यासारखा आहे म्हणून सुधारकही त्याचा आसरा करीत आहे. मुसलमानांची, हिंदूंचा धर्म व त्यांचे देव ह्यांवर पहिल्यापासून कितपत श्रद्धा आहे हें सर्वांस माहीत आहेच. हिंदूंच्या देवाच्या मूर्ति फोडून त्यांची विटंबना करणें व त्यांचीं देवळें भ्रष्ट करणें हें ज्यांचें ब्रीद तेच मुसलमान दुष्काळ व प्लेग हीं अरिष्टें कोसळल्यावरोबर श्रीगणपती हें मोठें कडकडीत दैवत आहे व त्यास शिवताशिवत झाली असतां त्याचा कोप होऊन हीं अरिष्टें कोसळतात असें ह्मणण्यास एकदम कसे तयार झाले? त्यांचा जर श्रीगणपतीवर दुष्काळ व प्लेग ह्या अरिष्टांमुळें खरा विश्वास बसला असेल तर ते पूर्वी दंग्याच्या धामधुमींत येथें जो गणपती फोडण्यांत आला व ज्या कित्येक देवळांत बकऱ्याच्या मुंड्या टाकण्यांत येऊन तीं भ्रष्ट करण्यांत आलीं त्याबद्दल दुःख प्रदर्शित करण्यास खऱ्या अंतःकरणानें तयार आहेत काय? तसें करण्यास ते तयार होणार नाहींत अशी आमची खात्री आहे. त्यांचा हेतु इतकाच आहे कीं, कोणीकडून तरी, बावळट अज्ञान हिंदूंची समजूत घालून गणपतीचा उत्सव बंद पडेल असा प्रयत्न करावा. त्यांना हें पक्कें माहीत आहे कीं, बावळट हिंदूंस धर्म ह्मणजे काय, त्यावर श्रद्धा ठेवावयाची ह्मणजे काय व धर्माभिमान ह्मणजे काय हें कांहीं समजत नाहीं. आपली इच्छा पूर्ण करणारा सर्व समर्थ परमेश्वर आहे हें न जाणून ते वाटेल त्या थोतां-

डांवर भरंवसा ठेवण्यास तयार असतात. कोणी एखादा ढोंगी अवधूत पोरें देतो, नवराबायकोचें वितुष्ट पडलेलें असल्यास त्यांचें चांगलें जुळवून देतो, दुखणेंबहाणें बरें करितो, आपल्या शत्रूला चीत पाडतो, व्यभिचारी स्त्रीला आवडता पुरुष मिळवून देतो व चोरालाही प्रसन्न होऊन सहाय्य करितो अशा अफवा त्यांच्या कानीं आल्या कीं, ते देवाला विसरून त्याच्या सेवेला लागावयास, त्याचे पाय धरावयास व त्यास नवस करून संतुष्ट करावयास धांवतात. सदाचरणानें व नीतीनें वागून ईश्वराची निष्काम भक्तिभावानें सेवा केली असतां, त्याच्या कृपेनें संतति, संपत्ति, व सुख आपोआप प्राप्त होते हें न जाणून ते संतति, संपत्ति व सुख यासाठीं, घटकेंत बहिरोबाला, घटकेंत चेडोबाला, घटकेंत जोखाईला, घटकेंत मरी आईला, घटकेंत दावलमलिकाला, घटकेंत घोडेपिराला, घटकेंत बाराइमामाला, घटकेंत शेख सल्लाला, घटकेंत वाकड्याच्या बागेंतील किरस्तावाच्या थडग्याला, घटकेंत मंबादेवीला खेटे घालितात व त्यांच्या जत्रा व कंदुऱ्या करितात. अशा लोकांना प्लेग व दुष्काळ हीं अरिष्टें गणपतीची स्थापना सडकेवर केल्यानें व त्यास शिवताशिवत झाल्यानें उद्भवलीं असें सांगितलें कीं, त्यांचीं मनें त्यावरून उडाल्यावांचून राहावयाचीं नाहींत, इतकेंच नाहीं तर ह्यापुढें गणपती ह्या देवाला आपल्या देव्हाऱ्यांतून ते घालवून देण्यासही कमी करणार नाहींत; हें आमचे धूर्त मुसलमान बंधु जाणत असल्यामुळें त्यांनीं त्यांची त्याप्रमाणें समजूत घालण्याचा प्रयत्न चालविला आहे. अलिकडच्या गणपतीच्या उत्सवांत कांहीं धूर्त भटजीची हवी तशी

पोळी पिकली नाहीं, ह्मणून त्यांनींही गणपतीस शिवता शिवत झाली, त्याची यथासांग पूजा झाली नाहीं, अन्न-शांति झाली नाहीं, म्हणून श्रीगणपती हें महा कडकडीत दैवत कोपलें व त्यामुळें दुष्काळ व प्लेग हीं अरिष्टें आपल्या वर आलीं, असें अज्ञान लोकांस सांगण्याचा क्रम चालविला आहे. अशी समजूत घालण्यांत त्यांचा येवढाच हेतु आहे, कीं येत्या गणपत्युत्सवांत लोकांनीं जिकडे तिकडे लाडू, जिलब्या वगैरें मिष्टान्नांचीं सहस्र भोजनें घालून दहा दिवस भटजीबुवांना अगदीं तृप्त करावें व गणपतीच्या उत्सवा-करितां जमा होणाऱ्या पैशापैकीं फारच थोडा पैसा लहानशी गणपतीची मूर्ति विकत घेण्यांसाठीं एक दोन समया लावण्या-साठी व विसर्जनाच्या दिवशीं चिमूट चिमूट खिरापत गणप-तीचा प्रसाद म्हणून दहा दिवस रात्रंदिवस खपून मेहनत कर-णारांच्या हातावर ठेवण्यासाठीं खर्च करून बाकी सर्व ह्या धूर्त भटांच्या पदरांत पूजेची दक्षिणा, मंत्रजागराची दक्षिणा, महा-दक्षिणा अशा अनेक प्रकारच्या दक्षिणा म्हणून घालावा. ह्या भटजीबुवांनीं ईश्वरोपासनेची सर्व सांगता आपल्या मिष्टान्न भोजनांत व हिरण्यगर्भ दक्षिणेंत आणून ठेविली आहे. देवाच्या उपासनेला चित्ताची एकाग्रता, पूज्यबुद्धि व भक्ति यांची मुळींच जरूर नसून यथासांग पूजासाहि-त्याचीही गरज नाहीं, फक्त ह्या सोंवळ्या ब्राह्मणांच्या हातून नुसत्या तांदळाच्या अक्षतांवर सर्व पूजा साहित्यांची पूर्तता होते. परंतु भोजन व दक्षिणा यावांचून त्याची सांगता होत नाहीं. काय चमत्कार आहे, पहा ! देवाला गंध, फुलें, धूप, दीप, नैवेद्य वगैरे न मिळालें तरी तो नुसत्या

तांदळाच्या अक्षतेवरसुद्धां संतुष्ट राहतो आणि त्या बाहेरून सोंवळ्या परंतु अंतर्यामीं द्रव्यलोभानें विटाळलेल्या ब्राह्मणांस मिष्टान्न भोजन व भरपूर दक्षिणा न मिळाली म्हणजे त्याचा कोप होतो !!! भिक्षु वृत्तीच्या ह्या ब्राह्मणांनीं आपलें पोट भरण्यासाठीं इतकेंच नाहीं तर आपल्यास व आपल्या बायका पोरांस मनासारखें व हौसेसारखें अन्नवस्त्र व दागदागिने मिळावें म्हणून आपली धर्मश्रद्धा पार झुगारून देऊन धर्माच्या नांवावर फक्त पैसे काढण्याकडे लक्ष ठेविलें आहे. गरिबाच्या येथें पूजेबद्दल फारसें द्रव्य मिळावयाचें नाहीं, हें उघड जाणून त्यांस त्यांना पूजा सांगतांना संक्षेप व अतिसंक्षेपही करण्यास बिलकूल दिक्कत वाटत नाहीं. श्रावण महिन्यांत श्रीशंकरास अभिषेक करविणारीं भोळीं भाबडीं गिऱ्हाईकें जितकीं मिळतील तितकीं पतकरून प्रत्येक अभिषेकामागें चार आणे, आठ आणे मिळतील तितके खिशांत टाकून एकाच अभिषेकावर व अर्ध्यामुर्ध्या एकादशनीवर व पाटीभर बेल एकदम डोक्यावर झुगारून श्रीशंकराची समजूत घालून सर्व गिऱ्हाइकांची कामगिरी बजावून टाकण्यांत आपल्याकडून कांहीं अधर्म घडत आहे असें त्यांस वाटत नाहीं. लग्नकार्य उत्तरक्रिया श्राद्ध, पक्ष, व्रतोद्यापनें वगैरे गरीब व अज्ञान लोकांच्या येथलीं हव्यकव्यें, बाहेरून शिवताशिवत करून येऊन यथासांग सांगतांना पुराणोक्त मंत्र पाठ नसले म्हणजे शाळेंतील क्रमिक पुस्तकांतील कविता अथवा न समजेल अशा शब्दांची सुरावर म्हटलेलीं वाक्यें देखील ढकलून देण्यांत त्यांस कांहीं पातक वाटत नाहीं, देवापुढें कथा करणारे हरिदास

देवास दोन पैशांचा हार असला तरी त्याकडे लक्ष देत नाहींत, परंतु आपल्यास सव्वारुपयाचा कमालखानी हार पाहिजे असा हट्ट धरीत असतात. ही ईश्वराची भक्ति व अशा प्रकारें देवांची व धर्मविधींची स्वतः विटंबना करून पैसा मिळविण्याचा धंदा करणारे ब्राह्मण दुष्काळ व प्लेग ह्याबद्दलचा आरोप स्वतःवर लादून घेण्यास तयार न होतां परस्पर लोकांवर लादण्यास तयार झाले, ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे.

खरें पाहिलें असतां श्रीगणपती हा आदिदेव आहे, त्याची स्थापना स्मशानांत केली तरी त्यास राग यावयाचा नाहीं. त्याची पूजा उत्सव व आराधना गरीब नीच जातीच्या, अडाणी व कोणत्याही शास्त्राचें ज्ञान नसलेल्या मनुष्यानें भक्तिपूर्वक येईल तशी केली तरी ती त्यास प्रिय आहे. तो सर्व जातींच्या लोकांच्या देव्हाऱ्यांत बसून त्यांची पूजा व नैवेद्य ग्रहण करितो. त्याचें नुसतें भक्तिपूर्वक नामस्मरण केलें तरी त्यास पावतें. त्यास ब्राह्मण व महार सारखाच आहे. कोणाचाही त्याजवर भाव असला म्हणजे झालें. विटाळचंडाळ, जातगोत व जागा हा भेद त्याचे ठिकाणीं नाहीं. तो आपले ठिकाणीं असल्यामुळें, देव व भक्तिमार्ग एका बाजूस राहून त्याचेंच ढोंग फार माजलें आहे. एरवीं देवास महारवाड्यांत महारांनीं स्थापन करून त्यावर दररोज भक्तिभावानें तांब्याभर पाणी ओतलें तरी त्यास त्याचा राग येत नाहीं. कांहीं दिवसांपूर्वी येथें मंगळवारांत महारवाड्यांत असलेल्या महादेवाचे देवळांत महादेवाच्या शाळुंकेंतून आवाज निघूं

लागला, तेव्हां शंकरास रुद्राभिषेक करून त्यांची शांति करावी म्हणून येथले कांहीं सोंवळे भट तेथें गेले होते. ते महार जर यापुढें देवास शिवणार नाहींत तर आपण शांति करितो असें म्हणूं लागले, परंतु महारांस तें बोलणें मान्य न पडून त्यांनीं स्वतांच श्रीशंकरास दुधाचा अभिषेक केला व निघत असलेला आवाज बंद झाला. ज्या महादेवाच्या येथें श्रीगणपतीनें अवतार घेतला, तो महादेव महारांनीं भक्तिपूर्वक केलेल्या अभिषेकानें शांत झाला आणि गणपतीच्या उत्सवांत, मिरवणुकीमध्यें महार, चांभार वगैरे जातींचे लोक मिसळले म्हणून त्यास शिवताशिवत झाली व त्यामुळें त्याचा कोप होऊन दुष्काळ व प्लेग हीं अरिष्टें कोसळलीं हें म्हणणें केवळ मतलबाचें आहे, हें कोणासही कळून येईल. खेडेगांवांत पाण्यांत बुडी मारून निघाले कीं, तांब्या भरून व वाळवंटांतील गारेचा गंध उगाळून मारुती, गणपती, महादेव वगैरे ग्रामदेवतावर पाणी ओतून, त्याला गंधाचा टिळा लावून प्रदक्षिणा घालणें ह्या पलीकडे दुसरा कोणताही पूजाविधि करण्याचें आडाणी लोकांस माहीत नाहीं, त्यांचा हा क्रम आज हजारों वर्षांपासून चालत आला आहे, परंतु त्यांच्या ह्या पूजामार्गानें मारुती, गणपती किंवा कोणतीही ग्रामदेवता असंतुष्ट होऊन कोपली असें झाल्याचें कधीं कोणाच्या ऐकण्यांत नाहीं. महासाधु श्रीतुकाराम, नामदेव, कबीर, गोरा कुंभार, चोखामेळा वगैरे संतमंडळींनीं तर ही बाह्योपचारिक पूजा गौण मानून भक्तिभावानें केलेली मानसपूजा व नामस्मरणच अधिक महत्वाचें मानिलें आहे, व तें विद्वान् व धर्मजाणत्या समंजस

माणसांसही कबूल आहे. ह्यावरून देवाला, जात, जागा व विशेष प्रकारची पूजा ह्यांची अपेक्षा नसून फक्त तो भावाचा भुकेला आहे, हें उघड होतें. असें असूनही लोकांनीं अलिकडील गणपत्युत्सवांत दोन्ही वेळां ब्राम्हणांकडूनच यथा-शास्त्र, गंध, फुलें, धूप, दीप व नैवेद्य वगैरे अर्पून श्रीगणपतीची पूजा, अर्चा व कित्येक ठिकाणीं कथा कीर्तन, भजन, मंत्र-जागर व धर्मसंबंधीं उपदेशपर व्याख्यानें वगैरे भक्तिमार्गीनें सुचलेले प्रकार केले आहेत, शिवाय बहुतेकांनीं शक्तीप्रमाणें दहा पांच ब्राह्मण व बाळगोपाळहीं जेऊं घातले आहेत. आतां ह्या उत्सवांत सर्व शहरभर लाडू, जिलबी वगैरे मिष्टान्नांचा सुवास पसरून जिकडे तिकडे सहस्रभोजनें, मुक्तद्वार वगैरे थाटाची अन्नशांति व महादक्षिणा वगैरे प्रकार झाले नाहींत. मात्र दुष्काळ व प्लेग ह्या संकटांस भिऊन ज्यांनीं आपलीं तोंडें येथून काळीं केलीं होतीं अशा सुधारकांच्या कधीं पाहण्यांत देखील आलीं नाहींत अशीं जेवणें, ठिकठिकाणीं गणपत्युत्सव करणारांनीं, गणपत्युत्सवाकरितां जमलेल्या पैशांतून शिल्लक राखून, व आणखी आपल्या पदरची भर त्यांत घालून, मावळे व इतर दुष्काळपीडीत लोकांस एकसारखीं दोन अडीच महिने घातलीं होतीं. ज्यांना मंडई, डोलकर आळी, बुधवार, शनवार, कसबा, रविवार, नानाची पेठ, भवानी पेठ वगैरे ठिकाणीं गणपतिभक्तांकडून जेवणें देण्यांत येत होतीं व भाकरी व धान्य वाटण्यांत येत होतें त्या गरीब अन्नार्थी लोकांचे आत्मे त्याची साक्ष देण्यास अद्याप जिवंत असतील. सुधारकांनीं, गणपत्युत्सवांत पैसा उधळणारांस

नांवें ठेवण्यापूर्वी दुष्काळांत सांपडलेल्या लोकांस अन्न मिळण्यासाठीं कोणती तजवीज केली होती व त्यांत आपल्या पदरास कितपत खार लावून घेतला होता हें ते सांगतील काय ? किंवा अशा संकटकाळीं डोळ्यांवर ढापणें बांधून पळून जावयाचें व अन्नार्थी लोकांचा भार धर्मभोळ्या साधारण लोकांवर टाकावयाचा हें ब्रीद त्यांनीं उचललें आहे ? असो. परंतु ब्राह्मणभोजनें न घालतां दुष्काळामुळें अन्नान्न करणाऱ्या दीन लोकांस जेऊं घातल्यानें श्रीगणपतीचा कोप होऊन दुष्काळ व प्लेग हीं अरिष्टें कोसळलीं हें म्हणणें मात्र मूर्खपणाचे अथवा धूर्तपणाचें आहे, कदाचित् आपली चंगळ उडाली नाहीं ह्मणून कांहीं धूर्त धर्मदुरभिमानी भिक्षुक कोपले असतील, परंतु ते स्वतां धर्मभ्रष्ट, कर्मभ्रष्ट व दुराचरणी असल्यामुळें त्यांच्या अंगात दुष्काळ, प्लेग वगैरे अरिष्टें मंत्रसामर्थ्यानें उत्पन्न करून जगाची राखरांगोळी करण्याची शक्ति नाहीं, म्हणून त्यांनीं, दुष्काळ, प्लेग वगैरे अरिष्टांचा संबंध श्रीगणपत्युत्सवाशीं जोडून व लोकांच्या मनांत भीति उत्पन्न करून आपली पोळी पिकविण्याचा नीच व कावेबाजपणाचा प्रयत्न आरंभिला आहे असें दिसतें, परंतु ह्या त्यांच्या आपमतलबी प्रयत्नामुळें मुळावरच घांव बसण्याची वेळ आली आहे, हें त्यांस कसें समजत नाहीं कोण जाणे. असो. आतां अलिकडच्या गणपत्युत्सवानेंच दुष्काळ व प्लेग आला असें म्हणावें तर, ज्यांनीं मुळींच तो केला नाहीं असें सुधारक व दुर्धारक हिंदु व जे गणपती ह्या दैवतास मुळींच न मानणारे मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, युरोपियन वगैरे शेंकडों लोक

प्लेगनें कां मेले ? त्यांच्यावर गणपतीचा कोप काय म्हणून व्हावा ? त्याचा कोप गणपतीचा उत्सव करणारांवरच झाला पाहिजे, परंतु उलट असें दिसून येईल कीं, ज्यांनीं श्रद्धापूर्वक त्याचा उत्सव केला त्यांच्यावर बहुत करून त्याची कृपादृष्टीच दिसून आली. बरें, पूर्वी महाराष्ट्रांत दुर्गादेवी नांवाचा भयंकर दुष्काळ बारा वर्षें पडला होता व अलीकडे चार पांच वर्षांपासून दमो, सागर व संबलपूर जिल्ह्यांत दुष्काळ पडत आहे, व १८७६ सालींही दुष्काळ पडला होता, त्यास श्रीगणपत्युत्सवच कारण झाला असेल काय ? पृथ्वीवर निरनिराळ्या वेळीं, निरनिराळ्या प्रदेशांत कोठेंना कोठें तरी दुष्काळ पडतच असतो व हल्लीं रशियांत दुष्काळाचें चिन्ह दिसत आहे, तेव्हां तेथील लोकांनींही श्रीगणपतीचा उत्सव यथाविधि पूजाअर्चा न केल्यामुळेंच पडत आहेत असें ह्मणावें काय ? असें जर असेल तर आमच्या येथील धर्माभिमानी भटांस त्या त्या प्रदेशांत पुरुषा झोडण्यास व दक्षिणा उपटण्यास पाठवून द्यावें ह्मणजे त्यांच्यावरचें अरिष्ट तरी टळेल. आतां प्लेग हा भयंकर रोग जरी आपल्यास अलिकडेच माहीत झाला आहे तरी फार जुना असून पृथ्वीच्या पाठीवर अनेक देशांत व शहरांत अनेक वेळां तो पजन गेला आहे, हें, अलिकडे इकडे प्लेग झाल्यापासून विद्वान् लोकांनीं त्याचा जो इतिहास वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केला आहे त्यावरून दिसून येईल. सन १६६४।६५ सालीं तो लंडन शहरांस चवदा महिने होता व त्यानें तेथील एक लाख लोक बळी घेतले ! कुस्तुंतुनिया शह-

रांत त्यानें एका दिवसांत दहा हजार माणसांचा संहार केला! ईजिप्तवर तर त्यानें अनेक वेळां स्वाऱ्या करून शहरेंचीं शहरें उजाड केलीं. महंमदाच्या वेळीं अर्बस्थानांत त्यानें आपला प्रवेश करून शेंकडों लोकांबरोबर महंमदाच्या-प्रीतींतल्या एका सरदाराची आवडती मुलगी देखील बळी घेतली. औरंगजेब बादशहाच्या कारकीर्दीत उत्तरहिंदुस्थानांत त्यानें आपली स्वारी करून त्या बादशहाच्या सैन्यावर कहर करून सोडला होता. अलिकडे चीन देशांत हाँगकाँग बंदरांत तो चार पांच वर्षांपासून येऊन जाऊन आपलें सौम्य व उग्र रूप प्रगट करीत आहे! तेथून तो मुंबईस, मुंबईहून कराचीस, तेथून पुण्यास, सरतेस, वगैरे ठिकाणीं व पुन्हा पुण्याहून मुंबईस, कलकत्त्यास पंजाबांत, हुबळींत व आणखी कित्येक ठिकाणीं त्यानें दंगा उडवून दिला आहे. आतां लंडन, कुस्तुंतुनिया, ईजिप्त, अर्बस्थान, चीन वगैरे परधर्माच्या देशांत श्रीगणपती हें दैवत व त्याची यथाविधी पूजाअर्चा हीं माहिति तरी आहेत काय? मग त्या त्या ठिकाणीं प्लेग कां उद्भवला ह्याचें कारण आमचे येथील गणपत्युत्सवावर त्याचा आरोप करणारे शोधक व धर्माभिमानी लोक सांगूं शकतील काय? हांगकांग येथें श्रीगणपतीचा उत्सव तेथील लोकांनीं केला परंतु येथील भटजीबुवांस त्यांची यथाविधी पूजा करण्यास बोलाविलें नाहीं म्हणून तेथें प्लेगनें चार पांच वर्षें आपलें ठाणें दिलें आहे काय? कराचीस प्रथम प्लेग झाला तेव्हां तेथें लोकांनीं येथल्यासारखा गणपत्युत्सव केला होता काय? कलकत्त्यास हल्लीं प्लेग आहे म्हणतात, तेथें लोकांनीं

सडकेवर गणपती बसविले आहेत काय ? हुबळीस गतवर्षी गणपत्युत्सव झाला होता काय ? मग तेथें यंदा प्लेगनें कां कहर उडविला आहे ? वरील ठिकाणीं प्लेगचा भयंकर रोग जर श्रीगणपत्युत्सवामुळें आला नाहीं तर तो येथेंच त्यामुळें आला असें म्हणणें हें वर सांगितल्याप्रमाणें मूर्खपणाचें अथवा धूर्तपणाचें असलें पाहिजे हें उघड आहे. करितां लोकांनीं अशा धूर्त व कावेबाज लोकांच्या थापावर भरंवसा ठेवून श्रीगणपत्युत्सवाविषयीं आपल्या मनाची चलबिचल होऊं देऊं नये.

अतिवृष्टि, अनावृष्टि, दुष्काळ, प्लेग सारख्या भयंकर रोगांच्या सांथी वगैरे अरिष्टें आपल्यावर ओढवण्यास कोणत्याही तऱ्हेनें केलेले देवाचे उत्सव कारण नसून तें हल्लीं जगांत आपल्याकडून जें वर्तन घडत आहे त्यांत आहे. ज्याप्रमाणें पशुपक्ष्यादि प्राण्यांस त्यांचा निर्वाह होण्यासाठीं उपजत बुद्धि देऊन तिच्या द्वारें त्यांचें खाणेंपिणें, राहणें वगैरे शारिरिक धर्माचें नियम ठरवून दिले आहेत, त्याप्रमाणें मनुष्य प्राण्यासही सदसद्विचार शक्तीच्या द्वारें आपलें अन्नवस्त्र मिळविण्याचे नियम घालून दिले आहेत. आपली सदसद्विचारशक्ति आपल्यास असें सांगत आहे कीं, आपले जीवित ह्या जगांत क्षणभंगुर आहे करितां आपलें अन्न व वस्त्र कोणासही त्रास, पीडा व दुःख न होईल आपल्यासाठीं दुसऱ्यास निर्वाह करण्याचें कठिण न पडेल व कोणाच्या जिवास धोका न येईल अशा मार्गानें मिळवावें. होईल तितकें करून गरीब, निरुपद्रवी, अनाथ, व पंगु अशा प्राण्यांस हरएक प्रकारची मदत करावी व सर्वांशीं निर्मळ

अंतःकरणानें व प्रीतीनें वागून सुख द्यावें. ईश्वराच्या इच्छेनें प्राप्त झालेल्या स्थितींत समाधान मानून त्याच्या चिंतनांत आयुष्य घालवावें. जगांतील कोणत्याही वस्तूचा मोह धरूं नये व आपल्या वाजवी हक्काचें असेल त्याचें मात्र शिकस्त होईपर्यंत रक्षण करावें. हे आपल्या जीवन क्रमाचे ईश्वरीनियम आपल्यास आपली सदसद्विचारशक्ति नेहमीं समजावून सांगत असते परंतु ह्या जगांतील नाना तऱ्हेच्या वस्तूंनीं आपल्यास इतकी भुरळ घातली आहे कीं, त्या मिळविण्याची वासना आपल्या मनांत प्रबल होऊन तिनें ह्या नियमांचे आपल्याकडून उल्लंघन करविलें आहे सर्व सुखाच्या वस्तु मिळविण्याचें साधन पैसा व मनास तल्लीन करून सोडणारें सुख स्त्री होऊन बसल्यामुळें त्यांच्या प्राप्तीसाठीं ह्या जगांत जिकडे तिकडे गोंधळ उडून गेला आहे. बलवान व बुद्धिवान् लोक निर्बळ व रानटी लोकांच्या नैसर्गिक हक्कांवर बेलाशक धाड घालून त्यांच्या जन्मभूमीचे व मालमत्तेचे मालक म्हणवून बेत आहेत व खऱ्या मालकांस आपल्या सुखसंपत्तीसाठीं गुरांप्रमाणें राबवीत आहेत. 'ज्याच्या हातीं ससा तो पारधी' ह्या न्यायानें हातीं येईल तें बळकाविण्याचा क्रम चालला आहे. बाया बापड्या, अनाथ व अज्ञान लोकांच्या ठेवी घशाखालीं उतरण्याचा सपाटा चालला आहे; गरीबगुरीबांस नाडून डांबपेंचांत आणून सर्वस्वी नागविण्याचा प्रयत्न चालला आहे. आपला मतलब साधण्यासाठीं भाऊ भावाचा, बाप लेंकाचा व मित्र मित्राचा गळा कापीत आहे. खोटे दस्तऐवज, खोटे साक्षीदार वगैरे खोटा पुरावा तयार करून खोट्याचें खरें

करून दाखविणाऱ्या वकिलाच्या मदतीनें न्यायदेवतेचे ढें ज्यावर आपला खरोखर हक्क पोंचत नाहीं अशा वस्तूंबद्दल हक्काच्या फिर्यादी चालू आहेत. आपलें ब्रम्हकर्म सोडून धर्मभोळ्या लोकांस भलत्याच ग्रहपीडा व अरिष्टें सांगून त्यांच्याकडून व्रतें, उपोषणें, अभिषेक पूजा वगैरे धर्मविधि लटपटपंचीनें उरकून घेऊन मिळतील तितके पैसे काढण्याचा धंदा राजरोस चालला आहे. कावेबाज व लबाड लोकांस मदत होऊन गरीबगुरीबास फशांत अडकविण्याचा, दुर्व्यसनाच्या व व्यभिचारी स्त्रियांच्या नादीं लावण्याचा व त्यांची गुलामगिरी करून त्यांचा पैसा उपटण्याचा प्रशस्त उद्योग सुरू आहे, शिवाय पैशासाठीं अनेक तऱ्हेच्या लबाड्या, वचनभंग, विश्वासघात, मारामाऱ्या, खून वगैरे अपराध घडत आहेत आणि अशा रीतीनें मिळविलेल्या पैशावर श्रीमंतीचा डौल मिरवून संभावितांत गणले जाणारे लोक आणखी संभावितपणाच्या बड्या बड्या लबाड्या करून पैसे जमा करीत आहेत. गरीब आढळला कीं, त्याला संभावित लबाडांनीं वाटेल तसें राबवावें. त्याला चोर, लबाड, अप्रामाणिक ठरवावें, त्याच्या मेहनतीची किंमत समजूं नये. त्यास कांहीं अब्रू नाहीं अशा तऱ्हेनें वागवावें. त्याच्याशीं बोलत बसण्यांत कमीपणा मानावा. त्याच्याकडून फायदा होत असेल तर मात्र तेवढ्यापुरतें त्यास चढवून द्यावें, ममता दाखवावी, त्याच्या पोटांत शिरावें आणि मतलब संपला कीं, त्याच्या मेहनतीचा मोबदलाही त्यास न देतां हुसकून द्यावें असा सर्व साधारण प्रघात पडत चालला आहे. अशा मार्गानें मिळविलेल्या पैशाचा उपयोगही तशाच वाईट

गोष्टीकडे व्हावयाचा. खाणेंपिणें, कपडेलत्ते, दागदागिनें, वगैरे गोष्टींचा यथेच्छ उपभोग घेऊन शिवाय दिलखुष करण्यासाठीं नाच, तमाशे, नाटकें, रांडबाजी, दारूबाजी, जुगार वगैरे दुर्व्यसनांत नेहमीं चूर होऊन जावयाचें. ह्या दुर्व्यसनांनीं कित्येक भिकेस लागले आहेत तरी नवे उमेदवार त्यांच्या गळ्यांत मिठी मारावयास तयार आहेतच. दुर्व्यसनांनीं व्यभिचारी तरुण मंडळीस इतकें आंधळे बनविलें आहे कीं, त्यांस पुढें किती भयंकर खड्डा आहे हें दिसेनासें झालें आहे. जनलज्जा व मनलज्जा पार झुगारून देऊन दारू पिणें, रस्त्यानें वेडेंवांकडें फिरणें; आई, बहीण ह्यांसही आमर्यादेचीं विचकट भाषणें बोलणें, त्यांची ओळख न ठेवणें वगैरे जनावरासारखें वर्तन मनुष्याकडून घडत आहे. घरच्या बायकांचे हाल झाले तरी पतकरलें पण दारू व रांड ह्यांस कमी पडतां कामा नये. विषयवासना इतकी प्रबळ झाली आहे कीं, कित्येक पुरुष, मित्राची, भावाची व शेजाऱ्याची बायको, सावत्र आई, बहीण, फार तर काय प्रत्यक्ष लेकीचीही ओळख ठेवीतनासे झाले; त्याचप्रमाणें कित्येक बायका नवऱ्याचा सोवती, दीर, भाऊ, सासरा, जांवई, शेजारीपाजारी ह्यांची ओळख विसरल्या; नवरे बायकांच्या ताब्यांत जाऊन आई, बाप, भाऊ ह्यांची दुर्दशा करूं लागले; बायका, सासवा, नणदांचा छळ करूं लागल्या; शिष्य गुरूची निंदा करूं लागले; चाकर धन्याशीं बेइमानपणा करूं लागले, ज्याचें द्यावें त्याचें देण्याची नियत बिघडत्त चालली; खोट्या शपथा वाहण्याचा विधिनिषेध

वाटेनासा झाला. देवधर्म ह्यांचा वचक राहिला नाहीं. नीतीचा दाब नाहींसा झाला व सदसद्विचारशक्ती विरुद्ध दुर्वर्तन घडूं लागलें. ह्यामुळें ईश्वरानें लावून दिलेल्या स्वाभाविक नियमांचें उल्लंघन होऊन आपली शक्ति क्षीण होत चालली, स्वतांचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य आंगांत राहिलें नाहीं, शरीर रोगी बनलें, वाटेल त्यानें तोंडांत मारून आपली संपत्ति व स्त्री हिरावून न्यावी इतकी निर्बलता आंगांत आली अशा नीच स्थितीला आपण पोंचलों असूनही आपलें वर्तन सुधारत नाहीं ह्मणून आपल्या पातकांनीं वातावरणांतली हवा बिघडून पंचमहाभूतें क्षुब्ध झालीं व त्याचा परिणाम दुष्काळ व प्लेग हा होय. श्रीमद्भागवतादि पुराण ग्रंथांत हेंच भाकित केलें आहे, वैद्यशास्त्रांत महारोगांचीं कारणें असलीं महा पातकेंच मानलीं आहेत व योगशास्त्राचा अभ्यास करणारी युरोपियन मंडळी हेंच खरें असें स्पष्ट ह्मणत आहे. अझूनही आपले डोळे उघडले नाहींत व गणपतीच्या उत्सवामुळें दुष्काळ, प्लेग वगैरे अरिष्टें कोसळतात अशी मनाची समजूत करून घेऊन देवाचे उत्सव व त्यायोगें आनायासें घडणारी त्याची सेवा व आराधना करण्याचें सोडून दिलें तर आपल्या मनावर देवाचा व धर्माचा दाब बिलकुल न राहून थोडी बहुत जी नियत राहिली आहे तीही पार नाहींशी होईल व आपल्यावर दुष्काळ व प्लेग पेक्षांही भयंकर अरिष्टें कोसळतील. करितां श्रीगणपती वगैरे देवांच्या वार्षिकोत्सवांत भक्तिभावानें मन लावा, आपलें वर्तन सुधारा, वितंडवाद्यांचा दुष्ट उपदेश ऐकूं नका ह्मणजे ईश्वर तुमचें कल्याण करील.

नि. ६८
मराठी ग्रंथ संग्रहालय
पुणे सन १८८
नि ६८

A LECTURE ON PILGRIMAGES;

TO BENARES & OTHER SHRINES.

श्रीकाशी वैगरे यात्रांविषयीं व्याख्यान.

राव बहादूर नारायण भिकाजी जोगळेकर

यानीं

पुणें टौनहालांत दिलें.

मुंबईमध्यें
अंग्लो-वर्नाक्युलर छापखान्यांत छापिलें.

सन १८८२.

Price ½ *Anna.* किंमत अर्धा आणा.

प्रस्तावना.

सन १८८१ उन्हाळ्यांतील सुटींत पुण्यास बरीच ए-तद्देशीय विद्वान मंडळी जमली होती, तेव्हां हिराबागेतील टौनहालांत कितीएक व्याख्यानें झालीं, त्यांपैकीं एक व्याख्यान सदरील विषयावर होतें. तें रा० ब० नारायण भिकाजी जोगळेकर यांनीं दिलें. व्याख्यानकाराचा मुख्य उद्देश मनःकल्पित विषय लिहून लाघव करावें किंवा वाक्चातुर्य दाखवावें असा नव्हता, तर अवलोकनांत आलेल्या स्थळांचें व गोष्टींचें यथार्थ वर्णन करून त्यावर मोकळ्या मनानें, निष्पक्षपातानें व धैर्यानें रास्त व हितावह अभिप्राय देऊन आपल्या धर्मबांधवांस सावध करावें असा उद्देश दिसतो. ही कामगिरी त्यांनीं उत्तम प्रकारें बजाविली आहे, असें आम्हांस व दुसऱ्या बहुतांस वाटतें. ह्या विषयावर आजवर असें पुस्तक झालें नाहीं. कित्येक यात्रांविषयीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत, तीं बहुतकरून त्या पुस्तकांच्या कर्त्यांनीं अनुभवावरून लिहिलीं होतीं असें नाहीं आणि यावरून लिहिण्याचा जसा उपयोग व्हावा तसा झाला नाहीं. तींच पुस्तकें जर हिंदु लोकांपैकीं कोणीं लिहून त्यांत आम्ही हिंदुधर्मी आहों, तरी ह्या यात्रा आम्हीं स्वतः केल्यावरून जें कांहीं आमच्या पाहण्यांत आलें व त्यावरून आम्हास जें वाटलें तें आमच्या धर्मबांधवांच्या हिताचें आहे म्हणून आम्ही त्याविषयीं प्रमाणिकपणानें लिहून त्यांच्यापुढें ठेवितों, असे सांगितलें असतें, तर हिंदु लोकांनीं तीं स्वीकारिलीं असतीं.

बरें तर, हें रा० ब० जोगळेकर यांचें व्याख्यान अशाच योग्यतेचें आहे. ते हिंदु धर्मानुयायी असून थोर, संभावित, विद्वान, सत्यवक्ते, व स्वदेशहितेच्छु असतां भलतेंच किंवा खोटें किंवा अहितकारक असें कांहीं लिहून आपल्या लोकांस सादर करतील असें कधीं व्हावयाचें नाहीं. यास्तव या व्याख्यानाचें वजन हिंदु लोकांच्या अंतःकरणावर पडून ते हें पुस्तक लक्षपूर्वक वाचून त्याविषयीं योग्य विचार करतील व याचा पुष्कळ प्रसार होईल अशी आमची आशा आहे. पहिल्यानें ह्या व्याख्यानाच्या थोडक्या प्रती छापल्या होत्या. आतां व्याख्यानकाराची परवानगी घेऊन ही दुसरी आवृत्ति काढली आहे. हिच्यायोगानें सत्याचा प्रसार होवो.

प्रसिद्ध करणारा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. १६६८
तारीख १८

श्रीकाशी वगैरे यात्रांविषयीं व्याख्यान.

आह्मी गेल्या एप्रिल १८८१ महिन्यांत उत्तरहिंदुस्थानांतील श्रीकाशी इत्यादि १० मुख्य क्षेत्रांचीं ठिकाणें पाहण्यास गेलों होतों, त्या समयीं तेथें भक्तिभावाचे अगर भोळेपणाचे जे चमत्कार दृष्टीस पडले त्यांविषयीं कितीएक विद्वान मंडळीच्या सूचनेवरून व्याख्यान देण्याचें पत्करलें. हें कोणास क्षुल्लक वाटेल, परंतु हें फार फायदेकारक असून त्यांत दिलेली माहिती मिळविण्यास मजला ७०० रु० खर्च लागला. ह्मणून हें व्याख्यान मनःपूर्वक व दुराग्रह सोडून ऐकणारांस तितक्या रकमेचा फायदा होणार आहे. सबब लक्षपूर्वक सर्वांनीं ऐकावें अशी विनंती आहे.

आह्मी यात्रेचीं जीं मुख्य १० ठिकाणें पाहिलीं तीं अशीं;—१ नर्मदातीर, २ प्रयाग, ३ काशी, ४ गया, ५ अयोध्या, ६ मथुरा, ७ वृंदावन, ८ गोकुळ, ९ पुष्कारा़ज-तीर्थ, व १० मातृगया. या यात्रांच्या व्याख्यानाचे दोन भाग केले आहेत. १ ल्यांत प्रत्येक ठिकाणीं देवस्थानसंबंधानें अगर धर्मसंबंधानें कोणकोणत्या जागा पाहाव्या लागतात किंवा दृष्टीस पडतात हें, आणि २ ल्यांत प्रत्येक ठिकाणीं तेथले तीर्थोपाध्ये काय काय धर्मसंबंधी कृति करायास सांगतात व त्यांवरून यात्रेकरूंच्या मनावर काय ठसा उत्पन्न होतो हें दर्शविलें आहे. हें व्याख्यान देतेसमयीं एकही शब्द

जास्त वाढवून सांगण्यांत येणार नाहीं. खरोखर आहे तेंच सांगण्यांत येईल असें पक्कें समजावें.

पहिले भागाबद्दल ह्मणजे प्रत्येक ठिकाणीं दृष्टीस पडणारीं देवस्थानें यासंबंधी असें कळवितों कीं,

१. नाशकाहून पहिलें यात्रेचें ठिकाण नर्मदातीर. तें आगगाडीच्या मार्गानें तूर्त जबलपूर एथें आहे. हें लष्कराच्या ठिकाणीं असल्यामुळें हा गांव बराच मोठा आहे. ह्या गांवापासून ६ मैलांवर नर्मदा आहे. त्यांस गौरघांट ह्मणतात. तेथें सुमारें ३०।४० द्रविड ब्राह्मणांचीं घरें असून, ते सर्व येणाऱ्या यात्रेकरूंचें उपाध्यपण करितात. तेथें नर्मदेच्या कांठीं दोन चार घांट पडीक लहान लहान आहेत. वांईच्या गंगापूर घांटाप्रमाणें तेथें एकही घांट नाहीं. नदी शिवाय दुसरें कांहीं पाहण्याचें देवस्थान अगर नामांकित स्थळ नाहीं. संगमरवरी दगडांतून नर्मदा वाहत येत आहे, तें ठिकाण पाहण्यालायक आहे. परंतु तें १० मैलांवर आहे.

२. प्रयाग एथें लष्करची, सडकेची व बंगल्यांची रचना जबलपूरपेक्षां उत्तम असून तेथें यमुना व गंगा यांच्या संगमाच्यामध्यें मोठा भुईकोट किल्ला आहे. त्या किल्ल्याचा एक खंदक जाऊन दुसऱ्या खंदकाच्या दरम्यान काळ्या पलटणीचा पाहरा आहे, आणि दुसऱ्या खंदकाच्या आंत युरोपियन लोकांचा पहारा आहे. तो ओलांडून गेल्यावर किल्ल्यांत अक्षयी वट ह्मणून वडाचें झाड आहे, तें पाहण्यास अगर त्याच्या दर्शनास जावें लागतें, व त्या ठिकाणीं पूर्वी धर्मनिष्ठ ह्मणविणारे विदेही लोक करवतानें आ-

मराठी ग्रंथ संग्रहालय.

पल्या शरीराचें छेदन करीत असत, अगर पाप निवारण होऊन मोक्षास जाण्यास्तव शरीराचा भाग देत असत. त्यानंतर दोन्ही नद्यांचा जेथें संगम होतो तेथें प्रत्येक गयावळांनीं लांकडें रोंवून व त्यांवर फळ्या टाकून स्नानाचीं ठिकाणें निरनिराळीं केलीं आहेत. तेथें यमुनानदीचें पाणीं हिरवें व भागीरथीचें पाणीं पांढरें असा दोन्हींचा संगम पाहण्यास थोडी मजा वाटती, व या ठिकाणीं वाळूंवटहि स्वच्छ असून चिखलाचा लवलेश नाहीं यामुळें स्नान करण्यास मनास आनंद होतो. गंगेचें पाणी प्रयागाशेजारीं चुनखडु व शाडूच्या जमिनींतून येत असल्यामुळें पांढरें आहे, तेंच पाणी ब्रह्मवर्त्तीं पांढरें नसून हिरवें आहे. गंगेचें पाणीं प्रयागाशिवाय दुसऱ्याकडे पांढरें नाहीं. वशिष्ठ, वाल्मिक, सप्तऋर्शींचीं नावें दिलेल्या दोन लहानशा गुहा आहेत, तेथें लहान लहान एक फुट उंचीच्या दगडाच्या मूर्त्ति आहेत, त्यामूर्त्तींस नामाभिधानें दिलेलीं आहेत. ह्या गुहा साधारण तळघराप्रमाणें आहेत. त्यांच्या आजूबाजूस हल्लीं साहेब लोकांचे बंगले आहेत. किल्लाबानजीक एक गांव आहे, ज्यास धारागंज ह्मणतात, तेथें दशाश्वमेध ह्मणून ठिकाण आहे. या ठिकाणीं मोठमोठे यज्ञ झाल्याचें लोक सांगतात. परंतु हल्लीं या ठिकाणीं पिंपळाचें झाड मात्र जुनाट मोठें आहे. नंतर गणेश व शेषाचीं देवळें पाहण्याची वहिवाट आहे. शेषाचें देऊळ गणपतीच्यापेक्षां बरें आहे, परंतु तें चांभारगल्लीच्या नजीक असल्यामुळें हागनदारींतून जावें लागतें. या ठिकाणीं एक दगडाचा नाग बसविला आहे. सदरहूनंतर पुढें एक ग्रामदेवतेचें जुन्या चालीचें दगडाचें देऊळ आहे,

तें पहावें लागतें; परंतु देवी देवळांत नसून चवथरा मोकळा आहे. याचें कारण विचारतां असें सांगतात कीं, अवरंगजेब बादशहा हा जेव्हां देऊळ फोडण्यास आला तेव्हां ती ग्रामदेवता निघून गेली अगर पळाली, ती अद्याप आपल्या सिंहासनावर परत आली नाहीं. यामुळें सिंहासनाचें दर्शन घेऊन लोक जातात. एवढींच ठिकाणें प्रयागास पाहण्याचीं आहेत.

३. प्रयागाहून श्रीकाशीस जावयाचें तेथें प्रथम काशीविश्वेश्वर पहाण्यास यात्रेकरू आतूर होतो. परंतु तेथें जाऊन पाहतो तों श्रीकाशीविश्वेश्वर ठिकाणावर नाहींत, पळून गेले झणून पांडेलोकांचें तोंडून ऐकतांच यात्रेकरूचें मन खट्ट होतें. श्रीकाशीविश्वेश्वराचें पूर्वीचें देऊळ होतें, तें देऊळ अवरंगजेब बादशहानें घेऊन त्याची मशीद बनविली, ती हल्लीं कायम आहे. जेव्हां अवरंगजेब बादशहा देवळांतील मूर्त्ति फोडण्यास आला, तेव्हां शंकरानें देवळाजवळ एक विहिर आहे, तींत उडी घातली असें झणतात. या विहिरीवर पुण्यांतील जोशी यांचे विष्णूच्या देवळाच्या मंडपासारखा लांकडी मंडप असून त्या विहिरींत शिवाची वस्ती आहे, असें समजून यात्रेकरू लोक तींत बेल फेंकतात. तो बेल कुजून पाणी अतिशय घाण मारतें. तें पाणी काढून 'तीर्थ घ्या' झणून एकजण विहिरीचे कांठावर बसलेला असतो. यात्रेकरू लोक विहिरीसभोंवार प्रदक्षणा घालून तें तीर्थ घेतात. कित्येक वाईट लागल्यामुळें थुंकतात. त्या लोकांस तीर्थ देणारे सांगतात कीं, थुंकूं नका, कारण त्या तीर्थापासून तीन मोक्षसाधनें व्हावयाचीं आहेत. या विहिरीस लागून एक लहानसें जुनें चालीचें देऊळ आहे. हें देऊळ अवरंगजेबानें

मूळचें देऊळ फोडल्यापासून बांधलेलें आहे. या देवळाचे शिखर सोन्यानें मढविलेलें असून, या देवळांत असलेले शिवाचे लिंगावर सर्व लोक रुद्राभिषेक वगैऱ्यांच्या पूजा करितात. जी विहीर वर सांगितली, त्या विहिरींतून शंकर पुन्हा अवरंगजेबाच्या विटाळास भिऊन भागिरथींत गेले. त्या समयीं कानांनील मणी पडल्यामुळें त्या ठिकाणीं मनकर्णिका नांव मिळालें. गंगापुत्र ह्मणविणारे लोक यांनीं पुण्यांतील विश्रामबागेजवळील पुष्करणी हौदाप्रमाणें भागिरथीच्या कांठीं घाटावर हौद केला आहे. त्या ठिकाणीं यात्रेकरूस नेऊन हें 'चक्रतीर्थ आहे, यांत स्नान करावें,' असें ते ह्मणतात. या हौदास अगर तीर्थास अंगचें पाणी नाहीं. गंगेतील पाणी नेऊन घालावें लागतें, व हें कुंड साफ न केल्यामुळें यांतील पाणी मोरींतील पाण्याप्रमाणें काळें होऊन वास मारतें. या तिर्थांत प्रथम स्नान केल्यानंतर न्हावी लोक गंगापुत्राचे हुकुमांत आहेत, त्यांस क्षौर करण्याचा हुकूम होतो. तो हुकूम गंगापुत्र सरासरी १ पासून २५ रूपये घेऊन देतात. या तिर्थांत जो निमुटपणें स्नान करितो तो खरा भक्तिमान समजला जातो. जसें एखादें बी. ए. अगर एम. ए डिग्री मिळविलेला विद्वान् समजण्याचें साधन तसें भक्तिमान ओळखण्याचें हें कुंड साधन आहे. तें असें कीं, ह्या कुंडाचे पाण्यांत जो अंघोळ करितो तो गंगापुत्र अगर घाटवाले सांगतील तो मजकूर मनःपूर्वक ऐकतो व जिवाचा धडा करून देववेल तितकें देतो. जो मनुष्य सदर हौदांतील पाण्यांत अंघोळ करीत नाहीं, नुसतें मार्जन करीन ह्मणजे दोन थेंब डोकीवर

उडवीन ह्मणतो, त्याजकडे गंगापुत्र टवकारून पाहून गाली-प्रदानास आरंभ करितात. याप्रमाणें त्यांणीं खुद्द आह्मास केलें. आह्मी सांगितलें कीं, पाणी साफ करा, आह्मी अंघोळ करितों. नंतर त्यांणीं आह्मास जबरीनें स्नान घालावें असा विचार केला, परंतु तसें करणें बाईट पल्यास जाईल, असें आह्मीं त्यांस कळविल्यावरून त्यांनीं तो विचार रहित केला. आह्मी त्यांस गंगा सोडून बनविलेलें नवीन चक्रतीर्थाचें स्नान नलगे व क्षौरही नलगे ह्मणून सांगितलें.

क्षौर झाल्यानंतर गंगास्नान करण्यास सांगतात. गंगानदी पाव मैल रुंद आहे, व रम्य आहे तिचे कांठीं घाट व देवळें भक्तिमान लोकांनीं बांधलीं आहेत, तीं शोभा देतात. परंतु जसा दिव्याखालीं अंधार तसा एवढी गंगा मोठी असून, तिचे भक्तिसंबंधी लोकांचे वर्त्तनांत मोठा अंधेर आहे. तो असा कीं, काशीची वस्ती सुमारें दोन तीन लाख असावी पैकीं नवी लष्करा-ची वस्ती इतर लष्कराप्रमाणें चांगली असून, जुना गांव अतिशय दाट व घाणेरडा आहे. जुने गांवांतील रस्ते ६ फुटांपासून १० फुटांपर्यंत रुंद आहेत, आणि सर्व शौच्यकुपें पेवांचीं असून, त्यांचे निकालास भंगी नाहींत. सर्व मैल नदींत सोडून दिला आहे. यामुळें सर्व जुनें गांवभर शेतखान्याची घाण सारा दिवस येत असून, सुमारें लाख मनुष्यांचा मैल नदींत वाहत जातो. ह्याशिवाय जितके सन्याशी मरतात तितके नदीत वस्तीसमोर बुडवितात व जितकीं जनावरें व कुत्रीं मरतात तितकीं नदींत टाकितात. प्रेतें जाळण्याच्या जागा चार खण रुंदीच्या फक्त दोन असल्यामुळें ज्यास मढीं आल्यास ज्या मढ्याचे वारस दहनाचे अखेर-

पर्यंत बसत नाहींत, असें मढें निमेशिमें होरपळलेलें नदींत फेंकलें जातें. आणि दुसरें मढें चितेवर चढाविलें जातें. या स्मशानभूमीस सर्व यात्रेकरू नमस्कार करितात. याचें कारण डोंब लोकांनीं निमेशिमें प्रेत नदींत टाकूं नये या संबंधानें कीं काय म्हणून विचारतां डोंबलोक आपला वतनदारीचा हक्क सांगून शक्तिनुसार फी घेतात. ते डोंब लोक विश्वेश्वराचा साक्षात्कार असा सांगतात कीं, शिवास चिताभस्म दररोज लागतें. याकरितां जर कदाचित् एखादे दिवशीं प्रेत न आल्यास आह्मांपैकीं एक मनुष्य जाळून चिताभस्म पुरवावें लागतें. परंतु ईश्वराची कृपा अशी आहे कीं, दररोज प्रेत आल्याशिवाय राहत नाहीं. आतां गांव मोठा म्हणून प्रेत येतें किंवा डोंबावर कृपा होऊन येतें याचा विचार श्रोत्यांनीं करावयाचा. कारण मुंबईस दररोज सरासरी ४० प्रेतें येतात. याप्रमाणें भागिरथी नदी प्रेतांनीं व मैलांनीं भरीत होत्साता तिचे पाण्यास किंडे पडत नाहींत, ही भक्तिमान लोक साक्षा समजतात. या गंगेत अंघोळ करितेवेळीं बहुशा जनावराचें अगर मनुष्याचें एक दोन रोजांआड प्रेत दृष्टीस पडतें. आह्मांस आमचे आठ दिवसांचे मुक्कामांत दोन मनुष्यांचीं प्रेतें व तीन कुतऱ्यांचीं प्रेतें दृष्टीस पडलीं. गंगेत शिरल्यानंतर जशी प्रयागांत संगमावर वाळू आहे तशी गंगेत काशीचे घांटावर नसून, अंघोळ करणारास पूर्ण स्वच्छतेसंबंधीं आनंद होत नाहीं. याप्रमाणें स्नानानंतर लोक पिशाचमोचनी पाहण्यास जातात. पिशाचमोचनीचें पुण्यांतील पर्वती एव्हढें तळें असून, बाजूस एक वेताळाचें लहानसें देऊळ आहे. या तळ्यांत अं-

घोळ केली असतां पिशाचयोनीस जे वडील गेले असतील ते मुक्तीस जातात, ह्मणून सांगतात. जे लोक पिशाच खरें मानतात ते या तळ्यांत अंघोळ करितात. तळ्याच्या कांठावर पांडे ह्मणजे उपाध्ये बसले असतात, त्यांजला दक्षणा देतात. आह्मी या तळ्यांत आमच्या घरांतील कोणी पिशाच झाला नाहीं व आह्मी पिशाच खरें मानीत नाहीं, सबब सर्वमान्य गंगानदी सोडून या तळ्यांत अंघोळ करीत नाहीं ह्मटल्याबद्दल पांडेलोकांनीं आह्मास वहिवाटीप्रमाणें शब्दांनीं ताडण केलें. नंतर काळभैरवाचे देवालयांत जावें लागतें. हें देऊळ लहान असून, त्यांत चार फूट उंचीची काळे दगडाची मूर्त्ति आहे. या मूर्त्तीचा पुजारी प्रत्येक यात्रेकरू मनुष्यास पैशास एक काळा दोरा देतो, आणि तो दोरा मनगटास अगर दंडास बांधण्यास सांगून, सांगतो कीं, तसें केल्यानें सर्व भयें दूर होतात. असेही दोरे बांधून कांहीं लोक लागलेच मरतात. त्याचा दोष दोऱ्याकडे किंवा त्यांचे नशिबाकडे हें समजत नाहीं, परंतु भाविक लोक एक एक डझन दोरे आणून यात्रेहून घरीं आल्यानंतर आपले नातेवाइकांस देतात. काळभैरवाच्या देवळाचे प्रदक्षणेचे वाटेवर आह्मी गेलों तेव्हां तीन गोसावी वेष धारण करणारे बसले होते. त्यांच्या हातांत मोराच्या पिसांचें एक एक झुडगें अगर दंडूकें होतें. ते लोक, भक्तिवान लोकांच्या पाठीवर एक दोन टोले मारून पैसा घेतात. आणि सांगतात कीं, हा काळभैरवाचा टोला आह्मी दिला आतां तुजला दुसऱ्याचा टोला बसण्याचें भय नाहीं. शोधक लोक आह्मास मोराचे पिसांचा दंडुक नको, असें सांगतात. तें त्यांणीं न ऐकिलें तर त्याचे दंडुक्याबरोबर आप-

लाही दंडुका उभा करितात. नंतर ते गोसावी ज्यास्त आग्रह करीत नाहींत. नंतर अन्नपूर्णा देवीचें देऊळ पाहवें. त्यांत गाई बांधल्या आहेत त्यांचे तोंडांत यात्रेकरू लोक तांदूळ टाकतात, व त्या इतक्या संवयीच्या झाल्या आहेत कीं, तांदूळासाठीं त्या, यात्रेकरू पुढें गेला ह्मणजे जीभ बाहेर काढतात. काशी पहाणें झाल्यानंतर काशीप्रदक्षणा व पंचक्रोसी करावी लागते. ही पंचक्रोसी व प्रदक्षणा २५ कोसांची आहे असें सर्व भक्तिवान यात्रेकरू लोकांपैकीं बहुतेक सांगत आले. परंतु वास्तविक पाहिलें असतां काशी औरस चौरस ३ मैल असून, ही नगरप्रदक्षणा जी आहे ती काशीच्या आजुबाजूची ३ पासून ८ कोसांवरील गांवें सामील करून आहे. ही प्रदक्षणा जिला पंचक्रोसी ह्मणतात, ती करण्यास मुकामाच्या जागा केल्या आहेत. प्रथम अशी, कानव (कर्दमेश्वर,) भिमचंडी, रामतीर्थ, कपिलधारा या पांच ठिकाणीं पहाण्यालायक कांहीं नसून, गांवेंही लहान भिकार आहेत. उतारू लोकांस राहण्यास धर्मशाळा मात्र मोठ्या बांधून ठेविल्या असून प्रत्येक ठिकाणीं एक लहानसा तलाव व देऊळ करून ठेविले अ्याहे. तें या उद्देशानें कीं, प्रत्येक यात्रेकरूनें प्रत्येक ठिकाणीं मुक्काम करून व श्राद्ध करून नंतर पुढें जावें. या धर्मशाळांपैकीं तीन ठिकाणचे धर्मशाळांच्या झाडसारवणास चांभारणी आहेत. या ठिकाणीं नवीन जोडणी असल्यामुळें फारच थोडे यात्रेकरू पांच मुक्काम करून श्राद्ध करितात. बहुशा चक्कर मारून जागा पाहून येतात. याप्रमाणें सर्व ठिकाणें पाहून काशीस परत आल्यानंतर आह्मी यात्रा केली कीं नाहीं, याविषयीं सर्व जाणता परमेश्वर असतां, काशीविश्वेश्वराची

यात्री करण्यासाठीं म्हणा, किंवा कोणत्या कारणासाठीं समजत नाहीं; परंतु यात्रा केली असें सांगण्यास साक्षी विनायक म्हणजे साक्ष देणारा गणपती म्हणून एक मूर्त्ति आहे, त्यासमोर दक्षणा ठेवून वदावें लागतें कीं, आम्हीं यात्रा केली. तदनंतर जितके दिवस आपण काशींत राहिलों तितक्या दिवसांच्या प्रत्येक दिवशीं एक कवडीप्रमाणें सर्व कवड्या प्रत्येक माणसांच्या जमा करून कवडाई म्हणून देवी आहे तिजला देऊन गयेस जावयाचें.

४. गयेस प्रथम विष्णुपद याचें दर्शन घ्यावयाचें. तीन फुट चौरस दगडावर मोठ्या मनुष्या एवढें एक पाऊल दगडावर कोरलेलें आहे. त्याची पूजा सर्व लोक करितात. भक्तिवान लोक असें समजतात कीं, श्रीविष्णु हे चालत असतां, दगडावर त्यांचें पाऊल उमटलें. आह्मा लोकांचीं चिखलावर चालतांना जशीं पावलें उमटतात, तसें विष्णूंचें पाऊल दगडावर उमटलें आहे, असें समजलें जातें. परंतु शोधक लोकांनीं जर प्रश्न केला कीं, विष्णूचें दुसरें पाऊल दगडावर कां उमटलें नाहीं, तर ते असें सांगतात कीं, दुसरें पाऊल मध्यें टेकलेंच नाहीं, मक्केस टेकलें. मक्के दुसरें पाऊल पोंचण्याजोगें प्रचंड पायास हें पाऊल लहान्नें दिसतें, म्हणून पुन्हां आडविलें असतां, कांहीं लोक उपेक्षा घेतल्याबद्दल शब्दानें ताडण करितात. व कांहीं समजुतदार लोक असें सांगतात कीं, पुर्वी गयेस एक राक्षस मातला होता. त्याला श्रीविष्णूनें पांच कोस रुंदीचें पाऊल करून तें त्याच्या डोक्यावर ठेवून मारला. त्यावेळेस असा वर दिला आहे कीं, या पावलावर जो वडिलांच्या नांवें पिंड घालील

त्याचे पितर मुक्तीस जातील. याप्रमाणें पावलाचें माहात्म्य आहे. हें पाऊल कोरून एका चौथऱ्यांत बसविलेलें असून, त्यावरील देऊळ मात्र बरें आहे. यानंतर लोक अक्षय वटीं पिंड देण्यास जातात. या ठिकाणीं एक वडाचें झाड असून, सभोंवतीं लहान देवालयें फरशीनें युक्त अशीं आहेत. हा वड पिंड दिले असतां अक्षय सुख देतो असें भक्तिवान मानतात. याशिवाय भक्ति दाखविली असतां, गयेस गयावाळ ठिकाणें दाखवितात, तीं येणेंप्रमाणें:— एक खडक आहे. त्या खडकास एक ३—४ हात लांब व एक फुट रुंद इतकी भेग आहे. ही भेग भीमसेन धर्मराजाचे बंधु गुढघ्यावर उभे राहून तरपण करीत असतां, गुडघा खडकांत शिरून पडली असें म्हणतात. हा खडक पूल करण्या जोगा सकत आहे, व खडक लांकडा इतका सछिद्र नाहीं. सबब गुढघा शिरणें नाहीं, अशी उत्प्रेक्षा घेतली असतां, पांडे लोक डोळे वटारतात. त्याचप्रमाणें दुसरा एक खडक आहे, त्यावर चार चार बोटें खळगे आहेत. हे खळगे ब्रह्मदेवानें कोट गाई दान दिल्या त्या उभ्या केल्यानें पडले म्हणून दाखवितात. त्याचा उद्देश हा कीं, यात्रेकरू लोकांनीं कोट गाई देणें राहूं नये, परंतु एखाद दुसरी तरी गाय द्यावी. सदर्हूनंतर एक लहान देवालय आहे, तें दाखविलें जातें. यांत एक दगडाचा हात आहे व त्यावर एक दगडाचा गोळा आहे. याची हकीकत अशी सांगतात कीं, जेव्हां श्रीरामानें पिंडदान केलें तेव्हां दशरथानें स्वर्गाहून पिंड घेण्यासाठीं हात पुढें केला. दशरथ चर्मबंधक शरीर त्यागून निराकार आत्मरूपानें स्वर्गास गेले असतां, दगडाचें शरीर त्यांस कसें

सून त्यावर दगडाचीं पाऊलें कृष्णाचीं म्हणून स्थापन केलीं आहेत. पांडेलोक यात्रेकरूंस सांगतात कीं, गोपींचीं वस्त्रें हरण करून कृष्ण कळंबाचे झाडावर चढले, तें हें झाड. बायका व भोळे यात्रेकरू या झाडाच्या पांया पडतात.

८. वृंदावनाहून पुन्हा मथुरेस परत येऊन दुसऱ्या दिशेस ४ मैलांवर गोकूळ आहे. या ठिकाणीं पहाण्यालायक कांहीं नाहीं. एका लहानशा घरांत वसुदेव, देवकी यांचे पितळेचे मुखवटे बसविले असून त्या मुखवट्यांच्या ओटयाखालीं एका लहान पाळण्यांत कृष्ण व बलराम यांच्या दोन मूर्त्ति स्थापन केल्या आहेत. या ठिकाणीं कृष्ण जन्मले त्यासंबंधाचें षष्ठीपूजन शेजारच्या खोलींत झालें म्हणून शेजारच्या खोलींत भितीवर रेघा काढल्या आहेत. जो मनुष्य ज्यास्त दक्षणा देतो म्हणजे खुर्द्याहून ज्यास्त, त्याचे हातांत पाळण्याची दोरी देऊन पाळणा हालविण्यास सांगतात. पैसे ठेवणारास लांबून दर्शन मिळतें, पाळण्याची, दोरी हातांत मिळत नाहीं. पाळणा हालविणारास असें सांगितलें जातें कीं, देवाचा पाळणा हलविला तर तुमच्या घरीं असाच मुलाचा पाळणा हमेशा हालेल. याजमुळें भोळे लोक रूपया देऊन पाळणा हालवितात. या ठिकाणीं कृष्णानीं माती खाल्यामुळें घुसळखांबास बांधलें म्हणून सांगण्यास दुसऱ्या एका लहानशा घरांत घुसळखांब उभा केला आहे. त्याचें दर्शन घेऊन दक्षणा ठेवावी लागती. या शिवाय कृष्णानीं अमुक ठिकाणीं अमुक कृत्य केलें, अमक्यास मारिलें, अशांविषयीं मजकूर सांगतात, तो ऐकून घ्यावयाचा.

९. गोकुळाहून पुष्कराज तीर्थ अजमीरपासून ७ मै-

लांबर आहे. या तीर्थाची अशी हकीकत आहे कीं, ब्रह्मदेवानें शिवास व विष्णूस अशी विनंती केली कीं, सर्व तीर्थें तुमच्या नांवाचीं आहेत, मजला माझें नांवें एक तीर्थ करण्याविषयीं परवानगी द्यावी. ती मिळाल्यावरून ब्रह्मदेवानें अकाशांतून एक कमळाचें फूल टाकिलें तेणेंकरून समुद्रतुल्य तीर्थ उत्पन्न झालें तें हें. हें तीर्थ डोंगराच्या माथ्यावर नाहीं. रजपुताना देशांत आबुपर्वताशिवाय हा अजमीरशेजारीं पांच कोसांचा पर्वत असून, त्याचे दऱ्याच्या अखेरीस व तळास हें तीर्थ आहे. हें पर्वतीच्या तळ्याएव्हढें असून, त्यांत पाण्याची जागा सोडून बाकींच्या जागीं लागवण आहे, व पाणी घाण आहे. या ठिकाणीं ब्रह्मदेवानीं यज्ञ केला त्या वेळेस यज्ञसमारंभास त्यांनीं आपली स्त्री आणिली नाहीं. गवळ्याची एक मुलगी गाईच्या मुखांतून सात वेळा काढून बामांगीं बायको ऐवजीं बसवून यज्ञ केला. या यज्ञास विष्णु व शिव आले होते. परंतु ब्रह्मदेवानीं आपली खरी बायको सावित्री न आणतां गवळ्याची मुलगी बसविली यामुळें सावित्रीनें व इतर देवानीं असा शाप दिला कीं, ब्रह्मदेवा, तुमची पूजा या ठिकाणाशिवाय होणार नाहीं. हें गांव अगर तीर्थ उत्सुकतेनें जरूर जाऊन अवश्य पाहण्यालायक नाहीं, व या तिर्थास जाण्यास पांच मैल डोंगर असून, लुटण्याचें फार भय आहे.

१० सदर तिर्थानंतर सिद्धपुरास मातृगया करण्यास आह्मीं गेलों. हा गांव बडोदे संस्थानापैकीं असून स्वच्छ नाहीं. सभोंवार निबडुंग आहेत. या ठिकाणीं सावित्रीनदी, जिला पुण्यांतील नागझिरी इतकें पाणी आहे, तींत

प्राप्त झालें ह्मणून विचारिलें असतां, देवळांतून बाहेर लौकर जाण्याविषयीं पुजारीबोवाची आज्ञा होते. गयेशेजारीं दोन डोंगर आहेत, एकांचे नांव प्रेतपर्वत, दुसऱ्याचें नांव रामपर्वत, असे हे दोन्ही डोंगर सुवर्णाचे व रूप्याचे श्रीरामचंद्रानें दिले व फल्गुनदी दुधाची दिली, असें असूनही गयावाळ लोक तृप्त झाले नाहींत, ह्मणून श्रीरामचंद्रानें शाप दिला कीं, दोन्ही पर्वत दगडाचे होतील व फल्गुनदी पालथी घातली, यामुळें वर वाळू आणि खालीं पाणी झालें, असें सांगतात. ही नदी वर्षातकाळीं रीतिप्रमाणें वहाती, परंतु उगमजवळ असल्यामुळें लवकर आटती. यामुळें वाळवंटींत खळगे उकरल्याशिवाय पाणी मिळत नाहीं. या मासल्याच्या नद्या व ओढे, फलटण व कलादगी जिल्ह्यांत पुष्कळ आहेत. जे दोन पर्वत गयेशेजारीं आहेत त्यांवर दोन मोठमोठीं बिळें आहेत, या बिळांस विष्णुयोनी व रुद्रयोनी याप्रमाणें नावें दिलीं असून यांतून पाताळांत उतरण्यास वाट आहे ह्मणून सांगतात. गया गांवीं विशेषेंकरून विष्णुपद व वडाचें झाड ज्या ठिकाणीं आहे, त्याच्या बाजूस फार घाण आहे. गयेस जाण्यापुर्वी एक नदी लागती, तीस पुनःपुनः ह्मणतात. ही नदी लहान आहे, परंतु तिजला खडकवासल्याच्या पाटाएवढें पाणी आहे. या नदींत जो स्नान करून श्राद्ध करितो तो पुनःपुनः जन्मापासून मुक्त होतो असें यात्रेकरू लोक सांगितलेलें ऐकून तदनुसार वर्त्तन करितात. गयेहून आह्मी अयोध्येस गेलों.

५. अयोध्या सामान्य गांव असून, तेथें शरयु नदी उत्तम आहे. तिच्या कांठीं जे घाट आहेत, ते तिजला चांगली

शोभा देतात. ही नदी काशींतील भागिरथीच्या बरोबरीची आहे. या गांवांत रामाचीं देवळें पुष्कळ आहेत. त्यांत नामांकित पाहण्याजोगें कोणतेंच नाहीं; परंतु दोन दाखविलीं जातात. एक चाकण येथील कुळकर्णी यानें काळेरामाचें देऊळ लहानसें बांधलें आहे; दुसरें, ज्यांत रामाची बारीक सोन्याची मूर्त्त आहे त्या सोन्याच्या मूर्तीचें दर्शन एकादशीस मात्र फुकट होतें. बाकीच्या दिवशीं सव्वा रूपया दिल्यास दर्शन होतें. लांबचे यात्रेकरू सव्वा रूपया फी ऐकून कांहीं तरी पहाण्याजोगें विशेष आहे, असें समजून फी भरतात; परंतु अखेरीस त्यांचे इच्छेनुरूप समाधान होत नाहीं. आम्ही फी भरून दर्शन घेतलें, आणि पहातों तों आंत अगदीं लहान मूर्त्त आहे, व ती कशाची हें पुजारी जवळ जाऊन पाहूं देईनात.

६. अयोध्येहून लखनौ एथील केशरबाग पाहून आम्ही मथुरेस गेलों. मथुरा हा गांव काशीपेक्षां पैस व स्वच्छ आहे. या ठिकाणीं पुष्कळ देवळें यमुनेच्या कांठीं आहेत. त्यांत मुख्य द्वारकानाथाचें देऊळ चांगलें आहे.

७. मथुरेहून ६ मैलांवर वृंदावन आहे. या ठिकाणीं कृष्णाचें देऊळ संगमरवरी दगडाचें उत्तम आहे. हें देऊळ आग्रा एथील ताजमहालची मशीद जी संगमरवरी दगडाची आहे, त्याचे दुय्यम नंबरास लागेल. या ठिकाणीं देऊळ चांगलें असल्यामुळें व रात्रौ तेथें गायन होतें व तंतुवाद्यें बाजविलीं जातात, यामुळें प्रवासी लोकांस थोडें समाधान होतें. या ठिकाणीं यमुनानदीस घाट आहे, त्या घाटावर एक कळंबाचें झाड आहे. त्या झाडासभोंवतीं चौथरा बांधला अ-

स्नान करून जेथें कपिल महामुनीच्या आश्रमाची जागा, तीन कुंडें व कनिष्ठ प्रतीचीं पडिक देवळें पांच सहा आहेत तेथें भाविक लोक श्राद्ध करितात, तेणेंकरून माता स्वर्गास जातात अशी समजूत आहे. या ठिकाणीं पाहण्यालायक कांहीं नाहीं.

येणेप्रमाणें पहिल्या मुद्याबद्दल विवेचन झालें. त्यावरून प्रत्येक ठिकाणीं कोणत्या प्रकारचीं स्थळें व ठिकाणें आहेत हें ध्यानांत येईल.

आतां दुसऱ्या मुद्याबद्दल म्हणजे प्रत्येक ठिकाणीं काय करावें लागतें याविषयीं असें कळवितों कीं, प्रथम ज्याच्या हातानें पाप अगर हत्या घडल्या त्यांच्याशिवाय पूर्वीच्या काळीं कोणी काशीस जात नव्हतें. रामदास स्वामी, तुकाराम महाराज वगैरे अनेक साधू कधींही काशीस गेले नाहींत. हत्या करणारे जात होते. नंतर पुढें प्रथम प्रयागास त्रिवेणीदान, काशीस स्नान, गयेस पिंड करूं लागले, व असेंच करण्याची पूर्वी वहिवाट होती; परंतु आज मित्तीस वर सांगितलेल्या सर्व क्षेत्रांच्या ठिकाणीं एक नमुना झाला आहे. तो असा कीं, तिर्थास गेल्याबरोबर सर्व ठिकाणचे उपाध्ये, ज्यांस तिकडे पांडे म्हणतात, ते असें सांगतात कीं, प्रथम गंगाभेट, म्हणजे गंगेपुढें दक्षणा ठेवून पांया पडणें, नंतर क्षौर, नंतर गंगास्नान, नंतर गंगापूजन, नंतर श्राद्ध व पिंड, नंतर वसंतपूजा, ब्राह्मणभोजन व पांड्यांची संभावना, असें सांगतात. गंगाभेटीसंबंधीं वर्णन करण्याची जरूर नाहीं. क्षौरसंबंधीं सर्वांस माहिती आहेच; परंतु क्षौराच्या मुख्य ठिकाणाचें वर्णन करितों.— प्रयाग येथें तीन नद्यांचा

संगम झाला असून, तीन नद्या अशा मिळाल्या आहेत कीं, त्यांचे वेणीप्रमाणें पेड दिसतात, अशी सांगीव वार्त्ता ऐकून बायका भक्तीनें वेणीदान करितात. परंतु सदरहूप्रमाणें नदीचा मेळ मुळींच नाहीं. दोन नद्या, गंगा व यमुना यांचा संगम मात्र दिसून आला. तिसरी नदी कोठें आहे म्हणून विचारितां, ती सरस्वती असून गुप्त आहे, असें सांगण्यांत येतें. सरस्वती नदी गुप्त रीतीनें चालली आहे, असें दाखविण्यास यमुनानदी व प्रयागाच्या किल्ल्याची भिंत यांच्या दरम्यान एक विहीर केली आहे, त्या विहिरींत सरस्वती नदी आहे, म्हणून सांगतात. याप्रमाणें कल्पित त्रिवेणीसंगमाच्या ठिकाणीं पुरुषांच्या व विधवा बायकांच्या क्षौरांचा व सवाष्णी बायकांच्या वेणीदानांचा इतका धडाका चालतो कीं यात्रेच्या दिवसांत केसांचे ढीग पडतात, त्यांचा मक्ता दिला जातो. विधवा बायकांची हजामत निर्लज्जपणें हजारों लोकांदेखत केली जाते, तेणेंकरून अतिशय वाईट वाटतें. जातीची विटंबना करून घेणें हा काय भक्तिमार्ग ! पुरुषांपैकीं दक्षणेचे लोक फक्त दाढी व मिशा काढतात. परंतु द्रविड वगैरे जे अविद्वान अगर भक्तिवान लोक आहेत ते क्षौर म्हणजे एक मोक्षाचें साधन समजून डोक्यापासून तों पायांपावेतो सर्व केश काढितात. असें साळंकृत क्षौर करणारास लंगोटी नेसावयास देऊन मांडवाचे लांकडास टेंकून उभें करून त्यांचे केस नापिक लोक जशी हौस भादरतात त्याप्रमाणें भादरतात. याप्रमाणें विधवा स्त्रियांचें वपन झाल्यावर, सवाष्णी बायकांच्या वेणीदानाचा समारंभ होतो. त्याचा

प्रकार असा कीं, मद्रास इलाख्यांतील द्रविड लोकांच्या बायकांचे सर्व केंस काढले जातात, आणि बायकांची तर डोकीवर पदर घेण्याची चाल नाहीं. त्यामुळें केंस काढलेले असून नाकांत नथ व कपाळास कुंकू दिसून येतें. यामुळें आह्मी जेव्हां हा फार्स पाहिला तेव्हां ज्या पुनर्विवाहाबद्दल पुण्याचे विद्वान झटत आहेत, तो येथें आपोआप कसा अमलांत आला, असें आह्मांस भासलें. मागाहून खरें वर्म समजून आलें. दक्षिणच्या बायकांच्या वेणीचा तीन बोटें शेंडा नवऱ्यास कातरावा लागतो. या समारंभाच्या वेळेस वाजंत्री वगैरे वाद्यांचा लग्नाप्रमाणें उपयोग केला जाऊन नवराबायकोच्या कपाळास फुलांच्या मंडावली बांधतात, व बायकोस मळवट भरावें लागतें. प्रयागवळांनीं श्लोक रचले आहेत ते, ते बायकांकडून ह्मणवितात. यांत असा मजकूर आहे कीं, आजपावेतों जे अन्याय केले असतील ते माफ करून वेणीदानास परवानगी द्यावी. हिंदु लोकांत नवऱ्यानें बायकोस गांजीत असावें, व शेवटीं बायकानींच माफी मागावयाची, असा बायकांवर जुलूम आहे. असो, इतकें ह्मणून बायकोनें उठून नवऱ्याच्या पायां पडावें लागतें. त्यानंतर नवऱ्यानें परवानगी आहे, असें सांगून स्वहस्तें सर्व समाजांत तिची वेणी घालावी लागतें, आणि त्या वेणीचा शेंडा तीन बोटें कातरीनें नातीनें कातरून बायकोचे ओंजळींत ठेवायाचा, आणि तो शेंडा रूपायांनीं बुडवून प्रयागवळाच्या हातांत टाकावयाचा. तो घेतसमयीं ते पुष्कळ आडवितात. काशीस बहुधां विधवा जातात, यामुळें वेणीदानाचीं उदाहरणें थोडीं दृष्टीस पडतात. सर्व पाहण्यास ज्यास्त लोक

संग्रह
मराठी
ठाणे.

जमतात, व बायकांस हें विलक्षण पुण्याचें कृत्य झालें असें वाटतें. पुरुषांचें क्षौर करावयाची चाल पडण्यास आधार कोणता हें कळवावें ह्मणजे आह्मी क्षौर करूं, असें आह्मी विचारतां, ज्यांस कांहीं माहिती नाहीं ते रीतीप्रमाणें शिव्यांच्या बाणीवर आले. परंतु दोन तीन वृद्ध पुरुषांनीं असें कळविलें कीं, पूर्वी प्रयाग एथील वटवृक्षावर यात्रेकरू आपला देह अगर देहापैकीं कांहीं भाग अर्पण करीत असत, कोणी जिवंतपणी आपलें डोकें कर्वतानें दुभंग करीत असत, व कोणी हात पाय तोडून देत असत, तो प्रकार बंद झाल्या दिवसापासून मिशा देण्याची वहिवाट पडली. या इतिहासावरून असें दिसून आलें कीं, मिशा देणें आवश्य आहे असें नाहीं. सबब आह्मीं व ज्यानीं हा शास्त्रार्थ ऐकिला त्यांनीं क्षौर केलें नाहीं, पण नुसती हजामत केली. परंतु आमचे प्रयागवळ आह्मास असें ह्मणूं लागले कीं, आपणच ही चाल मोडुं नका. त्यावरून त्याची आह्मी शकल काढिली ती अशी कीं, पूर्वी एका क्षेत्रांत कन्यागताच्या समयीं एक जहागिरदार मराठे होते ते आले, त्यांजला कल्ले व मिशा पुष्कळ होत्या. त्यांणीं सांगितलें कीं, मिशा व कल्ले न काढण्याचा शास्त्रार्थ काढा. त्यावरून ब्राह्मण लोकांनीं शास्त्रार्थ सांगितला कीं, केसांचे भारोभार सोनें दिलें ह्मणजे झालें. तें त्यांणीं कबूल करून ब्राह्मणांच्या आजमासानें मिशा व कल्ले तीन तोळे धरले व तितके तोळे सोनें दिले. त्याप्रमाणेंच आह्मी सव्वा रूपया देऊन समजूत केली. परंतु बाकीच्या लोकांनीं कांहीं दिलें नाहीं. क्षौरानंतर स्नानाचा विधी व्हावयाचा. या समयीं संकल्प

सांगितले जातात, त्यांत आलीकडे विलक्षण फेरफार झाले आहेत. लहानपणींचे आमच्या ऐकिवांत ' कायिक वाचिक मानसिक सांसर्गिक दोषपरिहारार्थं ' असें पूर्वीं पासून आहे. परंतु नर्मदा येथें द्रविड लोकांनीं आह्मांस संकल्प सांगितला तो, ' खून व्यतिरिक्त दोषपरिहारार्थं ' असें उपाध्यबोवा ह्मणाले. आह्मीं त्यांस त्याच वेळेस विचारिलें कीं, हा शोध संकल्पांत कोणत्या कारणानें घातला ? प्रयागांत महासंकल्प ह्मणून ज्यास ह्मणतात, तो संकल्प ऐकण्यास दीड रूपाया लागतो. हा संकल्प ऐकण्याची इच्छा धरून आह्मी दीड रूपया दिला. त्यावरून पाहतों तों सर्व पिनल कोडांतील अपराध संकल्पांत सामील केले आहेत. ते असे कीं, कायिक, वाचिक, मानसिक ह्या दोषांऐवजीं सुरापान, चौर्यकर्म, असत्य भाषण, मनुष्यवध, ब्राह्मण अपमान, अपात्रदान, वर्ज्यआहार, याप्रमाणें सर्व अपराध संकल्पांत दाखल करून इतके अपाध माफ होणार असें गंगास्नानाचें फळ आहे, असें समजून स्नान करावयाचें. काशींत पुष्कळ दक्षणचे लोक असल्यामुळें, तेथें संकल्प सांगण्यास लोक मिळतात. परंतु अयोध्या, मथुरा, पुष्कराज, मातृगया याठिकाणीं संकल्पाचा बहुतेक गडबडगुंडाच आहे. या ठिकाणीं संस्कृत भाषा बोलण्याचा प्रत्यन करितात, परंतु बरोबर उच्चार करितां येत नाहीं, व माहिती कमी, असे फार. स्नानानंतर सर्व तिर्थांच्या ठिकाणीं लुगडें वगैर्‍यांच्या दानासहित गंगापूजन करावें लागतें, अगर करण्यास सांगतात. नंतर श्राद्धें करावयाचीं. इतर ठिकाणचीं सर्वांस माहीतच आहेत सबब तीं सांगत नाहीं.

परंतु गयेंतील श्राद्ध मात्र कठीण, व विशेष भोळेपणाचें. या ठिकाणीं वडाच्या झाडाच्या चौथऱ्यावर पिंडदान झाल्यावर गयावळ एका फुलांच्या माळेनें पिंड घालणाराचे हात बांधल्याप्रमाणें माळ गुंडाळतात, आणि नंतर त्या मनुष्याचें सामर्थ्य वीस रूपये देण्याचें असलें तरी त्याजपाशीं हजार रूपयांपासून मागत सुटतात. हे गयावळ दागदागिने घालून, हत्ती घोडा घेऊन थाटानें भिक्षेस येतात. यात्रेकरू लोक अशा श्रीमंतांस रूपया दोन रूपये काय द्यावे, त्यावरून त्यांजला राग येईल, असें समजून आरंभींच जास्त रक्कम देतात. परंतु त्याबद्दल त्या लोकांची तृप्ति न होतां अतिशय त्रास व याचना करून निघूं शकेल तितकें काढतात. तें एथपावेतों कीं, श्राद्ध करणारा त्रासे पावेतों त्यास त्रास देतात. शेवटीं रोख पैसा न मिळेल तर यात्रेचें पुण्य गहाण ठेऊन खत लिहून घेतात. तें न केलें तर निदान देशीं गेल्यावर आह्मांकडे यात्रा पाठवावी अशी तरी शपथ घेववितात. तेंही न झालें तर मग शेवटीं "तेरे पितर सरग भयो," ह्मणजे तुझे पितर स्वर्गास गेले, असें ह्मणून त्याच्या पाठीवर दोन आण्यापासून वरील किंमतीचा दोरवा घालून "धन्य" ह्मणून त्याची पाठ थोपटतात. गयेंत पिंडाचा मोठा झपाटा. ज्याजला अतिशय भक्ती असेल त्यानें ८१ दिवस उपास व ८१ श्राद्धें पिंडसहित निरनिराळ्या डोंगरावरून व कुंडांवरून करावीं लागतात. परंतु हल्लीं ८१ रोज श्राद्धें करीत बसणारी फर्स्ट क्लास यात्रा मिळत नाहीं. परंतु हल्लीं ४५ श्राद्धें करणारे लोक बरेच आहेत. हीं ४५ श्राद्धें १२ पासून १५ रोजपर्यंत संध्याकाळपावेतों रानो-

माळ हिंडून व उपास करून केलीं जातात. आणि या श्राद्धांचा अखेर परिणाम शंखध्वनीचा आहे. तो असा कीं, एका कुंडावर अखेरचें श्राद्ध करून तेथें बोंब ठोकणारे लोक असतात त्यांजला रुपाया दोन रुपये द्यावे लागतात, ते दिले ह्मणजे ते श्राद्ध करणाराच्या वडिलांचें नांव घेऊन ते मुक्तीस गेले ह्मणून बोंब ठोकतात. ही बोंब अशासाठीं कीं, पितरांस स्वर्गास जाण्याविषयीं गयावळाची परवानगी झाल्यानंतर ही बोंब ऐकून स्वर्गाचें दार खुलें होतें अशी समजूत आहे. गयेस श्राद्धाचा संकल्प नाहीं. फक्त दोन टाळ्या वाजवून पिंड घालावयाचे. श्राद्धानंतर विद्वान ब्राह्मण लोकांची पूजा, ज्यास वसंतपूजा ह्मणतात, ती व ब्राह्मणभोजन व्हावयाचे, या समयीं ब्राह्मणांस कितीही दिलें तरी कधीं कोणी संतुष्ट होत नाहीं. श्रीरामचंद्रानें सोनें व रुपें पर्वताएव्हढें दिलें असून देखील संतुष्टता झाली नाहीं, असें पांडेलोक सांगत असून, इतर लोकांची काय कथा? एक मोठे श्रीमंत जाहागिरदार व सरदार यांणीं तिगस्तां समाराधना केली, त्यांत ब्राह्मणांनीं शंखध्वनी केली. त्याप्रमाणेंच एक श्रीमंत जाहागिरदार व सरदार यांणीं सुमारें दीड लाख रुपये धर्म केला तरी संतुष्टता झाली नाहीं. याप्रमाणें कित्येक वसंतपूजेचे ब्राह्मण व पांडे यांचें झालें. मग इतर भिकारी व याचक लोकांविषयीं तर बोलणेंच नको. या लोकांचा त्रास नर्मदानदीपासून तों सिंधपुरापर्यंत इतका आहे कीं, त्याचें वर्णन करावें तितकें थोडें. हे लोक तीन तीन मैल मागें लागून अखेर पैसा मिळाला नाहीं, ह्मणून शिव्या देतात, व दहा वीस लोकांस पैसा दिला तर पन्ना-

स पन्नास ज्यास्त जमतात. पन्नासांस दिले तर २०० जमतात. पुष्कराज तिर्थावर तर या गोष्टीची कमाल झाली. आह्मांसभोंवती या तिर्थावर ५०० लोक जमले. मग सर्वांची समजूत करणें आह्मांस अशक्य असल्यामुळें आह्मी गाडी हांकली. परंतु आमच्या गाडीबरोबर ५० असामी तीन मैल आले. शेवटीं आह्मी तीन रूपये देऊन त्यांस मागें घालविलें. बाकीच्या लोकानीं वहिवाटीप्रमाणें गालिप्रदान केलें. दहा क्षेत्रें मिळून मजला असें वाटतें कीं, रिकाम्या भिकारी लोकाची संख्या दहा हजार ह्मणजे १० गिरण्या चालण्याजोगी आहे. जर या भिकारी लोकांस भीक मागण्याची बंदी करून गिरणीवर सरकार त्यांजकडून काम घेईल तर देशाचें पुष्कळ हित होऊन यात्रेकरू लोकांचा त्रास मिटेल इतकेंच नाहीं, परंतु यात्रेकरू लोकांची चोरी होण्याचें कांहीं अंशी कमी होईल. कारण भिकाऱ्यांचे वेष धारण करून चोरोपंत येऊन डल्ला मारीत असतात. त्यांचा प्रलय इतका आहे कीं, यात्रेस एक दागिना देखील घेऊन जाणें भयंकर आहे. यात्रेस जातेसमयीं सर्व दागदागिनें घरीं ठेवून जावें लागतें. बरोबर नेण्याची सोय नाहीं. कितीएक बायका नथ घेऊं पाहतात. परंतु त्या नथा चोर गोसाव्यांचे वेष घेऊन अगर इतर रीतीनें नाक तोडून नेतात. याप्रमाणें माझ्या माहितींत एका वकिलाच्या बायकोची नथ नेली असून, मी अयोध्येहून लखनौस जात असतां [illegible] ट्रेनींत एका बायकोची नथ गेली. यात्रेत कोणावरही विश्वास ठेवूं नका, असें पांडेलोक [illegible]. नदींत दागिन्यांसहित बायका गे-

संग्रहालय ठाणे.

ल्या असतां, त्यांस लांबून बुडून येऊन चोर दागिन्यांसहित नेतात अशी पूर्वीची भीति असे, ती आतां चंद्रग्रहणाशिवाय अगर रात्रीच्या समयाशिवाय बहुतकरून अमलांत येत नाहीं. तथापि ती भीती ऐकून आमचे माहितींतील एका गृहस्थानें बायकोचे दागिने आपलेजवळ घेऊन धोतरांत बांधिले आणि नदीवर स्नानास गेला, हें कोणी तरी पाहिलें होतें. घांटावर गेल्यावर बायकोस स्नानास प्रथम त्यानें पाठविलें. त्याजला उपाध्ये बोवांनीं सांगितलें कीं, उभयतांनीं मिळून स्नान करावें. त्यानें तें मान्य करून, गाठोडें संन्याशाचें रूप धारण करून घाटावर बसले होतें, त्यांजपाशीं टेविलें आणि स्नानास गेला, तों संन्यासी बोवा नाहींसे झाले ! आणि आमच्या माहितीचे गृहस्थ बायकोसह रडत परत आले. याप्रमाणें चोऱ्या फार होतात. असें नदीतिरीं गेल्यावर झालें. पुढें प्रयागांत नदींत गेल्यावर तर आजुबाजूनें लोक यजमान महाराज नदींत एक पैसा टाकावा, म्हणून नावाडी त्रास देतात. दूधवाले दूध घेऊन नदींत ओता म्हणून पाठीस लागतात. फूलवाले फुलांच्या पर्ड्या घेऊन फुलें वाहण्याविषयीं आग्रह करितात. याप्रमाणें नदींत स्नान करूं देत नाहींत. जेव्हां नदीस व त्यांस शिव्या द्याव्या तेव्हां पिच्छा सोडतात. वाटेंत भिकारी मागें लागतात. घरीं, राहिल्या ठिकाणचे पांडे व पुढें जाण्याच्या ठिकाणाचे पांड्यांचे गुमास्ते आतोनात जिकीर करण्यास येतात. याप्रमाणें एक पळभर देखील यात्रेकरू लोकांस कोणी चैन पडूं देत नाहीं. मग रामकृष्ण नांव घेण्यास तर फुरसत मुळींच नाहीं, व देवाच्या नांवाचें भजन तर मुळींच

कानीं पडत नाहीं. गयेंत तर पांडेलोकांत यजमानांसंबंधी मारामारी होती. दक्षणेकडील यजमान ह्मणजे त्यांची शिकार; आणि त्यांचा त्रास इतका आहे कीं, कितीहि संभावित व शांत मनुष्य असो, त्याला देखील राग यावयाचा. आमच्या सारख्यांची तर गणतीच नाहीं. एक श्रीमान जहागिरदार साहेब, ज्यांची शांततेविषयीं व भक्तीविषयीं मोठी किर्ति आहे, त्यांजला देखील तिगस्तां या गयावळांनीं असें त्रासविलें कीं, ते तरवार घेऊन गयावळांचे अंगावर धांवले, तेव्हां गयावळांनीं त्यांस ज्यास्त त्रास देणें बंद केलें. याप्रमाणें भिकारी लोकांचा त्रास असून, शिव्या खाल्या नाहींत असा मनुष्य नाहीं. ही त्रासाची गम्मत आरंभापासून ठरलेले उपाध्ये अगर पांडे नसलेल्या लोकांच्या दृष्टीस पडती. ज्यांचा उपाध्या क्षेत्रांत जाण्यापूर्वी ठरून गेला, त्यांजला त्रास कमी पडतो, व सर्व लिहिलेली हकीकत कुटुंबासुद्धां गेलेल्या मनुष्यास दृष्टीस पडती. कारण कुटुंब गेल्यावर मी नुसता देश पाहण्यास आलों आहें, असें सांगितलें असतां, लोक खरें मानीत नाहींत व पिच्छा सोडीत नाहींत. जे क्षेत्रस्थ लोक आह्मांस क्षेत्राची तारीफ सांगून यात्रा करण्यास लावतात, ते जातीनें तसे पूर्णपणें वागतात, असें पुरें दिसून येत नाहीं. त्यांपैकीं बहुतेक होईल तितकें करून विहिरीचें पाणी पितात, व काशींत वस्तीखेरीज कोळी लोक समोरील नदींतून पाणी आणतात. नर्मदेपासून तों सिद्धपुरापर्यंत पाण्यास विटाळ नाहीं. प्रयागांत परदेशी कनोजी ब्राह्मण लोक नांवेंतून कोळ्यांस बरोबर घेऊन जाऊन जें पाणी आणतात तें पितात. काशीस

अहीर लोक ह्मणजे गवळी लोक पाणी समुदायाच्या समयीं भरितात. रजपुतान्यांत व गुजराथेंत "बमनिया पाणी" ह्मणून पाणी आणिलें जातें, तें सर्व लोक घेतात; मग त्याला कोणीहि शिवलेले असो. उत्तरहिंदुस्थानांत व गुजराथेंत व रजपुतान्यांत पाण्यास विटाळ दिसत नाहीं. मुंबईंत व पुण्यास आगगाडींत बसलेले ब्राह्मण लोक पाणी प्याले असतां, जे ब्राह्मण त्यांस एथें दोष लावतात, ते वरील देशांत बमनियापाणी आपण स्वतःगाडींत पितात. जे दक्षणेंत चांभार लोकांची सावली घेत नाहींत तेच मोठे भक्तिवान लोक काशींतील पंचक्रोशींतिल वाटेनें त्यांच्यासाठीं चांभारीण जागा सारवून तयार करिती तींत जेवण करितात, व गयावळ हे ब्राह्मण नसून त्यांची पूजा करितात.

येणेप्रमाणें यात्रेचीं दहा क्षेत्रें आह्मी पाहिलीं. त्यांतील महिमा आमचे मनावर बसावी, परंतु एक तीर्थाचे लोक दुसरें तीर्थ कमी ह्मणून सांगतात, यामुळें तसें होत नाहीं. प्रत्येक तीर्थस्थ आपलें क्षेत्र मोठें, बाकींचीं सर्व रद्द, असें बोलतात. प्रयागास, प्रयाग येथील आमचे प्रयागवाळास आह्मीं ह्मणालों कीं, आह्मास काशीस व गयेस जाणें आहे, सबब सर्व खर्च प्रयागास करितां येत नाहीं. याकरितां जास्त दक्षणेचा आग्रह करूं नका. त्यानें सांगितलें कीं, प्रयागराज हा मुख्य देवतेचा राजा असून, गंगा व गयेतील फल्गुनदी या त्या राजाच्या बायका आहेत. आह्मी काशीस गेलों तेव्हां कांशीकरांनीं सांगितलें कीं, अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, कुरुद्वारावतीचैव सप्तै ते मोक्षदायका. याप्रमाणें जो श्लोक आहे त्यांत प्रयागचें मुळींच वर्णन केलें

नाहीं. सबब प्रयागांतील खर्च रूजू नाहीं. काशी मुख्य. गयेस गेल्यानंतर तेथील लोकांनीं सांगितलें कीं, 'भिमा आणि चंद्रभागा तुझें चरणीच्या गंगा, या वाक्याप्रमाणें भागिरथी' यमुना नद्या, विष्णूच्या चरणापासून निघाल्या असून, त्यांनीं विष्णूची चरणसेवा करून रहावें. तीं ठिकाणें श्रेष्ठ नाहींत. अयोध्येस गेल्यावर तेथील लोकांनीं सांगितलें कीं, अयोध्या ही श्रेष्ठ, यास आधार हा कीं, पूर्वी सांगितलेल्या श्लोकांत अयोध्या पहिल्या नंबरास आहे. मथुरेस गेल्यानंतर तेथील चौबे उपाध्ये ह्मणून आहेत ते ह्मणाले, यमुना ही विष्णूची पट्टराणी असून, गंगा व इतर नद्या तिच्या दासी आहेत. पुष्कराज तिर्थाच्या ठिकाणीं व सिद्धपूर ठिकाणीं असेंच सांगण्यांत आलें कीं बाकींचीं क्षेत्रें मोठीं नाहींत. कारण तीं एकपक्षी आहेत. काशी सांभाची, गया विष्णूची, परंतु पुष्कराज व मातृगयेंत त्रयमूर्ति एके ठिकाणीं जमल्या आहेत. सबब हें तीर्थ मोठें. याप्रमाणें सिद्धपूरपर्यंत एका ठिकाणास दुसऱ्यानें नांवें ठेविलीं. सिद्धपूर मात्र शिलक होतें. तेंही मुंबईस आल्यावर वाळकेश्वरीं रद्द पडलें. मुंबईस येऊन वाळकेश्वराच्या ठिकाणीं समुद्रस्नानास गेलों. तेथील ब्राह्मणांनीं संकल्प सांगितला कीं. 'सागरे सर्व तीर्थानि' ह्मणून हें सागरस्नान श्रेष्ठ, यांत दाहाही तिर्थांचा समावेश असतां इतके लांब गयेस बोंब ठोकण्यास अगर ठोकलेली ऐकण्यास व दाळीवर श्राद्ध करण्यास कशास गेलां ? तिकडे कशास खर्च केला ? मुंबईस येऊन स्नान केलें असतें तर दहा रूपयांचे आंत सर्व होतें. सारांश एक ठिकाण सोडून दुसऱ्या ठिकाणीं जावें, तो मागील यात्रा, जिजबद्दल पैसे खर्च झाले

ती फुकट ठरली. याप्रमाणें कोठें कांहीं कोठें कांहीं ऐकून यात्रा करणारा विस्मित व निराश होतो. त्याजला दिसून येतें कीं, आपण मोठें भक्तीचें ठिकाण ह्मणून पहाण्यास आलों, परंतु तसा प्रकार तर दिसून आला नाहीं. आगगाडीचें तिकीट मिळविल्यापासून तों शेवटपर्यंत फुकट त्रास मात्र झाला. आणि पैसे मात्र गेले. आणि ते अशा लोकांस गेले कीं, ते आपला उपकार तिळमात्र समजत नाहींत. काशी एथें बहुतेक घाट पाहूं गेलें असतां, दक्षणचे लोकांचे आहेत. आणि त्यावर काशीकर लोक पोट भरीत असून, दक्षणच्या लोकांस गंगापुत्र हे दक्षणचे भिकार अशीं नांवें ठेवतात. आह्मास असें वाटतें कीं, पूर्वी ज्या काळीं ब्राह्मण व इतर मोठ्या लोकांच्या हातानें हत्या होत होती, त्यावेळेस राजदंडाऐवजीं ही यात्रा होती असें सांगतात. त्याप्रमाणें उपासासह व पिंडासह केली ह्मणजे त्याचे जातीनें पिंड पडतील, यांत संशय नाहीं. व यामुळें मुलगा बरोबर नेण्याची चाल आहे. आलीकडे सरकरांतून देहदंड हत्या करणारास होत असून, तसे मासल्याचे यात्रेकरू मुळींच नाहींत. चुकून कांहीं तरी जींव जंतूची हत्या झाली असें समजून यात्रेस जाऊं लागले. आणि देहापैकीं भाग त्याग करण्याऐवजीं मिशा काढूं लागले. परंतु अशा मिशा काढण्यांत अगर स्नानांत कांहीं उपयोग नाहीं. रामदास स्वामीस मंडळींनीं तीर्थाटणास बोलाविलें तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, मी येत नाहीं. परंतु माझा भोंपळा घेऊन जावा, आणि त्यास स्नान घालून आणावें. त्याप्रमाणें यात्रेकरू लोकांनीं सर्व नद्यांतून भोपळा बुडवून परत आणल्यानंतर स्वामीनीं त्याजला चिरून भाजी

करण्यास सांगितलें. ती भाजी कडू झाली. कडुभोपळ्याचा कडूपणा स्नानानें गेला नाहीं. तद्वतच यापूर्वी जे लोक यात्रा करून येत होते, त्यांजला धन्य समजत होते. व त्या लोकांसही आपोआप मोठेपणा येत होता. यामुळें अशा उघड सभेत यात्रेसंबंधीं गुणदोषासहित सर्व हकीकत त्यांनीं कळविली नाहीं, गुप्त ठेविली असावी. परंतु आतां आह्मी सांगितल्या हकीकतीवरून लोकांस खरोखर दिसून येईल कीं, काशीस जाणारे धन्य नव्हत. शिकंदराबादचे कित्येक द्रविड विद्वान ब्राह्मण यात्रेस आले होते. त्यांनीं गाडींत आह्मास असें सांगितलें कीं, खरा पुण्यमार्ग ह्मणजे वर लिहिलेली यात्रा ते अनुभवावरून समजत नाहींत. परंतु निष्पाप मनानें घर संभाळून विद्यार्थी अगर अनाथ, अतीथ, अभ्यागत, यांस अन्न देणें अगर विद्या व इतर दान देणें हेंच खरें पुण्य होय. नुसतें देशभर भटक्या मारून कांहीं पुण्य नाहीं. आमचे अनुभवावरूनही हेंच खरें आहे. व आमचे पुष्कळ दुसरे परिचित लोकांचे अनुभवावरूनही या यात्रेंत कांहीं भक्तिमार्ग लागत नाहीं. कारण प्रत्येक तीर्थांतील हल्लींच्या अशा भाविक भोळसर दिसणाऱ्या गोष्टी आलीकडे जडत आलेल्या पाहून, यात्रेकरूंची भक्ति बसत नाहीं. आणि एक तिर्थाची बसती न बसती तों दुसरा तीर्थवाला पहिल्या तिर्थास नांवें ठेवितो. येणेंकरून अखेरीस कांहीं शिलक रहात नाहीं. यास्तव एका परमेश्वराचें चिंतन करून घरींच सद्मार्गानें चालून शक्तिनुसार धर्म करणें, हेंच खरें पुण्य आहे. घरेंदारें धुऊन पोरांस नागवून अगर निराश्रित टाकून पांड्यांची भर करणें आह्मी पुण्य समजत

नाहीं. यास्तव हें व्याख्यान ध्यांनीं ठेऊन पुढील मंडळींनीं यात्रा जरूर वाटल्यास करावी, व करणें झाल्यास बायकोस एकटी पाठवूं नये. व आपल्या घरीं ज्या विधवा असतील त्यांची विटंबना होऊं देऊं नये, व आपली चोरी न होईल अशा बंदोबस्तानें जात जावें. नाहींपेक्षां फक्त देश पर्यटण करावें. त्यावरून त्यास एवढें मात्र दिसून येईल कीं, ज्या लोकांचे हातून येथें आपण पाणी पीत नाहीं, त्या लोकांच्या हांतून आह्मी उत्तर प्रांतांत पाणी. पितों. ज्यालोकांची सावली आपण येथें घेत नाहीं त्या लोकांनीं तयार केलेली व झाडलेली जागा आपण स्वयंपाकास घेतों. त्याप्रमाणें येथें मोठमोठे पवित्र ह्मणविणारे ब्राह्मण आपली पूजा दुसऱ्या जातीच्या लोकांकडून श्राद्धांत ह्मणा, किंवा वसंतपूजेसमयीं करून घेतात तेच ब्राह्मण लोक, गयावळ, पंचगौड व द्रविड ब्राह्मणांपैकीं ब्राह्मण नसतां त्यांची पूजा करितात. यापासून जो मोठा जातीभेद आहे, तो मात्र कमी पडतो. एवढें देशकल्याण आहे, तें असें कीं, जातीभेदाचें महत्व कमी होतें. सारांश यात्रेपासून आमच्या मनावर एवढा ठसा बसला कीं, काशीचें जें महात्म्य अद्यापि जावयाची मुदत आहे, ह्मणून ह्मणतात ती मुदत आलाहिदा औरंजेबाच्या वेळेस श्रीविश्वेश्वर पळून गेले, त्यावेळेसच संपली. आतां यात्रेचें महात्म राहिलें नाहीं. देश पर्यटणाचें राहिलें आहे. देश पहाण्यास व हरएक ठिकाणीं निरनिराळ्या चिजा उत्पन्न होतात त्या पहाण्यास, जाण्यास आग्रा येथील ताजमहालासारखी इमारत पहाण्यास हरकत नाहीं. माझें भाषण यात्रेपुरतें आहे. त्यांच्या वर्णनावरून प्रत्येक ठिकाणीं

दुसरी सुधारणा नाहीं, असें कोणी समजूं नये. जुनीं यात्रेचीं ठिकाणें शिकस्त करून सरकारांनीं बंगले, सडका, कालेजें वगैरे सर्व दुरुस्त केल्याच आहेत. परंतु त्यांचा अनुभव यात्रेकरूंस न येतां, ते ज्या गटांगळ्या खात फिरतात त्यांचें वर्णन वर खऱ्या मनानें दिलें आहे. हें या उद्देशानें कीं, आपल्या दक्षिणी लोकांची जी प्रत्येक ठिकाणीं विटंबना व फटफजिती होते, व जी मुसलमान व इतर जातीचे लोक उभे राहून पाहून हंसतात, ती माझ्यानें पहावेना. सबब हें व्याख्यान मोठ्या लाचारीनें दिलें आहे, व यांत एकहि गोष्ट अनृत लिहिली नाहीं. तथापि हा सर्व प्रकार उघड केला. यापासून कोणास राग येईल तर उपाय नाहीं. त्यांनीं माफी करावी.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.